म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ३५५

चरित्र . २०५

लोकमताची

# ओहोटी आणि भरती

अथवा

# अबदुल हमीद

( उत्तरार्ध )

लेखक—रा. कृ. का. फडके.

प्रकाशक
[illegible] पाठक आणि कंपनी.
[illegible]रोड मुगभाटलेन मुंबई नं. ४.
किंमत १२ आणे.
सवलतीची किंमत ६ आणे.

REFBK-0017816

अबदुल हमीद.




पी. बी. पाठक आणि कं., मुगभाट लेन, गिरगांव, मुंबई नं. ४

तुर्की लोकमताची

# ओहोटी आणि भरती

अथवा

## अब्दुल हमीद.

( उत्तरार्ध )

तुर्की अंतर्राज्य व्यवस्था

भाग १० वा.

REFBK-0017816

अबदुल हमीद गादीवर येण्यापूर्वी तुर्कस्थानांत फक्त तीन रेल्वे रस्ते होते. स्मर्ना पासून ऐदीन पर्यंत रस्ता तयार करण्याचा मक्ता इ. स. १८९६ च्या जुलै महिन्यांत देण्यांत आला व त्याप्रमाणें रेल्वे तयार झाली, पश्चिम एशियावर मधून बाहादेशीं जाणारा माल

स्मर्ना येथूनच जातो. हा रेल्वे रस्ता इंग्रजी कंपनीनें तयार केला असून तो त्याच्याच व्यवस्थेखालीं चालू आहे. मेंडोरदरी आग्नेय एशिया मायनर प्रदेश येथील शेतकऱ्यास या रेल्वे पासून फार फायदा झालेला आहे. हीच रेल्वे डिनेरपर्यंत वाढण्याची परवानगी इ. स. १८८८ देण्यात आली आणि हा फाटा एधिरदिर सरोवरापर्यंत १९०६ त पुरा झाला. इ. स १८८३–८४ सालीं स्मर्नापासून कासाबा पर्यंत रेल्वे तयार करण्याचा मक्ता एका फ्रेंच कंपनीस मिळाला. अबदुल हमीद गादीवर येण्याच्या वेळीं बास्फरस सामुद्रधुनी वरील हैदरपाशा पासून हसमिटा पर्यंत रेल्वेचा रस्ता तयार होऊन चालूही झाला होता. आड्रियानोपलकडे जाणारा आणखी एक रेल्वे रस्ता यावेळीं तयार झाला होता. हा मक्ता ब्यारन हिच यांस देण्यांत आला होता. या सर्व रेल्वेच्या फाट्यांनीं तुर्की राज्याचें उत्पन्न बरेंच वाढलें होतें. यासुमारास बल्गेरिया प्रांतांत रेल्वे मुळींच नव्हती.

जेव्हां अबदुल हमीद गादीवर बसला त्यावेळीं लंडनहून कान्स्टांटिनोपल येथें जाण्यास रस्ते होते. पहिल्या रेल्वेनें मार्सिलिस येथें जाऊन नंतर आगबोटीनें बास्फरस आणि दुसरा रेल्वेनें बर्लिन येथें जाऊन रशियन सरहद्दीवरून ओडेसा येथें आणि नंतर आगबोटीनें काळ्या समुद्रांतून कान्स्टांटिनोपल. पहिल्या रस्त्यानें गेल्यास एक आठवडा व दुसऱ्या रस्त्यानें गेल्यास ४॥ दिवस लागत असत. बल्गेरियाचें

स्वतंत्र राष्ट्र बनल्यावर रेल्वेची जरूरी भासूं लागली तेव्हां सर्व्हियाची राजधानी बेलग्रेड येथपर्यंत एक रेल्वे फाटा तयार करण्यांत आला आणि टर्कीनेंही आड्रियानोपलचा फाटा बेलग्रेड येथें आणून जोडला. या ठिकाणांहून व्हियान्ना येथें अगर पश्चिम युरोपांत प्रवास करणें सुलभ झालें. कान्स्टांटिनोपल आणि प्यारिस या मधील रेल्वे रस्ता इ. स. १८८८ त तयार करण्यांत आला. या वर्षापासून या रेल्वेवर माल व उतारूं यांची गर्दी उत्तरोत्तर वाढूं लागली. ओरिएंटल एक्स-प्रेस नांवाची वेगानें जाणारी आगगाडी सुरू झाली तेव्हां तर हा फाटा फार भरभराटीस आला. या रेल्वेवर उत्तम प्रकारची व्यवस्था आहे.

## बगदाद रेल्वे.

कान्स्टांटिनोपल पासून इराणी आखातापर्यंत एक रेल्वेचा फाटा तयार करावा असें इंग्लंड व जर्मनी यांस वाटत होतें. हा फाटा तुर्की साम्राज्यांत फार महत्वाचा होईल असेंच सर्वांचें मत होतें. सुएझचा कालवा होण्यापूर्वी बऱ्याच इंजिनियरांनी या रेल्वे फाट्यासंबंधानें पहाणी केली होती. पण भूमध्य समुद्र आणि तांबडा समुद्र यांच्यामध्यें जेव्हां सुएझचा कालवा झाला तेव्हां या फाट्याची कांहीं जरूरी नाहीं असें इंग्लंडला वाटलें. पूर्व दिशेकडील प्रांतांच्या हिताहितांचा विचार करतां हा जलप्रवासच जास्त सोईचा असून रेल्वेचा फाटा तितका

सोईचा मार्ग असें पुष्कळ व्यापारी व मुत्सद्दी लोकांस वाटलें. या लोकांचें हें ह्मणणें पुढें खरेंही ठरलें. जमिनीवरून व्यापार करण्यापेक्षां समुद्रांतून व्यापार करणें सोईचें व कमी खर्चाचें आहे असें स्पष्ट आढळून आलें. इंग्रज इंजिनियर फक्त व्यापारी दृष्टयाच विचार करीत होते ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

पण जर्मनीचे विचार कांहीं निराळेच होते. आशिया मायनरमध्यें आपणांस वसाहत करता येईल असें जर्मनीला वाटलें होतें पण ही गोष्ट इंग्लंडच्या स्वप्नींही नव्हती. जर्मनींतील लेखक व विचारी लोक तुर्की-साम्राज्यांत आपणास राहण्यासाठीं जागा मिळेल अशी आशा करीत होते. चोहोंबाजूंनीं आवळल्या मुळें जर्मनींतील वाढती प्रजा अमेरिकेंत जाऊं लागली होती व कांहीं जर्मन तर इंग्रजी वसाहतींतही गेले होते. तरी पण आपल्या वाढत्या प्रजेस कोठें तरी मुबलक जागा मिळावी असें जर्मनीस वाटतच होतें. फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें इ. स. १८७० सालीं जी लढाई झाली त्यावेळीं प्रसिद्धीस आलेला जनरल मोल्टके याणें इ. स. १८३० सालीं असें प्रतिपादन केलें होतें कीं ज्या प्यालेस्टाइन प्रांतांत एक जर्मन वसाहत असावी. तुर्की साम्राज्याच्या इतर भागांतही अशी वसाहत व्हावी असेंही त्याचें ह्मणणें होतें ह्मणतात. इ. स. १८४६ सांत लिट्झ याणें बगदाद रेल्वेची सूचना प्रथम पुढें आणली. इ. स. १८४८ तरोझर नांवाच्या एका लेखकानें

[stamp]

तर असें विधान केलें कीं शरपंजरी पडलेल्या टर्कीच्या छपेटाखर जमीनीचाच हक्क तयार झाला पाहिजे. इ. स. १८८९ साली एका पूर्वोक्त जर्मन पंडितानें असें भविष्य केलें कीं ब्याबिलोन प्रांत ( प्यालेस्टाइन ) वसाहतीला उत्तम आहे आणि या ठिकाणीं बळवान राष्ट्रांच्या प्रजेचें नांवही नाहीं. आशिया मायनरवर जर्मनीच्या गरुडाचा रक्षक पंख असावा असें पुष्कळ जर्मन लेखनांनीं स्पष्ट लिहिलें आहे. डा. सेटन वाटसन यांणी असें लिहिलें आहे कीं, बर्लिन–बगदाद प्रांत जर्मनीनें आपल्या ताब्यांत घेतल्यास जगाच्या घडामोडींत फार विलक्षण फरक पडेल. जर्मन लेखक जरी अशा प्रकारच्या कादंबऱ्या लिहीत होते तरी बर्लिन आणि इराणी आखात यांच्या दरम्यान जर्मनीचें भविष्यत भरभराट आहे असें प्रिन्स बिस्मार्क यांस केव्हांही वाटलें नाहीं. इतकेंच नव्हें तर कान्स्टांटिनोपल जर्मनीच्या ताब्यांत असावें हीही कल्पना त्यास मानवली नव्हती, त्यांची कल्पना इतकीच होती कीं, जर्मनीनें आस्त्रियांस अंकित करावें आणि बाल्कन प्रांतांतील संस्थानांशीं गुण्यागोविंदानें रहावें. कोएनग्रेझ येथें जर्मनीनें आस्त्रियाचा जरी पूर्ण मोड केला होता तरी जर्मनीनें आस्त्रिया जवळ एखादा जमिनीचा तुकडा अगर लढाईच्या खर्चाबद्दल एखादा पौंडही मागितला नाहीं. या दोन्हीं राष्ट्रांचें हिताहित एकमेकांस गुंतलेलें आहे असें तो ह्मणत असे. हल्लीच्या केसरच्या पूर्वीच्या केसरनें रशियाची स्नेह संबंध ठे[illegible]

पण ज्यावेळीं आस्त्रिया व रशिया यांच्यांत तेढ उत्पन्न झाली तेव्हां या केसरनें आपलें वजन आस्त्रियासाठींच खर्च केलें. हल्लींचे केसर गादी-वर बसल्या नंतर आणि प्रिन्स बिस्मार्क यांस बाडतर्फ केल्यानंतर ' विस्तृत जर्मनी ' बद्दलची कल्पना पुष्कळ लेखकांनीं आपल्या ग्रंथां-तून प्रसृत केली. तुर्की साम्राज्यांतील कांहीं क्षुल्लक रेल्वेबद्दलचे मक्ते आपणास मिळावेत ह्मणून जर्मनीचा वकील अब्दुल हमीद व त्याचे प्रधान यांची मनधरणी करीत होता. हैदर पाशा आणि इस्मित या मधील ९८ मैलाचा रेल्वे फाटा तुर्क सरकारानें नुकताच तयार केला होता. बगदाद येथें जाणाऱ्या रेल्वेचें हें ठिकाण नाक होतें. सहाव्या शतकापासून पूर्व आणि पश्चिम यामधील व्यापार इराणी आखातांतून मेसोपोटेमिया, सिलिसिया, कोनिया वगैरे प्रांतांतून होत होता. बगदाद हें उंचावरील ठिकाण या व्यापाराचें केंद्र बनलें होतें. हल्लीं परिस्थिती बदलल्यामुळें या रेल्वेचें टरमिनस ( शेवटचें ठिकाण ) इस्मित न होता कान्स्टांटिनोपल जवळ हैदरपाशा येथें असावें असें तुर्की सरका-रास वाटलें. हा फाटा इ. स. १८७२ एका इंग्रजी कंपनीस भाड्यानें दिला होता. करारांत लिहिलेल्या अटी मोडल्यावरून हा फाटा तुर्की सरकारानें इ. स. १८८३ त एकदम आपल्या ताब्यांत घेतला आणि कांहीं महिन्यांनीं तो एका जर्मन कंपनीस दिला. हा फाटा ताब्यांत घेण्यासाठीं आनाटोलियन रेल्वे कंपनी नावाची एक कंपनी इ. स.

१८८९ सालीं जर्मनींत स्थापन करण्यांत आली. अशा रितीनें ही कंपनी बगदाद पर्यंत जाणाऱ्या महत्वाच्या रेल्वेची मालक बनली. इस्मत पासून बगदाद पर्यंत रेल्वे रस्ता तयार करण्यापूर्वी पूर्वे कडील ऑगोरापर्यंत एक फाटा तयार करावा असें या कंपनीनें ठरविलें या ठरावाप्रमाणें रेल्वेही एकदम तयार करण्यांत आली.

## जर्मनीचे डाव पेंच.

हल्लीचा केसर गादीवर बसल्यानंतर एक वर्षानें ह्मणजे इ. स. १८९९ सालीं केसर स्वतः कान्स्टांटिनोपल येथें सुलतानाची भेट घेण्यासाठीं गेले होते. ही भेट फार महत्वाची होती व या भेटी नंतरच जर्मन राष्ट्राचें वर्चस्व टर्कीमध्यें हळू हळू वाढत चाललें. आशियांतील तुर्कस्थानांत आपले डाव निर्धास्तपणें चालावेत ह्मणून जर्मन केसरनें सुलतान व त्यांचे दिवाण यांच्याशीं फार गोडीगुलाबीचें बोलणें चालू ठेविलें होतें. बगदादपर्यंत रेल्वे बांधता यावी हें अत्यंत महत्वाचें काम या गोडीगुलाबींत साधावयाचे होतें. केसर इ. स १८९८ सालीं पुनः सुलतानास भेटले व त्याच वेळीं इस्मित पासून कांटेनिया पर्यंत रेल्वे बांधण्याचा मक्ता जर्मनीस देण्यांत आला.

ता. ७ नवंबर १८९८ सालीं जर्मन केसर दमास्कस येथें गेले होते व त्यांनी येथेंच सर्व मुसलमानांचा मी पालनकर्ता आहे असें स्पष्ट बोलून दाखविलें. या नंतर दोन वर्षांनी जर्मन केसर सुलतानास

भेटेल होते व तेव्हांपासून अब्दुल हमीद जवळ जवळ पूर्णपणें केसरच्या हातीं गेला होता. केसर राजधानींत जाऊन नंतर जरूसलेम येथें गेले व तेथें त्यांनीं मोठा समारंभ केला.

ईस्मिद पासून कोनियापर्यंतचा रेलवे फाटा इ स. १८९६ साली पुरा करण्यांत आला. इ. स. १८९८ च्या भेटींत हा फाटा बगदादपर्यंत वाढविण्याचें वचन देण्यांत आलें व त्याप्रमाणें १९०३ सालीं रेल्वे बांधण्यास सुरुवात करण्यांत आली असा हा बगदाद रेलवेचा पूर्व इतिहास आहे

## जर्मनीचें कारस्थान.

इ. स. १९०३ सालीं आस्ट्रिया व जर्मनी यांच्यांत एक गुप्त करार होऊन त्यांत साळोनिका प्रांत आस्ट्रियास देण्याचें ठरलें होतें. बगदाद रेल्वेसाठीं फ्रान्स व इंग्लंड यांणी जर्मनीस भांडवलाची मदत करावी असें जर्मनीनें प्रथम सुचविलें होतें. तसेंच या रेल्वेच्या डायरेक्टर बोर्डांत या दोन्हा देशाचे लोक असावेत. पण या देशाच्या मेंबरांची जी संख्या ठरली होती त्यावरून जर्मन डायरेक्टरांचेंच बहुमत होईल, तेव्हां या कामीं या दोन देशांनी कांहींच मदत केली नाहीं. या रेल्वेनें तुर्कस्थानांतील व्यापार वाढेल असें इंग्लडांतील मुत्सद्यास प्रथम वाटलें होतें पण शेवटीं त्यांचा असा ग्रह झाला कीं ही रेल्वे जर्मन कारस्थानासाठीं बांधण्यांत येत आहे

अशाप्रकारचा रेल्वे रस्ता बांधण्याचें घाटत आहे हें ऐकून जर्मन लोकांस अत्यानंद झाला. या रेल्वेच्या बाजूबाजूनीं आपल्या वसाहत करावयास सांपडेल यामुळें हा आनंद झाला होता. अबदुल हमीद यास गादीवरून पदच्युत करण्यापूर्वीच इस्मिद पासून कोनियापर्यंत चा रेल्वे फाटा तयार झाला होता. हा फाटा पुढें आडानाच्या पश्चिमेस १९ मैलपर्यंतही वाढविण्यांत आला आहे.

टारसस मधून मेरसीना पासून आडाना पर्यंत एक लहानसा रेल्वे रस्ता तयार करण्यांत आलेला आहे. हा फाटा इंग्रज व फ्रेंच याणी तयार केला होता पण फ्रेंचांचे सर्व भाग जर्मन लोकांनी विकत घेतले आणि नंतर इंग्रज लोकांचे भाग जसजसे बाजारांत विकावयास येत तस तसे ते गुप्तपणानें जर्मन विकत घेत अर्थात कांहीं दिवसांनी हा फाटा जर्मन लोकांच्या ताब्यांत गेला.

## रेल्वेचा मक्ता.

एशिया मायनरमध्यें जर्मनिनें रेल्वे बांधण्याचा जो मक्ता मिळविला होता त्यांत जर्मनीचा अंतस्थ हेतू असा होता कीं, या प्रांतांत इतर देशांस असा मक्ता मिळूं नये. अलेकझांड्रा येथून एक रेल्वे फाटा तयार करण्याबद्दल अमेरिकन लोकांनी सुलतानास विनंति केली होती पण जर्मनांचें वजन फार वाढल्यामुळें इतर देशांस या मार्गानें आशियामायनरमध्यें आपला हात घालतां येईना.

तुर्कस्थानांत जर्मनीनें अशा प्रकारें आपला हात घुसविल्यामुळें रशियाला मोठी धास्ती उत्पन्न झाली. रशियानें आपल्या वकिलामार्फत टर्कीस असें कळविलें कीं आसिया मायनरच्या ईशान्येस रेल्वे फांटे तयार करण्याचे मक्ते रशियन प्रजेस किंवा रशियाच्या सल्ल्यानें कोणा कंपनीस देण्यांत यावेत. ही मागणी महत्वाची होती खरी पण याच्यापूर्वीच जर्मनीनें तुर्कस्थानांत रेल्वे मक्ते बहुतेक मिळविले होते. कान्स्टांटिनोपलपासून इस्मत पर्यंतचा रेल्वे रस्ता ज्यास मक्त्यानें देण्यांत आला होता त्याजपासून जर्मनीनें तो पूर्वीच आपल्या ताब्यांत घेतला होता. स्मर्ना आणि कासाबा रेल्वेच्या कारभारांत जर्मनीचें वजन वाढलें होतेंच आणि मेरसिना टारसस आणि आडाना ही रेल्वे त्यानें बहुतेक आपल्या ताब्यांत घेतली होती.

## रशियाची मागणी.

अशा एकंदर कारणानीं रशियाला उत्पन्न झालेली भीति खरी होती. रशियानें जी मागणी केली होती तीही जरा जबरदस्तच होती, तेव्हां ती रसियानेंच परत घ्यावी म्हणून अब्दुल हमीदनें एक नवाच मार्ग शोधून काढला. वकिलाची ही तक्रार ऐकून घेऊन त्यानें रशियन सरकारास परस्पर असें कळविलें कीं दोन बादशाहामध्यें ( जर्मनी व रसिया ) पूर्णपणें सख्य असतां आपल्या वकिलानें जी तक्रार केली ती रशियन सरकाराकडून येणें शक्यच नाहीं याकरतां वकिलानें केलेली ही मागणी

रशियन सरकार परत घेईल अशी फार आशा आहे, या न्हालेल्यास रशियाकडून तुटक उत्तर आलें. या उत्तरांत असें लिहिलें होतें कीं, रशियाच्या कोणाही चाकरास बादशहाच्या अनुमताशिवाय कसलीहीं मागणी करता येत नाहीं. या उत्तरा नंतर सुलतानानें आपले मित्र केसर व महाराणी व्हिक्टोरिया यांस या संबंधानें खलिते पाठविले होते. या खलित्यामुळें केसरची अवस्था मोठी कठीण झाली. या खलित्या-संबंधानें जर्मनींतील एका अर्धवट सरकारी वर्तमान पत्रांत असें लिहिलें होतें कीं, केसर ज्याप्रमाणें आपला मित्र जो सुलतान यांस उपकृत करून ठेवण्यास तयार आहेत त्याच प्रमाणें ते ( केसर ) रशियाचेही मित्रच आहेत अर्थात या कामीं केसर कांहींच करूं इच्छित नाहींत. महाराणी व्हिक्टोरिया यांस लिहिलेला खलिता लार्ड स्यालिसबरी यांच्या मार्फत पोंचला असावा; कारण हा खलिता इंग्लंडांतील तुर्की वकिला कडे पाठविण्यांत आला होता व ' स्यालिसबरी यांची गांठ घ्यावी ' असें वकिलास फर्माविण्यांत आलें होतें. या वकिलास आणखी असेंही कळविण्यांत आलें होतें कीं ' इंग्लंडच्या प्रधानास क्रीटच्या तहाची आठवण द्यावी. या तहांत परकीय राष्ट्रानें टर्कीविरुद्ध कांहीं केल्यास इंग्लंड टर्कीचें रक्षण करील असें ठरलेलें आहे. रशियाची ही मागणी अशाच प्रकारची आहे. ' क्रीटचा तह लार्ड स्यालिसबरी यांस माहीत होता तेव्हां त्यांनी वकिलास असा जबाब दिला कीं एकाच अटीवर हें

रक्षण करण्याचें ठरलेलें आहे. ही अट म्हणजे आरमेनिया प्रांतास सुधारणा देणें, ही गोष्ट जर सुलतानाकडून होत नाहीं तर इंग्लंडही आपलें वचन पाळण्यास बांधलेलें नाहीं.

## केसरची दुसरी भेट.

अशा रितीनें दोन्ही राष्ट्रांनी कानावर हात ठेवल्यामुळें रशियाची मागणी मान्य करणें सुलतानास भाग पडलें.

केसरच्या दुसऱ्या भेटी नंतर आशियामायनरमध्यें जर्मन रेल्वेचा इतका प्रसार झाली कीं, त्या देशांत राहणारे परकीय लोक असे स्पष्ट उद्गार काढूं लागले कीं बर्लिन आणि लंडन येथील दरबारांत आपसांत असें ठरलें असावें कीं इंग्लंडचें नुकसान झालें तरी आशिया मायनर मधील जर्मन प्रगतीस इंग्लंडनें अडथळा आणूं नये. यावेळीं इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें थोडी तेढ उत्पन्न झाली होती आणि आरमेनियांत जे अत्याचार चालू होते त्यांस जर्मनीचा असा हात घुसला तर बराच आळा पडेल अशी इंग्लंडांत प्रमाणिक समजूत झाली असावी. तसेंच आशियामायनरमध्यें जर्मनीचें बरेंचसें भांडवल गुंतल्या नंतर तें भांडवल रशियन व्यापाऱ्याच्या हातीं न पडण्याची जर्मनी खबरदारी घेईलच.

हैदरपाशा—बगदाद रेल्वेच्या आसपास आपणांस वसाहती करतां येतील ही गोष्ट जर्मनीला स्वप्नवतच झाली. या रेल्वेच्या बाजूला अशा

वसाहती मुळींच झाल्या नाहींत. फक्त प्यालेस्टाइनजवळ एक मोठी वसाहत झाली एवढेंच. हिंदुस्थानांत हवेच्या योगानें व इतर कारणांनी ज्याप्रमाणें इंग्रजी वसाहत होणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें आशिया-मायनरमध्यें जर्मन वसाहत होणें शक्य नाहीं. हवेचें एक कारण आहेच शिवाय या रेल्वेच्या आजूबाजूस बरीच वस्ती असल्यामुळें त्यांस उठवून लावून परकीयांची वस्ती होणें दुरापास्तच होय आणि अशी परकीयांची वस्ती होऊं देणें अन्यायाचेंही आहे.

चालू लढाईत टर्की जर्मनीच्या तर्फे पडल्यामुळें टर्कीच्या साम्रा-ज्याचें काय होईल हें जरीं निश्चयानें सांगतां येत नाहीं तरी हा प्रदेश लढाई नंतर कोणाकडेही राहो ही रेल्वे सर्व राष्ट्रांच्या हुकमती खालीं असली पाहिजे. हा प्रांत टर्कीच्याच ताब्यांत राहिला असें जरी मानलें तरी टर्कीला स्वतःला रेल्वेची व्यस्था करताच येत नाहीं तेव्हां या रेल्वेची व्यवस्थावर सांगितल्या प्रमाणेंच झाली पाहिजे.

ही रेल्वेच्या बराचसा बोजा लादण्यांत आला होता व या बद्दल त्या लोकांनी तक्रारीही केल्या होत्या पण एकंदरीनें या रेल्वेनें शेतक-ऱ्यांच्या सोई फार झाल्यामुळें या तक्रारीकडे विशेषसें लक्ष देण्यांत आलें नाहीं.

ही रेल्वे बहुत्येक पुरी झालेली आहे. ती कोणाच्याही ताब्यांत असो व्यापारी दृष्टयाच तिची किंमत फार आहे यात संशय नाहीं, ही रेल्वे

आज दहा वर्षे बांधण्याचें काम चालू आहे आणि टोरस डोंगरांतून ती नेण्यांत फार परिश्रम पडलेले आहेत.

तुर्कस्थानांत वाटेल तिकडे रेल्वे झाली तरी त्यापासून टर्कीच्या प्रजेस फायदाच आहे. शेतांतील पीक बाह्य देशीं न जाणें, सुपीक जमीन लागवडी वाचून राहणें या गोष्टी देशांत दळण-वळण नसल्यानें होत असतात पण रेल्वे झाली असतां हें दळणवळण वाढून शेतकऱ्यांची स्थिती सुधारते यांत शंका नाहीं.

बगदाद रेल्वेचा मक्ता मिळावा ह्मणून जर्मनीनें पुष्कळ त्रास व पैसा खर्च केलेला आहे. क्रीट, आरमेनिया आणि म्यासेडोनिया या प्रांतांत सुराज्य व्यवस्था होण्यासाठींही याणें प्रयत्न केलेला नाहीं कारण तसें केलें असतां हमीदची गैरमर्जी होईल. आरमेनियन लोकांस रक्षणाचें स्थान दिल्यामुळें सुलतानाचा इंग्लंड व फ्रान्स यांच्यावर राग झाला होता पण याच वेळीं जर्मनीनें अशा प्रकारची मदत केलेली नाहीं. तुर्कस्थानांतील स्वार्थीपणाला जर्मनीनें आपला आत्मा बळी दिला असेंच यावरून ठरत नाहीं काय ?

## हेडझा रेल्वे.

प्यान इस्लामिझम हा नवा पंथ काढल्यामुळें अबदुल हमीदचा खाजगी कारभारी इझत पाशा यास दमास्कस पासून हेडझापर्यंत रेल्वे तयार करता आली. हा कारभारी फार बुद्धिवान होता व त्यास तुर्की

साम्राज्याच्या अंतर्व्यवस्थेची चांगली माहिती होती. हा जातीचा सीरियन आरब होता. हा तरुण असतांच कान्स्टांटिनोपल येथें गेला आणि त्यास मासेडोनिया प्रांतांत लवकरच न्यायाधिशाची जागा मिळाली. या प्रांतांत असतां त्याचें सुलतानाच्या प्रधानांसंबंधानें चांगलें मत झालें नाहीं. यानंतर कांहीं वर्षांनीं तो राजधानींत आला व त्यास एक महत्वाची न्यायासनाची जागा मिळाली. या न्यायासनापुढें तुर्की प्रजा आणि परकीय प्रजा यांच्यांत उत्पन्न झालेल्या तंट्यांचा निकाल असे. याची आणि सुलतानाची वारंवार गांठ पडे. यास सीरिया व आरबस्थान येथील माहिती आहे इतकेंच नव्हे तर ज्या प्रांतासंबंधानें युरोपियन राष्ट्रें आपणांस त्रास देत आहेत त्या मासेडोनिया प्रांताचीही माहिती यास उत्तम आहे असें जेव्हां सुलतानास दिसून आलें तेव्हां त्याच्याबद्दल सुलतानाच्या मनांत विशेष आदर उत्पन्न झाला. या गृहस्थाचा सुलतानावर विशेष पगडा बसूं लागला. हा इ. स. १९०८ च्या राज्यक्रांतिपर्यंत अबदुल हमीदचा खाजगी कारभारी होता व नंतर तो पळून गेला.

इस्लामी धर्मा प्रमाणें मक्केची यात्रा एकदा तरी घडलीच पाहिजे असें ठरलेलें आहे. या मुसलमानी क्षेत्रांस जाणारे वारकरी नेहमी नियमित असत. पण यात्रे करूंची ही संख्या अबदुल हमीदच्या पहिल्या भागाच्या कारकीर्दींत बरीच कमी झाली होती. पण अलीकडे मध्य

एशियांत रशियानें स्वाऱ्या केल्यामुळें ही संख्या बरीच वाढली होती. मक्का येथें जाण्यास बराच काळ लागत असल्यामुळें हे यात्रेकरू बरोबर पैसाही बराच आणीत असत. अबदुलच्या पहिल्या भागाच्या कारकीर्दींत हे यात्रेकरू यात्रेच्या मार्गावर मेलेले आढळत असत. ही यात्रा यात्रेकरूंची परीक्षाच करीत असे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. जार्डन नदीच्या पूर्वेस उत्तर अरबस्थानांत बेडौन्स नावाची एक रानटी मुसलमानी जात आहे. हे लोक यात्रेकरूंस लुटतात किंवा त्यांच्यापासून बेसुमार पैसा उपटतात. या प्रांतांत रेल्वे होण्यापूर्वी या जातीस किंवा तुर्की गव्हरनरास या यात्रेकरूंकडून भरभक्कम पैसा लुटावयास सांपडत असे. ही रेल्वे बांधण्यासाठीं सुलतानाचा खाजगी कारकारी इझतपाशा याणे सुलतानास भर दिली आणि सुलतानही खलीफ ह्मणून मुसलमानी प्रजेंत नाव मिळविण्यासाठीं ही रेल्वे बांधण्यास तयार झाला. याप्रमाणें इ. स. १९०० सालीं दमास्कसपासून हेडजा पर्यंतची रेल्वे बांधण्याचें काम चालू झालें. हैफापासून होरन व दमास्कस पर्यंत एक रेल्वे रस्ता यापूर्वीच तयार झाला होता. ही रेल्वे सुरू होण्यापूर्वी सुलतानानें खलीफ ह्मणून कीर्ति मिळावी आणि मुसलमानी धर्माचा प्रसार व्हावा ह्मणून आफ्रिकेंत कांहीं जुन्या मशीदींचा जीर्णोद्धार केला व कांहीं नव्या बांधल्या. वर हेडजा रेल्वे सांगितली ती सुद्धां याच हेतूंनी तयार करण्यांत आली होती, येमेन प्रांतांत राहणाऱ्या

आरबावर सुलतानाचा चांगलासा वचक नव्हता तेव्हां तो बसावा ह्मणून त्यानें ही रेल्वे बांधली असेंही ह्मणतात. ही रेल्वे तयार करण्याचें काम फार जोखमाचें व खर्चाचें होतें आणि त्यांतल्या त्यांत सुलतानानें अशी इच्छा प्रदर्शित केली होती कीं यात्रेकरूंसाठीं जी रेल्वे तयार करावयाची ती मुसलमानांच्या फंडानेंच तयार झाली पाहिजे यामुळें हें काम फार अवघड झालें होतें. ही रेल्वे तयार करण्यासाठीं जगावरील सर्व मुसलमानांनी वर्गणी दिली होती. ही रेल्वे तयार करण्याचे नकाशे व त्यावर देखरेख करण्याचें काम जरी परकीयानींच केलें होतें तरी ही रेल्वे मुसलमानी फंडांतूनच झालेली आहे असें सर्वांचें मत आहे. या रेल्वेच्या सहाय्यानें ईजिप्तमध्यें गेलेलें आपलें वजन पुनः उत्पन्न होईल असेंही सुलतानास वाटलें होतें. तें कसेंही असलें तरी ही रेल्वे यात्रेकरूंस फार उपयोगाची झालेली आहे आणि त्याबद्दलचें बरेंचसें श्रेय अबदुल हमीद यांस दिलें पाहिजे यांत संशय नाहीं ( या रेल्वेसाठीं उभारलेल्या फंडाच्या पैशाचा हिशेब मिळावा तसा कागदोपत्रीं मिळत नाहीं असा एक आरोप सुलतानाविरुद्ध करण्यांत आलेला होता.)

वर सांगितलेल्या रेल्वेशिवाय आणखी पांच फांटे तयार झालेले आहेत. मारमोरा समुद्रावरील मुडानियापासून ब्रुसापर्यंतचा एक. हा फाटा अबदुल हमीद गादीवर येण्यापूर्वींच अर्धवट तयार झाला होता. दुसरा फाटा मुडानियापासून स्मर्नापर्यंतचा होय. तिसरा सुमारें ४०

मैलाचा फाटा जाफापासून जेरूसेलेम पर्यंतचा होय. दमास्कस येथें दोन फाटे गेलेले आहेत. पहिला फ्रेंच कंपनीनें तयार केलेला बेरूट येथून निघालेला आहे आणि दुसरा हैफा पासून निघालेला आहे.

अबदुल हमीदच्या कारकीर्दीत रेल्वे प्रसार फार झालेला नाहीं. हा प्रसार थोडा होण्याचें कारण त्याची राज्य करण्याची पद्धतच होय. या सुलतान साहेबांस कोणतेंही सार्वजनिक हिताचें काम करण्याची हौसच नव्हती. या सुलतानाचा विशेषें करून रेल्वेवर फार कटाक्ष होता. त्याचें ह्मणणें असे होतें कीं जोंपर्यंत मुसलमान लोकाजवळ उंट आणि घोडे आहेत तोंपर्यंतच ते सुखी राहतील. पण मौज अशीं कीं हेच सुलतान साहेब मि. चेंबरलेन व इतर युरोपियनाजवळ अशी प्रौढी मारीत कीं माझ्या राज्यांत जिकडे तिकडे रेल्वेचें जाळें पसरलें पाहिजे. अशा प्रकारचें जाळें तयार करण्यास कोणी तयार झाला तर त्याच्या कार्यांत अठरा विघ्नें हेच सुलतान आणीत असत. राज्यांत सुधारणा मागणारे सुधारक यांचा बीमोड केल्यावर त्यानें आपल्या खुषमस्कऱ्यांस 'बक्षिस' मिळविण्यास उत्तम संधी दिलेली होती. सरकारी कामाचा मक्ता हवा असेल तर या खुषमस्कऱ्यांची पूजा केलीच पाहिजे अशी वाहिवाट पडून गेली होती. रेल्वेचीं कामें करण्यांत अत्यंत निष्णात असा एक युरोपियन गृहस्थ कान्स्टांटिनोपल येथें आला. यास तुर्की मुख्य वजिरानें मुद्दाम बोलावून आणलें व त्यांस

एखाद्या रेल्वेचा मक्ता आमच्या सरकाराजवळ कां मागीत नाहीं?' असें विचारलें. यावर या व्यापाऱ्यानें असें स्पष्ट उत्तर दिलें कीं, 'आह्मी कोणतेंही काम सत्य मार्गानेंच करीत असतो आणि तुमच्या येथें तर असा प्रकार तेव्हां येथें काम करण्याची आमची इच्छा नाहीं.' कोणत्याही कामांत एकदा लांच खाण्याची प्रवृत्ति झाली ह्मणजे खोटें काम पसंत केलें जातें, वाजवी पेक्षां फाजील खर्च सरकारांतून देण्यांत येतो आणि अशाच प्रकारचे नाना प्रकार होतात. या लाच खाण्याच्या वहिवाटीस अबदुल हमीद आळा घालूं शकला नाहीं. यासंबंधानें कित्येकांचें तर असें ह्मणणें आहे कीं मोठाल्या कामांत खाल्लेल्या भरभक्कम लांचांत खुद्द हमीदचा भाग असे.

---

### भाग ११ वा.

# तुर्की सरकारी कर्ज.

## सार्वजनिक कर्जाच्या तुर्की खात्याची एक गोष्ट.

अबदुल हमीदच्या पूर्वींचा सुलतान अबदुल हझीज याणें सरकारी तिजोरींतील पैसा अनाठाई व चैनानें खर्च केल्यामुळें अबदुल हमीद गादीवर आला त्यावेळीं सरकारी तिजोरींत असावा तसा पैसा

नव्हतां. सरकारी तिजोरींत पैशाचा इतका तुटवडा पडला होता कीं सरकारी तऱ्हेनें काढलेल्या कर्जाचें व्याज देण्यासाठीं टर्कीतील व टर्कीच्या बाहेरील सावकारांची मनधरणी करावी लागली ! कर वसूल करण्याची पद्धत तर इतकी घाणेरडी होती कीं, कराच्या वसुलापैकीं शेकडा ४० टक्के सरकारी तिजोरींत येत. बाह्य प्रदेशीं काढलेलें हें कर्ज १९, ०७,९०,००० तुर्की पौंड होते. ( तुर्की पौंड १८ शिलिं. ९ पेन्स. ) इ. स. १८७५-७६ सालीं सरकारी खर्चजारीनें वाढला; परंतु उत्पन्न कमी झालें. या चमत्कारिक परिस्थितीवर कांहीं तरी उपाय काढला पाहिजे असें तुर्की सरकारास वाटूं लागलें. आतां या सरकारास नवें कर्ज कोणी देईनासा झाला. गलाटा पेढीवाले जें थोडें बहुत कर्ज देत त्यावर या सरकाराचा निर्वाह चालू होता.

ता. ११ सपटेंबर १८७५ सालीं तुर्की सरकारानें जो एक खलिता काढला तसें वर्तन कोणीही खाजगी माणसानें केलें असतें तर त्यानें दिवाळें काढलें असेंच ह्मणण्यांत आलें असतें. या खलित्यांत व्याजाच्या रकमे पैकीं निम्मे रक्कम देण्याचें तहकूब करण्यांत आलें. पण असें केलें तरी पैशाची वाण पुरी होईना. तेव्हां आणखी युक्त्या योजण्यांत आल्या. तुर्की सरकाराच्या नावानें कागदाच्या नोटी काढण्यांत आल्या यांस तुर्की भाषेंत 'केसमेस' ह्मणतात. तुर्की साव्हरेन हें मापाचें नाणें झालें. एक सावरेन नोटीची किंमत १५० तुर्की पियास्टर्स रुप्याच्या नाण्या बरोबर

धरण्यांत आली. मनोतीचा दर १०८ होता.या वेळीं तुर्की सरकारानें या नोटी संबंधानें इतकी शिफारस केली कीं, गरीब रयत आपल्या जवळील सोनें रुपे मोडून या नोटा विकत घेऊं लागली. हळूहळू या कागदी नोटांची किंमत इतकी उतरली कीं थोड्याच आठवड्यांत १६० कागदी नोटा एक सावरेनला मिळूं लागल्या. पितृतुल्य सरकार फायदाच करीत आहे असें भोळ्या प्रजेस वाटूं लागलें. हा खोटा समज इतका बळावला कीं कान्स्टांटिनोपल मधील मोठमोठाले व्यापारीही या नोटा खरेदी करूं लागले. पण रशीया बरोबर जेव्हां टर्कीची लढाई जुंपली तेव्हां या नोटांची खरी किंमत त्यांच्या प्रत्ययास आली. या लढाईच्या वेळीं एका सोन्याच्या लायरची ( नाणे ) किंमत १६० पासून ३०० रुपयांच्या पियास्ट्रा ( नाणे )इतकी झाली अर्थात आतां या कागदी नोटा कोणीही घेईनासे झाले. ही रशियाची लढाई संपल्यावर तुर्की साम्राज्यांतील पेढ्या व विशेषें करुन 'इम्पीरियल ऑटोमन ब्यांक' सरकारास नवें कर्ज देईनाची झाली. पूर्वीं दिलेलें कर्ज परत द्या ह्मणजे नवें देतों असें सर्व पेढ्या ह्मणूं लागल्या. या कर्जा संबंधानें त्यांनी अशी एक व्यवहारिक सूचना केली कीं, 'सहा पर्यायाचे कर' ह्मणून जे कर प्रजेवर लादलेले आहेत त्यांची वसुली आमच्या स्वाधीन करावी. याबद्दल बराच वाद होऊन शेवटीं ही सूचना ता.२२ नवंबर १८७९ मध्यें मान्य करण्यांत आली. हे सहा कर तंबाकु, मीठ, दारू, स्टांप, मच्छी, रेशीम यावर बस-

विकले होते. पूर्व रुमेलिया आणि सायप्रस या सरकारां कडून येणारा पैसा व बलगेरियाची खंडणी हा सर्व वसूल आतां सावकारांच्या हातीं गेला.

इतकी व्यवस्था केली तरी नवें कर्ज मिळण्यास पंचाइतच पडूं लागली. आटोमन ब्यांक व इतर पेढ्या यांणी सम्मत्ती दिली तर हें नवें कर्ज मिळत असें. आपण दिलेलें कर्ज व बाह्यदेशीं असलेले सावकार यांचें व्याज देतां येईल एवढें सरकारी उत्पन्न आपल्या हातीं राहील अशी खबरदारी हे सावकार घेत असत. राज्यकारभार चांगला ठेवला तरच पूर्वीचे सावकार स्वस्थ बसतील व बाह्यदेशीचे सावकार नवें कर्ज देतील असें अबदुल हमीद यांस वाटूं लागलें.

असें व्याज देण्याचें तहकूब केल्यामुळें तुर्की पतीस बराच धक्का बसला. इंग्लंड व फ्रान्स मधील सावकार तुर्की कर्ज विकत घेण्यास तयार असत याचें कारण तें तें सरकार त्यास जे व्याज देत त्याहून १ किंवा दीड टका व्याज तुर्की सरकार जास्त देत असे. असा फरक पडत असल्यामुळें मध्यम वर्गाचे सावकार तुर्की कर्जच घेत असत. तसेंच ज्या इंग्रज लोकांस तुर्कस्थानचा अनुभव होता ते इंग्रज तुर्की हमीबद्दल बेफिकीर असत. एका बड्या लार्डानें तुर्की कर्ज बरेंचसें घेतलें होतें हें त्यावेळीं सर्व प्रसिद्धच होतें, तेव्हां तुर्की सरकारास बाह्य देशांतून पुष्कळ कर्ज मिळे यांत विशेष आश्चर्य नाहीं. या तुर्की

कर्जाच्या प्रकरणांत लहान लहान फ्रेंच सावकार एक प्रकारचा व्यापार करीत आणि ह्मणून हें तुर्की कर्ज फ्रान्स देशांत फार खपत असे. हे फ्रेंच सावकार या कर्जा संबंधानें एक प्रकारचा जुगार खेळत असत. या जुगारास तेजी मंदी असें नांव दिल्यास वावगें होणार नाहीं. कोणी भाव उतरेल ह्मणून रकम लावीत तर कोणी वाढेल ह्मणून पैसा लावीत. कर्ज रोख्यांचा भाव चढ उतर झाला ह्मणजे कित्येकांस पैसा मिळे तर कित्येक गमावून बसत. निम्मे व्याज देण्याचें तहकूब केल्याचा तुर्की सरकारचा ठराव १८७५ सालीं झाली. या वर्षापासून चार वर्षे- पर्यंत या ठरावामुळें सरकारी कर्ज रोखे व ब्यांकांचे कर्ज रोखे यांचाही भाव एकदम उतरून गेला होता. उहारणार्थ ओटोमन ब्यांकेच्या भागांचा भाव दोन तीन दिवसांत २ पौंड १९ शिलिंगावर आला होता पण पुढील दोन वर्षांत तो २९ पौंडपर्यंत वाढला. ही चढ उतर प्यारिस मधल्या जुगारी धंद्यामुळें होत असे. भावांत अशा प्रकारें डळमळीत- पणा आल्यामुळें युरोपांतून नवें कर्ज मिळणें अशक्य होय असें तुर्की- प्रधानास वाटूं लागलें. तेव्हां ता. ३ आक्टोंबर १८८० सालीं तुर्की सरकारानें आपल्या दरबारांतील परकीय वकिलांस असें कीं, कळविलें युरोपांतील सावकारांनी आपले मुखत्यार निवडून त्यांस कान्स्टांटिनोपल येथें कर्जाची व्यवस्था करण्यासाठीं पाठवावे. तुर्की सरकारचें हें ह्मणणें बाह्य देशींच्या सावकारांस पटलें. इंग्रज. फ्रेंच, डच, आस्त्रियन, जर्मन आणि इटालियन सावकारांनीं आपापले मुखत्यार निवडले.

राइट आन. राबर्ट बर्क ( पार्लमेंट मेंबर ) हे ब्रिटिश व दच सावकारा तर्फे मुखत्यार होते. एक सर्व राष्ट्रीय कमिशन नेमण्यांत यावें असें प्रथमतः ठरविण्यांत आलें पण यांस दोन विरुद्ध कारणें मि. बर्क यांणी सांगितलीं. पहिलें कारण मुखत्याराची सहसा एकवाक्यता होणार नाहीं आणि दुसरें ज्या व्यवस्थेनें तुर्की सरकारास वगळलें जाईल अशी व्यवस्था तुर्की सरकार मान्य करणार नाहीं ह्मणजे यजमानाशिवाय मेजवानी असाच याचा अर्थ होईल.

दच सावकारांचें देणें टर्कीला फार होतें तेव्हां त्यांनी आपला मुखत्यारनामा इंग्रजांच्या स्वाधीन केला हें उत्तमच केलें. इंपीरियल आटोमन ब्यांक फ्रेंच सावकारातर्फे झाली कारण या ब्यांकेचें बरेंचसें काम प्यारिस येथें होत होतें. जर्मन सरकारातर्फे हेर बीच रोबर हे होते. इतालीच्या सावकारातर्फे इतालियन चेंबर ऑफ कामर्स काम करीत होती. हे मुखत्यार व टर्कीचे सहा मुखत्यार यांच्यांत बोलणें सुरू झालें या वादविवादाचा निकाल ' मुहारेम ' नांवाचा एक कायदा पसार करून करण्यांत झाला. हा कायदा ता. २० डिसेंबर १८८१ अमलांत आला.

या कायद्यानें तुर्की देवघेवेस बराच फायदा झाला. तुर्की कर्जाची व्यवस्था लावण्यासाठीं एक कौन्सिल नेमण्यांत आलें आणि इंग्रज व फ्रेंच सावकारांची संख्या विशेष असमुळें या कौन्सिलचा अध्यक्ष

आळीपाळीनें फ्रेंच किंवा इंग्रज असावा असें ठरलें. या अध्यक्षाची मुदत पाच वर्षांची होती.

या कौन्सिलची प्रगति कसकशी होत गेली त्याचा इतिहास देण्याचें कारण नाहींच पण या कौन्सिलनें ज्या सहा करांची वसुली या कौन्सिलच्या स्वाधीन करण्यांत आली होती ती वसुली व्यवस्थेनें केली व सावकार लोकांस वेळच्यावेळीं व्याज मिळूं लागलें. या व्यवस्थेनें तुर्की सावकारांचेंही हित झालें. तुर्की सरकारचें उत्पन्न इ. स. १८८२ पासून १९०३ पर्यंत थोडें थोडें वाढतच चाललें. इ. स. १९०७ सालीं तर हें उत्पन्न फारच वाढलें. कर्जाचें व्याज व बुडित रक्कम वजा जातां बाकी राहिलेल्या रकमेपैकीं ३ चतुर्थांस रक्कम तुर्की सरकारास मिळूं लागल्यामुळें त्या सरकारची स्थितीही सुधारली.

तुर्की सरकारास या कौन्सिलची महती इ. स. १८८९ सालापासून कळूं लागली तेव्हां रेल्वेसंबंधानें ज्या हम्मी घेण्यांत आल्या होत्या त्याची व्यवस्थाही याच कौन्सिलकडे देण्यांत आली. या व्यवस्थेनें सावकारांचें कल्याण झालें कीं नाहीं हें जरी सांगतां यावयाचें नाहीं तरी त्यामुळें तुर्की सरकारचा फार फायदा झाला हें निःसंशय खरें आहे पुढें पुढें आणखीही कर वसूल करण्याचें काम या कौन्सिलकडे देण्यांत आलें. या गोष्टी केल्यामुळें राज्यव्यवस्था सुरळीत झाली, कर देणारास योग्य न्याय मिळूं लागला, तुर्की खजिन्यांत पैशाचा संचय झाला आणि

सावकारांचीं तोंडें बंद झालीं. शेवटीं. शेवटीं तर बहुत्येक सर्व करांची वसुली याच कौन्सिलकडे देण्यांत आली असती पण मध्यंतरी राज्य क्रांतीच झाली व लढाई उपस्थित झाली.

इ. स. १९०८ सालीं राज्यक्रांति झाली. या राज्यक्रांतीनें या कौन्सिलांत विशेष वडामोड झाली नाहीं. या कौन्सिला मार्फत शिक्षण मिळालेले लोक कराची वसूली तुर्की लोकांपेक्षां जास्त - हुषारीनें करतील असें राज्यक्रांति घडवून आणणाऱ्या तरुण तुर्की लोकांसही वाटत होतें या कौन्सिलांत काम करणारे बहुत्येक इंग्रज होतें. यामुळें हें काम इतर कोणत्याही देशांतील सुव्यवस्थेंप्रमाणेंच चालत होतें. या कौन्सिला-मार्फत इ. स. १९००-१९०४ सालीं २९,७१,९८४ पौंड वसूल आला. पण १९११-१९१२ चा वसूल ५०,६१,३३५ पौंड झाला होता. या कौन्सिलचा हा कारभार तीस वर्षें चालू होता व त्या मुदतींत शेकडा ७९ टक्के वसूल वाढलेला आहे.

या कौन्सिलानें सावकारांचें व्याज देऊन कर्जही कांहीं प्रमाणांत फेडलें आहे. इ. स. १९०३ सालीं ही रक्कम २,२२,२९८ पौंड होती पण १९१३ सालीं ही रक्कम ६,२१,६१० पौंड होती. सरासरी फेडलेल्या कर्जाची रक्कम शेकडा १० होती. यावरून कौन्सिलनें तुर्की सरकारास या कामीं चांगलीच मदत केली यांत संशय नाहीं. या शिवाय तुर्की खजिन्यांत २ कोटि पौंडाची शिल्लक पाडण्यांत आली होती.

हें कौन्सिल स्थापन झालें त्यावेळीं जर्मनी आणि इंग्लंड याच्यांत एक गुप्त तह होऊन बगदाद रेल्वेचा बोजा कमी करण्यांत येईल असें या तहांत ठरलें होतें अशी कंडी उठली होती. या रेल्वेची तुर्की सरकारानें घेतलेली हमी जड होती हें खरें पण जों जों रेल्वेचा प्रसार होत चालला तो तों त्या रेल्वेचें उत्पन्नही वाढत चाललें अर्थात हमीची रकम हळू हळू हलकी होत चालली होती. ही हमी तुर्की सरकारनें १९०८ सालीं ७,७१,५०९ पौंड भरली होती पण १९१२ सालीं ती ३,४१,३८८ पौंड होती ह्मणजे निम्मेहून अधिक कमी झाली असें ह्मणतां हेईल.

या कौन्सिलच्या रचनेनें तुर्की साम्राज्याचें उत्पन्न वाढलें हें कोणासही कबूल करावें लागेल. या कौन्सिलांत ज्या निरनिराळ्या राष्ट्रांचे मुखत्यार होते त्यां पैकीं इंग्लंड शिवाय सर्वांस त्या सरकारनें मान्यता दिलेली होती. इंग्लंड मात्र या कामीं त्रयस्थ होतें इतकेंच् नाहीं तर खुद्द इंग्लंडचा तुर्की दरबारांतील वकील 'व्यापारी' देवघेवीशी आह्मांस कांहीं कर्तव्य नाहीं' असें तुसडेपणाचें उत्तर देत असत अशा प्रकारच्या प्रश्नांत जर्मनीचा मुखत्यार फार लक्षघाली आणि ह्मणूनच जर्मनीचें वर्चस्व वाढलें. आपल्या देश बांधवांच्या व्यापारी हिताहिताशीं राजकीय घडामोडीची सांगड घालावयाची नाहीं हें तत्व फार पुरातन कालचें व बादशाही थाटाचें होतें पण हेंच तत्व इंग्लंडनें तुर्कस्थानांत लागूं केलें होतें

व याच्याच योगानें तुर्कस्थानांत इंग्लंडपेक्षां जर्मनीचा इतमाम फार वाटला होता. राजकीय वडामोडी व्यापारी वडामोडीवरच अवलंबून असतात ही परिस्थिती पूर्वात्य राष्ट्रांत फार आढळते.

या कौन्सिलच्या व्यवस्थेनें तुर्की कर्जाची सुव्यवस्था लागली पण या शिवाय आणखीही फायदे झालेले होते. कराची वसुली सुव्यस्थित झाली. कर वेळच्या वेळीं वसूल न केल्यामुळें जें नुकसान होई तें होईनासें झालें. कर वसूल करणारे कोणत्याही प्रकारची भीति अगर कोणाचेंही भय मानीत नव्हते. तिजोरींत जाणारा पैसा वाढूं लागला होता. कराची आकारणी गैरशिस्त करण्यांत आली होती ती व्यवस्थित करण्यांत आली. श्रीमंत लोक कराची आकारणी करणारास लांच देतअसत त्यामुळें त्यांच्यावर वाजवीपेक्षां कमी आकारणी होत असे आणि गरीब लोकांस अधिक आकारणी झाली तरी दाद मागण्यास रस्ताच नव्हता. कराची वसुली करणारे इन्स्पेक्टर यांस तनखा देण्यांत येत होता व त्यांच्या मागण्या वेळोंवेळीं पुऱ्या करण्यांत येत असत यामुळें विश्वासू माणसें नोकरीस राहूं लागलीं.

कराची आकारणी करण्यासंबंधानें ज्या सुधारणा करण्यांत आल्या त्या फार महत्वाच्या होत्या. या नव्या आकारणीवरून पूर्वीचे आकार करणारे अधिकारी लांच खात असत असें सिद्ध झालें आणि शेतकऱ्यांवर विशेष बोजा न करतां राज्याचें उत्पन्न वाढवितां येतें हेंही

या आकारणीवरून दिसून आलें. कौन्सिलनें इन्स्पेक्टर वगैरे जागीं एतद्देशीय माणसेंच नेमिलीं होतीं. तुर्की कामगार विश्वासपात्र व सचोटीचे असूं शकतात हें या कौन्सिलनें सोदाहरण सिद्ध करून दाखविलें होतें. सचोटीनें वागणें हाच उत्तम मार्ग ही गोष्ट चांगल्या तऱ्हेनें सिद्ध करून दाखविल्यामुळें तुर्की कमिटींत विशेष सुधारणा झाली.

या कौन्सिलच्या प्रत्येक कृतीवर सहायानें दृष्टी ठेवणारे वरेच लोक असतां, ब्रिटिश सरकारची सहानभूति नसतां, अबदल हमीद या कौन्सिलच्या भलेपणाबद्दल भीतिग्रस्त असतां. आणि रशिया व जर्मनी यांचा थोडासाही विश्वास नसतां या कौन्सिलनें जी कामगिरी करून दाखविली ती खरोखरच स्तुत्य होय.

कराची आकारणी व वसुली यथान्याय होणें. आणि तुर्की सरकाराशीं कोणत्याही प्रकारची वासा घीस न होतां त्या कौन्सिलचें चालू राहणें आणि उत्तरोत्तर राज्याचें उत्पन्न वाढते आहे या गोष्टी पाहून अबदलहमीद व त्याचे प्रधान यांस आनंद वाटत होता. या कौन्सिलवरील जर्मनीचा घविश्वास तर इतका विरघळून गेला कीं, रेल्वेसंबंधीं कराची वसुली याच कौन्सिलमार्फत व्हावी असें त्यानेंच स्वता सुचविलें होते.

या कौन्सिलचें काम इतकें उत्कृष्ट होण्यास त्याची व्यवस्था परकीयांच्या हातीं होती हें होय. हें कौन्सिल आपलें काम करीत असता

एतद्देशीय लोकांसही सचोटीनें वागण्याचें शिक्षण देत होते. कौन्सिल च्या व्यवस्थेस अबदुल हमीद फाटा मारील अथवा मोहमच्या कायद्यांत असा फेरफार करील कीं, त्यामुळें कौन्सिलास कामच करता येऊं नये, अशी प्रथम भीती वाटली होती. पण तसें कांहीं झालें नाहीं.

तुर्की साम्राज्यांत लबाडीनें तंबाखू फार येत असे. या लबाडीस आळा घालण्यासाठीं कौन्सिलनें एक निराळीच कंपनी स्थापन करविली. ही कंपनी फ्रेंच लोकांनीं स्थापन केली होती. या कंपनीनें कौन्सिलशी असा करार केला होता कीं, तंबाखूवरील कर वसूल करण्याच्या मक्त्या-बद्दल या कंपनीनें कौन्सिलास दरवर्षी ७,९०,०० पौंड द्यावें. ही कंपनी तुर्की सरकारचे मुखत्यार ह्मणून काम करीत होती. या कंपनी-बद्दल खुद्द अबदुल हमीद यांस फारशी सहानुभूति नव्हती. कारण अशा रितीनें लबाडीनें तंबाखू आणणारे लोक ह्मणजे कमी पगारावर काम करणारे लष्करी शिपाईच होते. बरीचवर्षे पर्यंत या कंपनीचे अधिकारी आणि लबाडी करणारे लोक यांच्यांत खटके उडत असत. पण असे खटके उडवून कंपनीनें या लबाडीस चांगलाच आळा घातला होता.

या कौन्सिलनें रेशमाचा व्यापार उर्जितावस्थेस आणला. इ. स. १८८० सालीं हा व्यापार नामशेष झाला होता. सतराव्या शतकांत तो ब्रुसाच्या आसपास चांगला भरभराटीत होता. त्या काळीं तुतींचीं झाडें

त्या प्रांतांत खंडोगणती होतीं. पण रेशमाच्या किड्यांवर रोग आल्यामुळें ते किडे नाहींसे झाले होते. अर्थात किडे नसल्यामुळें हीं झाडें तोडून टाकण्यांत आलीं होतीं. या रेशमाच्या किड्यावरील रोगावर एका फ्रेंच शोधकानें एक औषध शोधून काढलें होतें. या शोधकानें या किड्यांची अंडीं सूक्ष्मदर्शक यंत्रांतून तपासली. हीं अंडीं काळीं दिसलीं तर त्या अंड्यांची आई मेली असें त्यानें ठरविलें होतें. अशा तऱ्हेची परीक्षा करण्यासाठीं त्यानें एक विद्यालयच तयार केलें. या शाळेंत जीं अंडीं रोगग्रस्त नाहींत त्यांची उत्तम प्रकारें जोपासना करण्यांत येई. या शाळेंत मलमलीच्या लहान लहान पिशव्या तयार करून ठेवण्यांत आल्या होत्या. प्रत्येकांत मेलेली आई व तिचीं अंडीं ठेविलेलीं असत. तेथील टेबलावर एक सूक्ष्मदर्शक यंत्र ठेविलेलें असे. या यंत्रांत कोण-तीही वस्तू १२०० पट दिसत असे. रोगानें न पिच्छाडलेलीं अंडीं कोणचीं हें शोधून काढण्याची पद्धत फार सोपी होती. एक पिशवी उघडावयाची. सुकविलेला किडा पुन्याच्या पाण्यानें भरलेल्या लहानशा पाण्यांत टाकावयाचा व एका काडीनें तें पाणी थोडें हालवून त्याचा एक थेंब सूक्ष्मदर्शक यंत्रांत ठेऊन बघावयाचा. या थेंबाचा रंग काळा दिसल्यास ती पिशवी फेकून द्यावयाची. कारण या रंगावरून किडा रोगाचा आहे. असें ठरलेलें आहे. पण काळा रंग न दिसल्यास ती पिशवी जतन करून ठेवावयाची आणि त्यांतून जीं अंडीं निघतील तीं तुतीच्या

पानांवर ठेवावयाचीं. या प्रमाणें या शाळेंत शिक्षण मिळत होतें. वर सांगितलेली दुर्बीण १२ पौंडास विकत मिळत असल्यामुळें लहान खेड्यांत वर्गणीनें ही दुर्बीण विकत घेण्यांत येत असे; आणि तेथील तरुण मुलांस हा एक उद्योगच झाला होता. हा धंदा पुढें इतका वाढला कीं, पूर्वी तुतीच्या पानास जी किंमत पडत असे, त्याच्या दसपट आतां त्या पानांची किंमत येऊं लागली. याप्रमाणें बुडालेला रेशमाचा धंदा या कौन्सिलनें पुनः ऊर्जितावस्थेस आणला.

द्राक्षाच्या लागवडीचा धंदाही एक प्रकारचा रोग पडून बुडण्याच्या पंथास लागला होता. या रोगावर एका फ्रेंच दाक्तरानें औषध शोधून काढून, हा रोग नाहींसा केला व हा धंदा कौन्सिलनें पुनः चालू करून दिला.

अब्दुल हमीदच्या कारकीर्दींत जर कोणत्या खात्याची विशेष सुधारणा झाली असेल तर ती सरकारी कर्जखात्याचीच होय. या खात्याकरतां जें कौन्सिल नेमण्यांत आलें होतें त्यानें कर्जाची फेड केलीच पण कराची वसुलीही व्यवस्थित केली. या कौन्सिलनें सचोटीनें सरकारची नोकरी कशी बजवावी हेंही तरुण तुर्की लोकांस शिकविलें.

# भाग १२ वा.

## सैन्य आणि आरमार.

अबदुल हमीदच्या कारकीर्दींत सैन्य अगदी दुर्बळ बनलें होतें. त्यांस नानाप्रकारचीं व्यसनें जडलीं होतीं. या सैन्याच्या उज्वलतेबद्दल सर्व प्रजा व विशेषतः मुसलमान लोक फार नाखूष होते. तुर्की लोक जातीचे लढवय्ये होत. त्यांस शेतकीची विशेष माहिती नाहीं. व्यापार करणें हलक्या दर्जाचें आहे, असें ते अज्ञानामुळें मानतात. तुर्की लोकांच्या या नावडीचा फायदा घेऊन साम्राज्यांतील बहुत्येक व्यापार-धंदा काफीर लोकांच्या हातीं होता. हे तुर्की लोक खेड्यापाड्यांतून सत्रंज्या तयार करण्याचा धंदा करतात पण त्यावरही ख्रिस्ती देखरेख असते. पण त्यांचा अत्यंत आवडता धंदा ह्मणजे शिपाईगिरी हाच होय. सैन्यांत नोकरी करणें ह्मणजे कांहीं कालपर्यंत कवाईत खेचावयाची व बाकीचा वेळ चैनींत व गप्पागोष्टी करण्यांत घालवावयाचा, हें त्यांच्या स्वभावास फार आवडतें. पुष्कळ लढायांत आणि शेंकडो वर्षें तुर्की माणूस उत्तम प्रकारें लढलेला आहे. इ. स. १८७७–७८ च्या तुर्की–रशियन लढाईंत तो युरोपांत व आशियामायनरमध्येंही उत्तम तऱ्हेनें लढलेला आहे. त्या जातीचा आजपर्यंतचा सर्व नांवलौकिक

लढाई लढण्यामुळेंच झालेला आहे. दुसऱ्या महंमदानें वालून दिलेला धडा त्यानें -होड्स व बेलग्रेडच्या वेढ्यांत उत्तम रितीनें गिरविला आहे. या वेढ्यांत तुर्कांनीं हीं दोन्ही ठिकाणें सर केलेलीं आहेत आणि प्लेवना येथें जरी तुर्की लोकांचा पराजय झाला, तरी या सर्व वेळीं तुर्कांनें आपली तरवार गाजविलेली आहे यांत संशय नाहीं. मारिट्झाच्या लढाईत दक्षिण स्लाव्ह लोकांस चोपून काढण्यांत आणि कोसोव्होपोल लढाईत उत्तर स्लाव लोकांस दातीं तृण धरून गुलाम बनविण्यांत तुर्कांनीं आपलें युद्ध कौशल्य उत्तम रीतीनें दाखविलें आहे. मोहाझ येथें झालेली कत्तल आणि बुडापेस्टचा वेढा व पतन या गोष्टी तुर्कांचा लष्करी योग्यता व सहनशीलता यांची चांगली साक्ष पटवतात. या सर्व लढाया जानिसारी जातीच्या लोकांनीं जिंकिल्या आहेत व त्यांच्या अंगांत मूळचें ख्रिस्ती स्तु आहे हें खरें, पण ती जात तुर्की जातींत एकरूप झाल्यामुळें त्या राष्ट्रांत तुर्कीशौर्यच होतें असें ह्मटलें पाहिजे. गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत दुसऱ्या महंमदानें आपल्या सैन्यास पाश्चिमात्य कवाइत शिकविली आणि क्रिमियाच्या लढाईत तुर्की शिपाईब्रच्यानें चांगलेंच नांव मिळविलें होतें. या लढाई नंतर या तुर्की सैन्यांत फ्रेंच अधिकारी ठेवण्यांत आले आणि त्यांनींही या सैन्यांत चांगली सुधारणा केली.

अबदुल हमीद जेव्हां गादीवर बसला तेव्हां तुर्की सैन्याची स्थिती

चांगली होती. दुसऱ्या महंमदानें केलेल्या सुधारणा आणि क्रिमीयाच्या लढाईनें दिलेले धडे या सैन्यास चांगले शिक्षक झाले होते. पण इ. स. १८७०–७१ सालीं जर्मनांनें फ्रान्सचा जो पराजय केला त्यामुळें अबदुल हमीदनें आपल्या सैन्यांत जर्मन अधिकारी ठेविले. पण अबदुल हमीद स्वतःच्या संरक्षणापलीकडे साम्राज्यांत सुधारणा करण्यासंबंधानें अत्यंत बेफिकीर असल्यामुळें राजकीय वातावरण बिघडलेलें होतें. अर्थात सैन्याचीही स्थिती दुबळी झालीं होती. देशांत पोलिशी अम्मल चांगला आहे हें दाखविण्यासाठीं ज्याप्रमाणें त्यानें इंग्रजी अंमलदार त्या खात्यांत ठेविले होते, त्याचप्रमाणें आपलें सैन्य युरोपांतील कोणत्याही सैन्याच्या इतकें योग्यतेचें आहे हें बाह्यतः युरोपास वाटावें ह्मणून त्यानें सैन्यांत जर्मन अधिकारी नेमले होते. वस्तुतः या इंग्रजी किंवा जर्मन कामदारांस कांहींच काम करावें लागत नव्हतें. जर्मनीतून गेलेल्या अधिकाऱ्यांस दोष देण्यांत अर्थ नाहीं. तरीपण जनरल व्हानडेर गाझ यापासून खालील सर्व जर्मन अधिकाऱ्यांनीं सैन्यांत फायदेशीर उलाढाल केली होती. आणि या सुधारणासुद्धा सैन्याचा देखावा उत्तम दिसावा एवढ्याच धोरणानें करण्यांत आल्या होत्या. यिलडिझ राजवाड्याच्या बाहेरच्या बाजूस मुद्दाम नवीन बांधलेल्या मशिदींत अबदुल हमीज जेव्हां दर शुक्रवारीं निमाज पढण्यास जाई त्यावेळीं सैन्याचा देखावा उत्कृष्ट करण्यांत येत असे. राज-

वाड्यानरील हें सैन्य उत्तम पोषाखांत नटलेलें असे. पण इतर ठिकाणचे त्यांचे बंधू लकतऱ्या घालून आयुष्य कंठीत होते. ज्यांनी युरोपियन राष्ट्रांचें सैन्य पाहिलें असेल त्यास तुर्की साम्राज्यातील प्रांतिक सैन्य पाहून खरोखरच आश्चर्य वाटेल. या प्रांतिक शिपायास रोजीं चार आणे ( दोन पेन्स ) पगार ठरलेला होता. पण तो त्यास महिनेच्या महिने मिळालेला नव्हता. त्यांस पोटभर अन्न, अंगभर वस्त्र आणि स्वच्छ जागा कधींच मिळालीं नाहींत. कामदारांत जी एक प्रकारची तेजस्विता दिसली पाहिजे ती मुळींच दिसत नव्हती. हे कामदार कधींही एकत्र होत नसत कारण अशा प्रकारें एकत्र होणें भयावय होय, असें अबदुल हमीद यांस वाटत होतें. इ. स. १८९७ च्या ग्रीक लढाईत तुर्कांनीं जय मिळविला खरा, पण ग्रीक फौज तितकीच नामर्द होती म्हणूनच तो मिळालेला होता. इ. स. १९१२ मध्यें जेव्हां बाल्कन संस्थानांचें ऐक्य झालें तेव्हां परीक्षेची खरी वेळ प्राप्त झाली होती, व सैन्याच्या हेळसांडीचा परिणाम या वेळीं तुर्की साम्राज्यास भोगावा लागला. सर्व्हियन सैन्यानें कोमा नोव्हो येथें तुर्कांचा पराजय केला लुलुबर्गास येथें बलगेरियन सैन्यानें तुर्की सैन्यास पिटून काढलें आणि रशिया आडवा आला नसता तर चटलजा येथें बलगेरियानें तुर्कीस जमीनदोस्त केलें असतें. तुर्क माणसाच्या लढवायेपणाचा चहाता असा एक इंग्रज तुर्की सैन्याची एकंदर स्थिति पाहून

असें ह्मणाला कीं, खेडे गांवांतील एखादा सरकशीचा मालक जितका शिस्त दाखवूं शकतो, तितकीही तुर्की सैन्यांत दिसत नाहीं. तुर्की-साम्राज्याचा आजपर्यंतचा एकंदर इतिहासांत आजच्या इतकी नेभळी सेना कधींच दृष्टीस पडली नव्हती. या सर्व नेभळेपणास अबदुल हमीद कारण होता यांत संशय नाहीं.

## अबदुलहमीदचें आरमार.

तुर्की साम्राज्य, आरमाराबद्दल फारसें प्रसिद्ध नाहीं. त्याची आरमारी शक्ती १५७१ सालीं आस्ट्रियानें पूर्णपणें नष्ट केली. या वेळेपासून या साम्राज्यांत एक हावच पडून राहिली आहे. ती हाव अशी: अल्लानें आपल्या पुत्रांस जमिनीवर राज्य दिलें आहे आणि काफीर लोकांस पाण्यावर राज्य दिलें आहे. असें जरी होतें तरी अबदुलहमीद गादीवर आला त्या वेळीं तुर्की आरमाराची गणना युरोपियन आरमारांत होत होती.

पण अबदुल हमीद यानें या आरमाराची रेवडी उडविली. हा ज्या वेळीं गादीवर आला, तेव्हां हें आरमार फ्रान्साइतकें होतें. आरमारांचीं जहाजें जवळ जवळ नव्या पद्धतीचीं होतीं. या आरमारांतील अधिकारी इग्लंडांत शिकलेले होते. गोल्डन हॉर्नजवळ तुर्की दारू गोळा ठेवण्याच्या आसपास २०० इंग्रज इंजिनियरच्या कामांत चाकरगार असे राहत होते. जहाजें दुरुस्त करण्याच्या कामीं या लोकांचा उप-

योग होत असे. तसेंच, हे लोक नवीं जहाजेंही बांधीत असत. अबदुल-हमीद यास पदच्युत करून मुरादला गादीवर बसवितेवेळीं या आरमाराचा फार उपयोग झाला होता. पण मुरादच्या मागून गादीवर आलेल्या हमीदनें हें सर्व आरमार गोल्डन हार्नजवळ कोंडून ठेविलें होतें. हा गादीवर येण्यापूर्वी, हें आरमार लटकी लढाई लढण्यासाठीं बाहेर पडत असे व नंतर बास्फरस सामुद्रधुनींत ठेवण्यांत येत असे. ही सर्व पद्धत अबदुलनें बदलून टाकली. वर सांगितलेल्या २०० इंजिनियरांस हळू हळू चुकता पगार देऊन परत स्वदेशास पाठविण्यात आले. तीन वर्षांच्या मुदतींत या इंजिनियरांपैकीं सहा इसम जागेवर राहिले. बाकीच्यास रजा देण्यांत आली होती. या गैरव्यवस्थेनें आरमारी जहाजांची, आबाळ झाली आणि कांहीं जहाजांचे तर बायलर फुटून गेले. इ स. १८९७ च्या ग्रीसच्या लढाई पर्यंत अबदुलनें आरमारास बाहेरचा वारा ह्मणून लागू दिला नाहीं. ग्रीकां आरमारास आडविण्यासाठीं या वेळीं चार मोठालीं जहाजें, दोन क्रूझरें आणि पाच लहान बोटी दार्दानेलिस सामुद्रधुनींत पाठविण्यात आलीं होतीं. नीट दुरुस्त न ठेवल्यामुळें मोठाल्या जहाजांच्या गतीचें प्रमाणही बरेंच कमी झालें होतें.

अबदुल हमीदनें २० टारपेडो बोटी व तीन मोठालीं जहाजें एवढीच भर आरमारांत घातली. टारपेडो बोटी विकत घेण्यांत कांहीं निराळाच

हेतू होता असें ह्मणतात. या बोटींचा उपयोग कधींच करण्यांत आला नाहीं हा विशेष हेतू इतकाच होता कीं कांहीं माणसास खूप कमीशन मिळवून द्यावयाचें होतें व या हेतूनेंच या बोटी माजविल्या होत्या. तीन मोठाल्या जहाजांची हकीकत आठव्या भागांत दिलीच आहे.

## सशस्त्र पोलिस.

इ. स. १८७७ चें कान्फरन्स झाल्यावर लार्ड स्यालिसबरी कान्स्टांटिनोपल येथून परत विलायतेस गेले. त्यांनीं जातेवेळीं अबदुल हमीद यांस राज्यव्यवस्थेंत निदान दोन सुधारणा तरी अवश्य करा. एक सशस्त्र पोलिसाबद्दलची व दुसरी पोष्ट आफिसाबद्दलची. तुर्कोरशियन लढाई पुकारण्यापूर्वी कर्नल व्हॅलेंटाइन बेकर तुर्कस्थानांत आले व त्यांनीं तुर्की लष्करांत नोकरी पत्करली. यांस लवकरच पाशा करण्यांत आलें. हे बेकरपाशा इंग्रजी घोडेस्वार पलटणींत चांगले नावाजलेले अधिकारी होते. रशियाच्या लढाईत त्यांनीं सुलेमान पाशाच्या हाताखालीं चांगली तरवार गाजविली होती. हे लवकरच तुर्की शिपायांत फार आवडते झाले. तुर्की साम्राज्यांत जे शस्त्रधारी पोलीस होते ते व्यसनी, आळशी आणि चुकार. होते तेव्हां त्या खात्याची सुधारणा करण्याचें या वेळीं घाटत होतें. या खात्यांत विशेष प्रकारची सुधारणा केली पाहिजे असें जेव्हां सर हेन्री लेयार्ड यांणीं सुलतानांस सुचविलें त्या वेळीं अबदुल हमीद यांणीं तें सर्व खातें बेकर पाशाच्या अधिकारा

खालीं देण्यांत यावें असें एकदम फर्माविलें. अबदुल हमीद कोणतेंही काम फाजील घाईनें करीत असे. आणि लहर लागली तर तेंच काम अर्धवट तसेंच रेंगाळत ठेवित असे. त्याचें उदाहरण हें पोलिसखातें होय. सुलतान साहेबांनीं एकदम बेकरपाशा यांस बोलावून आणले व साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत नेमण्यासाठीं १२ इंग्रज अधिकारी आणण्याविषयी त्यानें बेकर पाशा यांस सांगितलें. पण इतकी सबुरी कोणाला; सुलतान साहेब बेकर पाशा ह्मणाले, 'तारेनें या १२ इसमांस तुह्मी बोलावू शकाल काय? यावर पाशानीं ' तपासणी करून निवड केली पाहिजे तेव्हां तारेनें हें काम व्हावयाचें नाहीं, असें स्पष्ट उत्तर दिलें. या कामीं यत्किंचितही दिरंगाई करूं नका. पैशाकडे पाहूं नका. अधिकारी शक्य तितके लवकर आले पाहिजे, असा तडका फडकी हुकूम बेकरपाशा यांस देण्यांत आला. या नंतर लवकरच १२ अधिकारी निवडण्यांत आले. यांपैकीं ९-१० अधिकारी फारच उत्तम होते. तुर्की वर्तमानपत्रांत त्यांची स्तुति होऊं लागली आणि हे अधिकारी पोलिसखात्यांत सुधारणा करून साम्राज्यांतील प्रजेचे जीवित निर्भय करतील अशी आशा प्रजाजनांत उत्पन्न झाली. यांच्या येण्याच्या वेळीं रशियाशीं युद्ध चालू असल्यामुळें यांपैकीं कांहीं लढाई लढत होते. ही लढाई संपल्यानंतर सुलतानाची सुधारणा करण्याची इच्छाही संपली आणि जिकडे तिकडे सामसूम झालें. रिकामटेकडेपण

इंग्रजी अमलदारांस आवडत नव्हता. त्यांनीं चार इसमांस साम्राज्याच्या कांहीं भागांत पाठविलें पण त्यांसही तेथें काम असें कांहींच नव्हतें, व त्यांस कांहींच सांगितलेंही नव्हतें. कर्नल ब्रिस्को नावाचा एक घोडेस्वारी अधिकारी रिकामटेकडेपणाबद्दल फारच कुरकुर करूं लागला तेव्हां त्यांस अलेपो प्रांतांत पाठविण्यांत आलें. याच प्रमाणें कर्नल ब्लंट यांची आड्रियानोपलकडे रवानगी करण्यांत आली. या दोघांसही पोलिसांस शिक्षण देण्याची फार हौस होती. पण सुलतान साहेबांची लहरच लागेना. त्यामुळें हे व इतर खुशाल माशा मारीत बसले. बेकर पाशानें सुलतानांची नोकरी सोडून. ईजिप्तमध्यें कशी व कां नोकरी धरली हें पूर्वी सांगितलेंच आहे. यानंतर हळू हळू सर्व इंग्रज अधिकारी नोकरी सोडून स्वदेशीं निघून गेले. फक्त जनरल ब्लंट राहिले होते.

## पोष्ट ऑफिसें.

लार्ड स्थालिसबरी यांणीं सुचविलेली दुसरी सुधारणा पोष्टाची होय. ही सुधारणा सुलतानास आवडली इतकेंच नाहीं तर मुसलमानी प्रजेसही ती फार आवडली होती. या खात्यांत फार सुधारणा केली पाहिजे असें तुर्की प्रागतिकारांसही वाटत होतें. तुर्की साम्राज्यांत पोष्टाची व्यवस्था मोठी चमत्कारिक होती. राजधानींत परराष्ट्रांचीं बरींच पोष्ट-आफिसें होतीं. शिवाय कित्येक परकीय राष्ट्रांचीं पोष्ट ऑफिसें राजधानी-

शिवाय इतर मोठाल्या शहरींही होतीं. या पोष्टांत बाह्य देशांतून आलेलीं पत्रें घेत असत व त्या त्या देशाचे पत्रलेखक आपापल्या देशांतलीं पोष्टाचीं तिकिटें लावून आपलीं पत्रें बाह्य देशीं पाठवीत असत. तुर्की व्यपारास या व्यवस्थेनें कांहींच फायदा होत नव्हता. क्रिमियाची लढाई होईपर्यंत तुर्कस्थानांत तुर्की पोष्टऑफिसच नव्हतें. वसाहतींतून येणारीं पत्रें त्या त्या राष्ट्राच्या वकिलातींत पोंचविलीं जात व तेथून तीं पत्रें मालकांस मिळत असत. ही वहिवाट इ. स. १९३९ पासून चालू होती. वकिलातीच्या ऑफिसांतच ही पोष्टाची गडबड चांगली नव्हे ह्मणून फ्रान्सानें १९३९ त एक आपलें स्वतंत्र पोष्टआफिस स्थापन केलें. या नंतर हें उदाहरण पाहून इतर राष्ट्रांनींही तेंच केलें. क्रीमियन लढाई नंतर इंग्लंड व फ्रान्स यांचीं उदाहरणें पाहून आपलें स्वताचें पोष्ट आफिस असावें असें तुर्की सरकारास वाटलें. या व्यवस्थेनें सरकारचा आर्थिक फायदा होतो हें तर खरेंच, पण वेळ पडली तर प्रजेचा पत्रव्यवहारही पहावयास मिळतो ह्मणून तुर्की सरकारानें पोष्ट स्थापन करण्याचें ठरविलें. या खात्याची व्यवस्था करण्यासाठीं इंग्लंडच्या पोष्ट खात्यातील एक हुषार अधिकारी निवडण्यांत आला होता, पण हें खातें तेथें चालावें तसें सुरळीत चालेना.

हा प्रयत्न फसण्यास दोन कारणें झालीं. तुर्की राज्यव्यवस्थेला नियमित वेळीं काम करण्याची संवयच नसल्यामुळें पोष्टाचें काम निय-

मितपणानें होईनासें झालें. परदेशी डाक या पोष्टांतून तर मुळीच वेळेवर जात नसे, त्यामुळे ही डाक तुर्की पोष्टांतून जाण्याची बंद झाली व ती पूर्वींचीच रीत कायम ठेऊन स्वतंत्र पोष्टानें जाऊं लागली. दुसरें कारण आपलीं पत्रें फुटलीं जातील हें होय. अब्दुल हमीदच्या कारकीर्दीत जिकडे तिकडे अव्यवस्थाच होती. ही अव्यवस्था इ. स. १९०८ च्या राज्यक्रांतीपर्यंत चालूच होती.

## वैद्यकीची शाळा.

अबदुल हमीदच्या कारकीर्दींत नांव घेण्यासारखें जर एखादें कृत्य झालें असेल तर तें स्कुटारी येथें वैद्यकीच्या शाळेची स्थापना हें होय.

एखादा आजार होणें व त्यावर औषधपाणी करणें या संबंधानें तुर्कीलोकांच्या कांहीं चमत्कारिक समजुती आहेत. त्यांचा दैवावर विशेष भरंवसा असल्यामुळें ईश्वराच्या इच्छेविरुद्ध वैद्य काय करणार ? अशी त्यांची समजूत आहे. पण कित्येकांची अशी खातरी पटली कीं, औषधानें गूण येतो. कान्स्टांटिनोपल येथील बहुतेक प्रजा दैववादी होती.

अशी जरी वस्तुस्थिति होती तरी खुद्द कान्स्टांटिनोपल येथें शस्त्रक्रियेवरील विश्वास वाढत जात होता. त्यांस रोगांच्या परिक्षेसंबंधानें विशेष संशय येत असे. पूर्वेकडे ' क्विनाइन ' ( तापावरील औषध ) या वल्लीनें उत्तम परिणाम घडवून आणला आहे असें त्या देशांत

डाक्टरचा धंदा करणारा एक पाश्चिमात्य गृहस्थ ह्मणतो. नाल्यांची व्यवस्था नीट नसल्यामुळें तुर्की साम्राज्यांत हिंवताप किंवा मलेरिया ताप फार बोकाळलेला आहे.

तीस वर्षांपूर्वी तुर्कस्थानांत वैद्यकीय शास्त्र फार मागासलेलें होतें. शस्त्रक्रिया तर कायद्यानें बंद होती. तुर्कस्थानांत वैद्यकी शिकलेले लोक तयार झाल्यानंतर त्यांनीं बिन शिकलेल्या वैद्यांविरुद्ध फार तक्रारी केल्या. या तक्रारीमुळें अबदुल हमीद शिकलेल्या लोकांस मदत देई, पण हे शिकलेले लोक परकीय होते तेव्हां स्वदेशी प्रजेस हें शिक्षण दिल्यावर तेही या विद्येंत प्रवीण होतील असें अबदुल हमीदयांस वाटलें. कांहीं मुसलमानांनी हें शिक्षण व्हियान्ना, प्यारीस व इंग्लंड या देशांतही घेतलें होतें. यांच्या प्रयत्नांनीच अबदुल हमीदला वैद्यकी शाळा स्थापन करण्याची सुबुद्धि झाली. या शाळेची इमारत फार मोठी आहे. या संस्थेबद्दल अबदुल हमीदची प्रशंसाच केली पाहिजे.

---

# भाग १३ वा.

## वृत्तपत्रें.

आपली एकतंत्री सत्ता टिकाऊ करण्यासाठीं अबदुल हमीदनें साम्राज्यांतील वृत्तपत्रें व बाह्य देशांतील वृत्तपत्रें आपल्या आधीन रहावींत

ह्मणून अव्याहत प्रयत्न केलेला आहे. अशा प्रकारची कल्पना तुर्की सुलतानांपैकीं या सुलतानासच प्रथम सुचली. परकीय वर्तमान पत्रासंबंधानें खुद्द तुर्की सरकारी अधिकाऱ्यांत किती अज्ञान पसरलें होतें हें सांगितलें असतां विश्वसनीयही वाटणार नाहीं. एके प्रसंगीं एका वृत्तपत्राचा मुखत्यार राजवाड्यांत दाखल झाला. या वेळीं सुलतानाच्या मुख्य खाजगी कारभाऱ्यानें जें अज्ञान प्रदर्शित केलें तें अत्यंत हास्यास्पद होतें. या दोघांमध्यें तुर्की भाषेंत संवाद झाला. वृत्तपत्रकार परदेशी असल्यामुळें तो दुभाष्यामार्फत बोलत होता. हे चिटणीस, लंडन येथें प्रसिद्ध होणारें एक वर्तमानपत्र गालाटा येथें प्रसिद्ध होतें असें ह्मणत होते. या उत्तराबद्दल मुखत्यारास आश्चर्य वाटलें. ‘ तर मग काय, एखादें इंग्रजी वर्तमान पत्र इस्तंबूल येथें प्रसिद्ध होतें असें तुमचें ह्मणणें आहे कीं काय !’ यावर मुखत्यारानें उत्तर दिलें कीं, सदर पत्र इस्तंबूल येथें प्रसिद्ध होत नसून लंडन येथें होत असतें. चिटणीसांनी मागाहून असें कबूल केलें कीं माझी समजूत अशी होती कीं वर्तमानपत्राबद्दल मी पुष्कळ ऐकलें आहे व तें वर्तमानपत्र गलात—कान्स्टांटि नोपल शहरांतील एक पेठ— येथेंच प्रसिद्ध होत असावें. या ठिकाणीं तुर्की भाषेंत नसणारीं वृत्तपत्रें प्रसिद्ध केलीं जातात अशी माझी दृढ समजूत होती.

तुर्कस्थानांत जें जें ह्मणून छापलें जातें तें मागाहून सेन्सार मार्फत

तपासलें जातें. एक किंवा अधिक सेन्सारांनीं मान्य केलेलाच मजकूर छापला जातो. इतका कोणताही मजकूर छापण्याची सक्त मनाई होती, या नियमाचें उल्लंघन करणाराचें वृत्तपत्र बंद केलें जात असे अथवा त्याचा परवाना रद्द करण्यांत येत असे. ज्या विषयांचें ज्ञान प्रजेस होतां कामा नये असें अब्दुल हमीद यांस वाटत असे, ते विषय गाळले जात असत. कांहीं शब्दांस हर्ताळच लावण्यांत आला होता. म्यासेडोनिया आरमेनिया व इतर कांहीं शहरे यांचीं नांवें उपयोगांत आणण्याची मनाई होती. आरमेनिया प्रांतांत बायबल लायब्ररी आहे तेथें एक गमतीची गोष्ट प्रसिद्ध आहे. बायबलमध्यें एक वाक्य असें आहे 'म्यासेडोनियामध्यें या आणि आह्मांस मदत करा' सदरहू वाक्याचें भाषांतर झाल्यावर तें सेन्सारकडे तपासण्यास गेलें. सेन्सार यांणी शंका काढली कीं 'म्यासेडोनिया हें नांव आह्मांस माहीत नाहीं तेव्हां गाळून टाका! यावर भाषांतर काराकडून असें सांगण्यांत आलें कीं हें नांव १८०० वर्षांपूर्वी माहीत होतें व आह्मी त्याचें भाषांतर केलें आहे.' यावर सेन्सर रागाऊन ह्मणाले 'तें नांव आह्मीं घालू देणार नाहीं व घालू देतां येणार नाहीं तरी ज्या प्रांतांतून हा निरोप गेला आहे प्रांतांतील एखाद्या जागेचें नांव घाला पाहिजे तर' यानंतर पुष्कळ समजूत घातल्यावर एकदाचें म्यासेडोनिया हें नांव छापलें गेलें, सेन्सराच्या हातून नेहमी हास्यास्पद चुका होत असत.

त्यांपैकीं कांहीं येथें देतों. एका ग्रीक मनुष्यानें एक मुलगा बाळगला होता व तो छापखान्याचें काम शिकला होता. हा एका छापखान्यांत प्रिंटरचें काम करीत होता. कान्स्टांटिनोपल शहरांतील प्रिंटरांनीं एक मित्रमंडळ स्थापन केलें. एकमेकांस मदत करणें हा या मंडळाचा उद्देश होता. या मंडळानें आपल्या नियमांचें एक पुस्तक तयार केलें होतें व त्याच्या पाठीवर संधी मिळाली तर सर्व लोकांचें कल्याण करावें आणि विशेषतः कुटुंबांतील माणसांचें कल्याण करावें ' यानंतर ग्रीक भाषेंत 'पौलॉस एप इ. टी. ग्यालट ' असें छापलें होतें. या वाक्या वरून वरील मुलास 'पौलास ' कोठें राहतो असें विचारण्यांत आलें. ' मला माहीत नाहीं ' मुलानें उत्तर दिलें. अर्थात या मुलास पकडण्यांत आलें व पोलिसापुढें नेलें तेथेंही त्यानें आपलें अज्ञान दर्शविलें पण येथें उत्तर देताना त्यानें असें सांगितलें कीं ' हा पौलास मरून आज १८०० वर्षें झालीं आहेत. हें उत्तर ऐकून तर पोलिसाच्या अंगाचा तिळपापड झाला. ते ह्मणाले ' गुलामा खोटें सांगतोस काय ! हा पौलास ग्यालाटा येथें राहतो !' नंतर या मुलानें आपल्या हितकर्यास ही सर्व हकीकत कळविली. या ग्रीक माणसानें पोलिसाची अशी समजूत घातली. यांत लिहिलेलें वाक्य अक्षरशः खरें आहे. पॉलस हा खिस्ती साधू होता तो मरून पुष्कळ वर्षें झालीं. हें ऐकून पोलिस विशेषच गरम झाले तेव्हां ग्रीक माणसानें त्यांची अशी समजूत

घातली कीं हा पॉल ग्यालांत तेथील राहाणारा नसून ग्यालेशियन जातीचा होता. हे लोक एशियामायनरमध्यें कित्येक शतकें राहात आहेत. इतकें सांगितलें तरी समजूत पटेना. शेवटीं दोघां 'शहाण्या माणसांनी जेव्हां स्पष्ट खुलासा केला तेव्हां हें प्रकरण संपलें. मुलास सोडून देण्यांत आलें आणि प्रकरण आपसांत दावून टाकण्यांत आलें.

सेन्सारच्या ज्या कित्येक गमतीच्या गोष्टी आहेत त्यापैकीं आणखी दोनच आह्मी या खालीं देतों. बलगेरिया प्रांत स्वतंत्र झाल्यावर ही बरेंच दिवस त्या देशांतील छपाईचें काम कान्स्टांटिनोपल येथें होत होतें. बायबलचें छपाइचें कामही येथेंच चालत असे. या पुस्तकांची हस्त लिखित प्रत सेन्सरकडून इतकी कांपून छिन्नविछिन्न करण्यांत येत असे कीं सांगून सोय नाहीं. 'तुझें राज्य येवो' असें एक वाक्य बायबलमध्यें आहे. हें वाक्य ह्मणजे सुलतानावर कडक टीकाच होय असें सेन्सरला वाटलें. राबर्ट कॉलेजचे व्हाइस प्रेसिडेंट यांस बलगेरियन भाषा चांगली येत होती. तेव्हां त्यास या वाक्याचा अर्थ विचारण्यांत आला. या वाक्याचा संबंध पृथ्वीवरील राज्याकडे मुळीच नाहीं. हें वाक्य खुद्द ख्रिस्तानें उच्चारलेलें आहे व हेंच वाक्य लाखो ख्रिस्ती आपल्या प्रार्थनेंत नेहमीं उच्चारतात. यावर सेन्सार साहेब उद्गारले 'मला तुह्मी फार आवडता व तुमच्या माझ्या मनांत आदर आहे. तेव्हां ज्या अर्थीं हें वाक्य सुलतानाविरुद्ध नाहीं

असें ह्मणतां त्या अर्थी मी तसें मानतों व हें प्रकरण संपवून टाकतों.

दुसरें उदाहरण येणें प्रमाणें:—बायबलमधील स्तोत्रांचें बलगेरियन भाषेंत एका अमेरिकन मनुष्यानें भाषांतर केलें. तें नेहमींप्रमाणें छापण्यापूर्वीं सेन्सारकडे पाठविण्यांत आलें. हें तपासून जेव्हां परत आलें तेव्हां त्यावर सेन्सरसाहेबांनी आपली कातर इतक्या ठिकाणीं चालविली होती कीं तें छापण्यास द्यावें कीं न द्यावें अशी शंका उत्पन्न झाली. 'शांततेच्या राजपुत्रा, तुझें कल्याण होवो' 'ख्रिस्ती शिपायांनो पुढें चला' 'ख्रिस्ती, सर्व मानवांत श्रेष्ठ' वगैरे वाक्यें छाटून टाकण्यांत आलीं होतीं. यासंबंधानें उपस्थित झालेली ही अडचण दूर करण्यासाठीं रॉबर्ट कॉलेजच्या व्हाइस प्रेसिडेंटास बोलावणें भाग पडलें. यांणीं त्या स्तोत्रासंबंधानें सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली आणि कांहीं दिवसांनीं तीं स्तोत्रें परत आणून दिलीं. हीं पाहून सेन्सरसाहेब ह्मणाले: 'आमच्यापेक्षां तुह्मीं स्तोत्रें कमी खोडलींत पण तुह्मी ख्रिस्ती लोक आह्मांस अगदींच मूर्ख समजाल नव्हे' पण हें पहा. या स्तोत्रांत ह्मटलें आहे कीं 'नदीजवळ एकत्र जमावें काय?' ही नदी ह्मणजे दुसरी कोठची? आमची गिटझ्झा स्तोत्रांत ह्मटलेली नदी ही नव्हती? हें वाचकांस सांगावयास नकोच.

इ. स. १८७९ पासुन अब्दुल हमीदच्या पदच्युतिपर्यंत ह्मणजे इ. स. १९०९ पर्यंत ईजिप्तमध्यें जे जे प्रकार घडले ते तुर्कस्थानां-

तील वर्तमानपत्रांत मुळीच प्रसिद्ध केले नव्हते. तुर्की वृत्तपत्रावरून इतिहासास कांहींहीं मदत होणें शक्य नाहीं. तुर्कस्थानांत राहणाऱ्या परकी यांस बाह्य देशींचीं वर्तमानपत्रें किंवा तारा मिळत होत्या पण त्यांतील मजकूर सेन्सारच्या परवानगीबाचून तुर्की वर्तमानपत्रांत छापला जात नसे. एखादा बादशहा किंवा राजपुत्र मारला गेला असेल तर त्याबद्दल तुर्की वृत्तपत्रांत बातमी देताना ' हा एकाएकी मेला ' एवढेंच प्रसिद्ध करण्यांत येत असे. बादशहा किंवा राजपुत्र यांच्या खुनासंबंधानें बातमी देण्याचें अबदुलहमीद सापु माकारीत असे. कोठें बांब फेकले गेले असले तर त्याची बातमीच मुळीं देण्यांत येत नसे. आरमेनियन, ग्रीक अथवा बल्गेरियन याणी बंड केलें तर त्यासंबंधानें इतकीच बातमी द्यावयाची कीं ' अशा अशा प्रांतांत लुटारूंनी दंगा मांडला होता पण बादशाही सैन्य जाऊन तो शांत करण्यांत आला आतां जिकडे तिकडे शांतता आहे. ' पण बहुशा असल्याप्रसिद्धच करण्यांत येत नसत. इ. स. १८९४ ते ९८ पर्यंतच्या स्थानिक वर्तमानपत्राच्या फायलर्न चाळून जर कोणी पाहील तर त्यांत आरमेनियन बंडासंबंधानें एवढेंच वाचावयास सापडेल कीं ' या वेळीं नेहमींपेक्षां लुटारूंची संख्या फार जास्त होती. ' म्याकबेथ, ह्यामलेट, ज्यूलियस सीझर वगैरे इंग्रजी व फ्रेंच नाटकें तुर्कस्थानांत मुळींच केलीं जात नसत. कारण त्यांत राजपुत्राचा खून आहे !

इ.स. १७०० च्या पूर्वीं कोणचेंही पुस्तक मग तें कोणत्याही भाषेंत लिहिलेलें असो. तुर्कस्थानांत येऊं नये असा अबदुल हमिदचा ग्रह झाला होता व असा ग्रह होण्यास त्याची कांहीं चमत्कारिक समजूत झाली होती. ' तुर्की लोकांचा इतिहास ' वगैरे पुस्तकें आलीं असत ; तरी सरकाराकडून जप्त करण्यांत आली. ह्या जप्तीस स्पष्टीकरण एव-ढेंच देण्यांत आलें कीं, महंमद पैगंबरीच्या धर्माबद्दल भलत्याच गोष्टी आणि तुर्की साम्राज्य लहान होत आहे या गोष्टी त्यांत लिहिल्या आहेत.

सार्वजनिकहिताच्या गोष्टी न छापण्याबद्दल आणि सुलतानाबद्दल राजनिष्ठा दाखविण्याबद्दल तुर्की वृत्तपत्रांस यिल्डिस राजवाड्यांतून गुप्त रकमा मिळत असत. राज्याची व विशेषतः सुलतानाची स्तुति करावयाची हाच नियम या वृत्तपत्रांनी पाळला होता. जेव्हां जेव्हां सुल-तानाचें येई तेव्हां तेव्हां अत्यंत श्रेष्ठ पदवीनें त्यांची संभावना करण्यांत येत असे. ' यूरोपांतील अत्यंत शहाणे बादशहा ' ' पैगंबराची तरवार अत्यंत अभिमानानें बाळगणारे हेच एक बादशहा ' ' धडा घेण्या-सारखे बादशहा ' ' यांचीं सत्कृत्यें इतकीं आहेत कीं त्यांपैकीं एका दिव-साचींच लिहूं लागल्यास आमच्या पत्राचे रकाने पुरणार नाहींत ' असल्या लेखांबद्दल यूरोपियन लोक हसत असत पण असल्याप्रकारचे लेख त्यांच्यासाठीं मुळीं छापलेलेच नव्हते तर ते अबदुलच्या प्रजे-साठीं छापलेले होते.

वल्गेरिया प्रांतांत मुसलमानांनीं जे अत्याचार केले त्यासंबंधानें परकीय वर्तमानपत्रांत सणसणीत लेख आले त्यावरून वर्तमानपत्राची जरब व विशेषतः इंग्रजीवर्तमानपत्राची जरब किती तीक्ष्ण असते हें अबदुल हमिद यांस कळून चुकलें, त्यानें आपल्या परदेशीय वकिलास असें सांगून ठेविलें कीं " परकीय वर्तमानपत्राची सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न करा आणि शिवाय माझ्याबद्दल विरुद्ध लेख आल्यास ते इकडे कळवीत जा ह्मणजे सदर पत्रें तुर्कस्थानांत न येतील अशी खबरदारी घेण्यास सोपें जाईल " पुष्कळ परकीय वर्तमानपत्रांस व कांहीं स्थानिक वर्तमानपत्रांस नियमित रकमा मिळत असत. प्रसिद्ध होणाऱ्या लेखाच्या छापील प्रती आगाऊ यिलडिस राजवाड्यांत पाठविण्यांत येत असत. या प्रती त्याचे वकील पाठवीत असत पण पुष्कळ वेळां इतरांकडून पाठविल्या जात. या छापिल प्रतीं बरोबर सुलतान साहेबांस असें कळविण्यांत येत असे कीं, ' पत्रांत नमूद केलेली रक्कम न मिळेल तर सदर लेख प्रसिद्ध केला जाईल. ' अशा-प्रकारच्या रकमा बऱ्याच देण्यांत आल्या आहेत. युरोपियन देशांतून येणाऱ्या वर्तमानपत्रांची तपासणी सेन्सरमंडळाकडून होत असे. या सेन्सारच्या कामावर नजर ठेवण्यास राजवाड्यांत आणखी एक सेन्सर मंडळ होतें. पण या दोघांच्याही नजरेतून एखादा लेख नजरचुकीनें गेला तर त्याबद्दल चौकशी होत असे.

## हेरांचा सुळ सुळाट.

इ. स. १८८९ पासून अबदुल हमीदच्या पदच्युतिपर्यंत दरवर्षी या गुप्त पोलिस उर्फ हेरांची संख्या वाढतच होती. प्रथमतः ही हेरांची संख्या प्रजा सुलतानाबद्दल काय म्हणते हें अजमावण्यासाठींच स्थापन करण्यांत आली होती. पण तिची व्याप्ती हळू हळू इतकी झाली कीं, जर तीन मुसलमान एकत्र असले तर त्यांतील एक तरी हटकून हेर असणार असा सर्वत्र समज झाला होता. एकत्र मिळण्याच्या जागीं, क्लब किंवा हॉटेलमध्यें तुर्की प्रजा कांहीं विशेष प्रकारचें भाषण करण्यास कचरत असे. इतकेंच नव्हे तर दोघांचें भाषण चालू असतां तिसरा तेथें आला तर लागलीच या दोघांचें भाषण बंद होत असे. कारण न जाणो ! हा तिसरा हेर नसेल कशावरून तुर्की प्रजेनें स्थापन केलेल्या हॉटेलच्या मालकास या पोलिसास फार मिऊन वागावें लागत असे. या हाटेलांत जे कोणी आले असतील त्यांच्या खाणाखुणा त्यास द्याव्या लागत असतच पण शिवाय त्याच्या बरोबर कशाप्रकारचें सामान होतें आणि तें कान्स्टांटिनोपल येथें कोणच्या कामासाठीं आले होते याबद्दलचीही माहिती त्यास द्यावी लागत असे. त्यांचा पत्रव्यवहार कोणाशीं होत होता हेंही त्यानें सांगितलें पाहिजे. परकीयांनी स्थापन केलेल्या हॉटेलांत हे हेर कायमचेच राहात असत व यांत स्त्रियाही असत. या हेरांच्या चमत्कारिक प्रश्नास कंटाळून पुष्कळ युरोपीयन लोकांनी त्याबद्दल हाटेलच्या मालकाकडे तक्रारी

केलेल्या आहेत. मालक या हेरास ओळखीत असे पण त्यासंबंधानें तो कांहींच बंदोबस्त करूं शकत नसे. हॉटेलांत आलेल्या पाहुण्यानें फारच गळ घातली तर मालक अशा हेरास हाकलून लावी. पण याचा परिणाम, त्याच्या ऐवजीं दुसरा एखादा त्याहुन जास्त त्रासदायक हेर त्या ठिकाणीं येई एवढाच होत असे. हे हेर-मग तो पुरुष असो कीं स्त्री असो—हॉटेलच्या दराच्या एक सप्तमांश पैसा देत असत.

अब्दुल हमीदच्या राज्यकारभारास सुरवी तुर्की प्रजाही कंटाळण्यास हे हेरांचें लिगाडच विशेष कारणाभूत झालेलें होतें. शेतकऱ्याहून वरच्या दरज्याच्या तुर्की प्रजेंत सद्गुण व दुर्गुण दोन्हींही होते. हा वरच्या दरजाचा तुर्की स्पष्ट बोलणारा असे. अर्थात तो सरकारी कृत्यावर टीका करी इतकेंच नाहीं तर खुद्द सुलतानावरही तिचा भडिमार करी. आपल्या या भाषणांचा गोपवारा सुलतानास कळविला जातो असें जेव्हां त्यांस समजलें तेव्हां त्यांच्या मनांतील सुलतानाबद्दलचें प्रेम हळू हळू नष्ट होत चाललें आणि ते उत्तरोत्तर असे स्पष्ट ह्मणूं लागले कीं सुलतान 'खरा तुर्क, नाहीं.

## सभाबंदी.

गुप्त पोलिस राज्यपद्धतीचा आणखी एक भाग होता. आपली प्रजा नियमित संख्येहून जास्त प्रमाणांत एकत्र झाली तर अशी सभा मोडून

टाकण्याचा हा भाग होता. लग्न समारंभासारख्या वेळींही हे हेर हजर असत आणि या समारंभाची हकीकतही ते राजवाड्यांत कळवीत. तुर्की प्रजेस जाहीरसभा भरविण्याचा हक्कच नव्हता. परकीय लोकांच्या घरांत मोठमोठ्या मेजवान्याही सुलतानानें बंद पाडल्या होत्या. जेव्हां हे परकीय अशा मेजवान्याचा आह्मांस हक्क आहे असें ह्मणून मेजवान्या देत त्यावेळीं त्या घराच्या बाहेरच्या बाजूस पोलिस पार्टी ठेवण्यांत येत असे आणि या मेजवानीस येणाऱ्या प्रत्येक तुर्की प्रजेस 'आपण या मेज वानीस गेलात तर तुमचा राजवाड्यांत रिपोर्ट होईल' असें हे पोलीस बजावीत असत.

अशा प्रकारच्या बंदीमुळें आणि हेरांच्या सुळसुळाटामुळें आपल्याबद्दल राजवाड्यांत रिपोर्ट करण्यांत आला आहे असें ऐकतांच पुष्कळ तुर्की लोक राज्यांतून पळून गेले आहेत. पण त्यास पळण्यासही सररास मुभा नव्हती; कारण राज्याच्या बाहेर जाण्यास पासपोर्ट लागत असे आणि ज्याच्याविरुद्ध राजवाड्यांत रिपोर्ट झाला असेल त्यास हा पासपोर्ट मिळणें दुरापास्त होतें. खुद्द सुलतानाच्या बहिणीनें आपल्या भावाजवळ अशी तक्रार केली कीं तुझ्या अन्यायी वर्तनानें माझ्या नवऱ्यास या राज्यांतून पळून जाणें भाग पडलें. अशा प्रकारचे पळून गेलेले लोक राज्यकारभारास एक प्रकारचे हेरच मिळाले होते.

तुमचे देशभाई जाहीरसभा भरवितात व त्यामुळें तुर्की प्रजेस

एकत्र जमून कट करण्यास वाव मिळते अशा प्रकारच्या विनंत्या तर प्रत्येक देशाच्या वकिलाकडें वारंवार येत असत. स्टंबूलच्या समोरच मोडा नावाचें एक लहानसें खेडें आहे. या ठिकाणीं तुह्माकडून खिस्तमसचा ( नाताळ ) सण करूं अशी विनंती इंग्रजी वकिलास एके वेळीं करण्यांत आली होती. ‘ या सणांत बीभत्स प्रकार करण्यांत येतात ’ असें हेरांनीं मुलतांनास कळविलें होतें. ही गोष्ठ इंग्रजी वकिलांस समजताच तो रागानें लाल झाला आणि ‘ आह्मी हा सण करण्याचें बंद करीत नाहीं असें स्पष्ठ सुलतानसाहेबांस कळवा ’ असा त्यानें शेंकडा जबाब दिला.

या हेराच्या पद्धतीमुळें कोणाही मुळें अगर युरोपियन गृहस्थास सुलतानाचा तिटकाराच येई. स्मर्ना आणि सालोनिका येथें टेलिफोन्स व विजेचे दिवे असता त्या सोई खुद्द राजधानींत होण्याबद्दल तुह्मी आपलें मत देऊं नका असें सुलतानानें आपल्या प्रधानांस बजावलें होतें. या प्रधानासही या सोई नको होत्या. अशा प्रकारच्या सोई इ. स. १८८९ पासून बलगेरिया प्रांतांत केल्या होत्या. राज्यक्रांति होईपर्यंत राजधानींत टेलिफोनची सोय नव्हती. टेलिफोनची सोय तुह्मांस कां नको ? असें प्रधानास विचारलें असतां त्यांचें असें ह्मणणें पडलें कीं, आज राजवाड्यांतून केव्हां बोलावणें येईल याचा नेम नाहीं, टेलिफोन झाल्यावर हुजऱ्याची जरूरी नसल्यामुळें प्रधानास जागचे हालण्याचीही पंचाइत पडेल.

## ख्रिस्ती देवळांवर आघात.

हेरांच्या पद्धतीमुळें आणि बाह्य देशी जाण्यास लागणाऱ्या पासपोर्टाच्या गैरव्यवस्थेमुळें, तुर्की प्रजा सुलतानाबद्दल फार नाखूष झाली होती व ही अप्रियता बऱ्याच अंशावर गेली आहे ही गोष्ट खुद्द सुलतानासही हेरांमार्फत समजली होती. अबदुल हमीदला सुलतानी अम्मल गाजवून शिवाय प्रजेस खुष ठेवावयाचें होतें तेव्हां आपला हेरांचा सुळसुळाट कमी न करतां प्रजेची प्रीयता मिळविण्याची त्यानें एक युक्ति काढली इस्लामी धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांच्या मतांत बराच विरोध आहे. तरी पण तुर्की साम्राज्यांत ख्रिस्ती प्रजेस धार्मिक बाबतींत कांहीं सवलती मिळाल्या होत्या. या सवलती काढून घेतल्यास आपली मुसलमानी प्रजा खूष होईल असें त्यास वाटलें व त्याप्रमाणें त्यानें त्या सवलती काढून घेण्याचा उपक्रमही केला. पण यामुळें कांहीं थोडे मुसलमान खूष झाले पण साम्राज्यांतील सर्व ख्रिस्ती प्रजा आणि समजूतदार मुसलमान या कृत्यामुळें फार नाखूष झाले. या सवलती काढून घेण्यांत येणार हें ऐकून कित्येक पाद्रीलोकांनीं आपली देवळें बंद करण्याची व्यवस्था केली युरोपस्थ राष्ट्रांस या कृत्यामुळें फार चीड उत्पन्न झाली आणि सुलतानाची स्थिती भीक नको पण कुत्रा आवर अशी होऊन गेली. शेवटीं सुलतानानें मध्यस्थी करण्यासाठीं रशीयास विनंती केली आणि या मध्यस्थीनें हें प्रकरण एकदाचें निवाळें.

## भिन्न जातीच्या प्रजेचें प्रतिपालन.

बलगेरिया आणि पूर्व रुमानिया हे देश जरी तुर्कीसाम्राज्यांतून बाहेर पडले होते तरी याशिवाय तुर्की साम्राज्यांत भिन्न धर्मीय प्रजा होतीच यापैकीं विशेष महत्त्वाची प्रजा म्हटली म्हणजे क्रोटन, आरमेनियन आणि म्यालडोनियम होय. तुर्कीलोक शूर खरे पण त्यांस भिन्न धर्मीय प्रजेवर कसें राज्य करावे हें समजावें तसें समजत नव्हतें आणि म्हणूनच तुर्की साम्राज्यांत वारंवार खटके उडत. हे लोक पुष्कळ काळ पर्यंत स्वतंत्र राहिल्यानें स्वत:बद्दल फार अभिमानांनी झालेले आहेत. तुर्की माणूस आपल्या मित्रांशी अगर परराज्यांतील कोणाही इसमाशी अत्यंत दिलदारीचें वर्तन करील. तसेंच शत्रूशीं धर्मयुद्धच खेळेल. पण त्याच्या इतिहासानें आणि धर्मानें त्यास जें शिक्षण दिलें आहे त्यामुळें तो परधर्मीय प्रजेवर सुलतानी प्रभाव गाजविण्याच्या प्रवृत्तीचा झाला आहे. जात किंवा रंग या संबंधानें त्याच्या मनांत भेदभाव नसतो. तुर्कीसाम्राज्यांत नीग्रोला बरोबरीचा म्हणून वागविण्यांत येतें. त्यांचा विशेष वैरभाव ख्रिस्ती प्रजेशीं होय आणि त्यांनीं यांस पादाक्रांत केल्यापासून कधींही चांगल्याप्रकारें वागविलें नाहीं असें इंग्रजी ग्रंथकारांचें मत आहे.

ख्रिस्ती प्रजेला यथान्याय वागविलें असतें तर तुर्कीसाम्राज्यांत इतका घोटाळा झाला नसता. ख्रिस्तीप्रजेबद्दल धार्मिक विरोध बाजूला ठेवून

सहानुभूतिपूर्वक वागणूक ठेवण्यांत आली असती आणि खुद्द अब्दुल हमीदनें सूड उगविण्याची बुद्धि स्वीकारली नसती तर तुर्की साम्राज्यांतून फूटून जाण्याची इच्छा ख्रिस्ती प्रजेस झाली नसती. माथेफिरू आणि कर्मठ अशा लहानशा मुसलमानी वर्गास खूष करण्याचा प्रयत्न न करतां, ख्रिस्ती प्रजेस मुसलमानी प्रजेप्रमाणेंच वागविण्यांत आलें असतें तर तुर्की साम्राज्यांतील मारामाऱ्या आणि कत्तली खात्रीनें झाल्या नसत्या. प्रजेच्या तक्रारी जुलमानें दाबून टाकण्याचा प्रयत्न अबदुल हमीदनें केला; आणि अशा रीतीनें सुरू केलेली जुलमी राज्यपद्धत लबाडी, लुच्चेगिरी आणि लटपटी करून छपवून ठेवण्याचा त्यानें मूर्खपणाचा प्रयत्न केला. युरोपांतील इतर बलाढ्य राष्ट्रांच्या इच्छा पुऱ्या करण्याचें त्यानें वेळोंवेळीं ढोंग केलेलें आहे पण त्या राष्ट्रांचा घात करण्याचा गुप्त प्रयत्न त्यानें चालूच ठेविला होता.

ग्रीसला स्वातंत्र्य मिळाल्यामुळें क्रीट बेटांतील ख्रिस्ती प्रजा मुसलमानी गुलामी राज्यपद्धतीस कंटाळली होती. या बेटांत ग्रीक भाषा बोलणारी एकंदर लोकसंख्या ३ लक्ष होती व त्या पैकीं २४ हजार मुसलमान होते. या बेटांतील हे मुसलमान फार आडदांड, माथेफिरू आणि दंगा फिसात करणारे होते; आणि यामुळेंच सुमारें १२ वर्षांत या बेटांत सरीच बंडें झालीं. अब्दुलच्या पहिल्या

सात वर्षांच्या कारकीर्दींत या बेटांतील लोक शांत होते. पण खिस्ती लोकांची संख्या जास्त असता ती कमी संख्येच्या मुसलमानी अमला-खालीं गुण्यागोविंदानें राहील हें शक्यच नाहीं. अंतःकरण विदारून टाकणाऱ्या कित्येक कत्तली या लोकांनीं अनुभविल्या होत्या. यामुळें त्यांचा चित्तक्षोभ झाला होता. त्याच्या धर्म बंधूंनी ग्रीसमध्यें जाऊन जर तुर्की जूं फेकून दिलें होते तर हे लोक तरी स्वस्थ कसे असतील !

इ. स. १९९९ सालीं क्रीटन खिस्तीलोकांनी पुनः चळवळ सुरू केली. इ. स. १९९४ सालीं फोटाडेस पाछा यांस त्या बेटाचा गव्हरनर नेमण्यांत आलें. या बेटावर खिस्ती गव्हरनर नेमण्याच्या ऐवजीं मुसलमान नेमावा असें अबदुल हमीदचें मत होतें व तो अल्प संख्याक मुसलमानांच्या तर्फेचा होता यांत आश्चर्य नाहीं. हा गव्हरनर दोन्ही जातीस समतेनें वागवीत होता. पण या दोघांतील वैराग्नी इतका विकोपास गेला कीं तो पाच वर्षांची मुदत भरण्यापूर्वींच परत आला. नंतर महमुद यांस कमिशनर ह्मणून पाठविण्यांत आलें. यानें दोन जातींत एकोपा असावा ह्मणून पुष्कळ प्रयत्न केला आणि इ. स. १९९७ सालीं त्यानें खिस्ती लोकांस कांहीं सवलतीही दिल्या. त्यानें कर कमी केले आणि दोन्ही जातीस राज्य कारभारांत कांहीं हक्कही दिले. पण खिस्ती प्रजा संतुष्ट होईना. त्यांचें असें ह्मणणें पडलें कीं, खिस्ती सरकार असल्याशिवाय आह्मांस कधींही न्याय

मिळावयाचा नाहीं. ग्रीस देशाची सत्ता त्यास आवडत होती. ग्रीस देशांतील लोक या लोकाशी सहानुभूति दाखवीत पण तें बेट आपल्या राज्यांत जोडण्याचा प्रयत्न केल्यास टर्कीशी लढाई द्यावी लागेल आणि कदाचित हें बेट ग्रीस देशाच्या निवडणूकीच्या वेळीं दांडगेपणानें अडथळाही आणील. तेव्हां ही ब्याद आपल्या राज्यांत नको असेंच ग्रीक लोकांस वाटत होतें. इ. स. १८८९ सालीं या बेटांत बंड झालें. तेथील गव्हरनरांस परत बोलावण्यांत आले व त्यांच्या जाण्यानें दंगे विकोपास गेले. मुसलमानांनीं सहा मुखत्यार कान्स्टांटिनोपल येथें पाठविले. मुसलमान लोकांनीं कित्येक ख्रिस्ती खेडीं जाळून टाकलीं. या बेटांतील बरेच ख्रिस्ती लोक ग्रीस देशांत रहावयास गेले. तेव्हां ग्रीक सरकारास या कामीं हात घालावा लागला. या सरकारानें एक जाहिरनामा काढला व त्यांत क्रीट बेटांतील ख्रिस्ती लोकांस न्यायानें वागविण्यांत यावें व राज्यकारभारही सुव्यवस्थित असावा असें लिहिलें होतें. पण या मागण्यास सुलतानानें धूप घातला नाहीं. तेव्हां ग्रीसमध्यें विशेषच प्रक्षोभ झाला. क्रीट बेटांत ग्रीक भाषा उपयोगांत आणूं नये असा फर्मान सुलतानानें सोडला होता. या हुकुमानें जनतेची प्रक्षुब्धता विशेषच वाढली.

आरमेनिया प्रांतास अब्दुल हमीद दडपशाही करीत होता. तेव्हां तीच दडपशाही या बेटांतही सुरू करावी असें त्यास साहाजिक वाटलें.

त्यानें महंमद जलालुद्दीन नांवाचे आपल्या पुढ्यांतले एक गृहस्थ तिकडे गव्हरनर ह्मणून पाठविले. क्रीटन ख्रिस्ती लढवय्ये असल्यामुळें तंटा विकोपास गेला. युरोपांतील ख्रिस्तीराष्ट्राच्या सूचनेवरून वरील गव्हरनरास परत बोलावण्यांत आलें व अलेक्झांडर पाच्छा यांची त्या जागीं नेमणूक करण्यांत आली. यांनी न्यायाचें पारडें समान ठेवल्यामुळें त्यांचें वर्तन सर्व युरोपियन वकिलांस मान्य झालें आणि यांनीं ख्रिस्ती प्रजेस सुख होईल असेंच वर्तन ठेविलें होतें. पण तेथील मुसलमान प्रजा या वर्तनाच्या आड येऊं लागली व गव्हरनरांच्या शांतीदायक कृत्यास हे विघ्नं घालूं लागले.

इ. स. १८९६ सालीं, तुराकाशी पाशा यांस गव्हरनर नेमण्यांत आले. यांणी पूर्वीच्या गव्हरनरांनी केलेलीं सर्व कृत्यें मोडून टाकलीं आणि क्रीट बेटांत जिकडे तिकडे लष्करी शिपाई फिरविण्यांत आले. या दडपशाहीमुळें तेथील ख्रिस्ती प्रजेनें पुनः बंड केलें. युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं यासंबंधानें सुलतानास सदुपदेश केला व सुलतानानींही तसें करण्याचें अश्वासन दिलें. बंडखोरांविरुद्ध जें लष्कर पाठविण्यांत आलें होतें त्याच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं बंडखोरास असें जाहीर केलें. कीं, तुमच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल. पण अगोदर शस्त्रें खाली ठेवा.' असला जाहिरनामा क्रीटन लोक थोडाच मानणार होते कारण या फसवणुकीची

अनुभव त्यांस पुष्कळदां आपला होता. बंडखोराच्या पुढाऱ्यांशीं पर-राष्ट्रीय वकिलांनी बोलणें सुरू केलें. बरीच बोलाचाली व प्रश्नोत्तरं झाल्यावर या बेटावर ख्रिस्ती गव्हरनर नेमण्याचें सुलतानानें कबूल केलें. क्रीटन लोकांची जाहीरसभा भरवूं देण्याचें मान्य केलें. पण अजूनही क्रीटन लोकांचा विश्वास बसला नव्हता.

इ. स. १८९६ सालीं क्रीटन मुसलमान लष्करांस मिळाले आणि ख्रिस्ती व मुसलमान यांची लढाई सुरू झाली. या ख्रिस्ती लोकांनीं ख्रिस्ती राष्ट्रांस मध्यस्थी करण्याबद्दल विनंति केली. या विनंतीस मान देऊन त्यांनी सुलतानास क्रीटबेटांतील अन्यायी राज्यपद्धतीबद्दल तक्रार केली. पण सुलतानानें या क्रीट बंडखोरास ग्रीस मदत करीत आहे याबद्दलच सर्व युरोपियन राष्ट्रांस तंबीवजा कळविलें.

इ. स. १८९७ सालीं ग्रीसनें आपलें सैन्य क्राइ येथील बंड-खोरास मदत करण्याकरतां पाठविलें. हें पहातांच ख्रिस्ती गव्हरनर परत गेला. यानंतर सहा बलाढ्य ख्रिस्ती राष्ट्रांनीं सुलतानास अशी इषारत पाठविली कीं क्रीटला स्वराज्य देण्याचें युरोपियन राष्ट्रांनीं ठरविलें आहे. तसेंच ग्रीकसैन्य व तुर्की सैन्य या बेटांतून निघून गेलें पाहिजे. यावेळीं ग्रीक सैन्याची एकंदर परिस्थिति चांगलीशी नव्हती. पण तुर्की सैन्य जर्मन अधिकाऱ्याखालीं तरबेज झालेलें होतें. वरील सहा राष्ट्रांनीं आणखी असेंही ठरविलें होतें कीं, या

प्रकरणात प्रथम जो आगळिक करील त्यास जबाबदार धरले जाईल. ग्रीक सरकारानें सरहद्दीवर सैन्य आणले त्याबरोबर अबदुल हमीदला आपलें सैन्य हालविण्यास आयतीच संधी मिळाली. त्यानें आपलें सैन्य इथेमपाशाच्या हाताखालीं देऊन ग्रीस देशावर पाठविलें. या युद्धांत युरोपियन राष्ट्रें पडतील अशी ग्रीसला आशा होती पण ती व्यर्थ गेली. या वेळीं ग्रीस देशांत स्वदेश प्रीति संबंधानें इतकीं कडाक्याचीं व्याख्यानें झालीं होतीं कीं ग्रीसनें शस्त्र हातीं धरलें नसतें तर ग्रीस देशांतच राज्यक्रांती झाली असती. अर्थात, लढाई चालू झाली. त्यांत प्रत्येक ठिकाणीं ग्रीसचा पराभव झाला. तेव्हां ही लढाई बंद पडावी ह्मणून सर्व राष्ट्रांनी मध्यस्थी केली.

सुलतानानें थेसेली प्रांत व १ कोट पौंड लढाईचा खर्च मागितला. आस्ट्रियाच्या मध्यस्थीनें दोन चिचोळे भाग टर्कीला द्यावे व लढाईचा खर्च ह्मणून ३६ लाख पौंड ग्रीसनें टर्कीला द्यावे असें ठरलें. ही लढाई ता. १८ मे १८९७ रोजी संपली.

ही लढाई संपली तरी क्रीटबेटांतील धुमाकूळ चालूच होता. लढाई चालू असतांही तो बंद पडला नव्हता. या बेटाच्या सभोंवती युरोपियन राष्ट्रांचें आरमार सज्ज होऊन बसलें होतें. या बेटाचा गव्हर्नर जेवद यांच्यात आणि आरमारी अधिकाऱ्यांत वारंवार तंटे होऊं लागले. यासंबंधानें बोलाचाली चालू असतां रशियानें असें सुचविलें कीं,

क्रीं या बेटावर ग्रीसच्या राजाचा दुसरा मुलगा प्रिन्स जार्ज यांस गव्हर्नर नेमण्यांत यावें. जर्मनी आणि आस्त्रिया या भानगडींत पडलेच नाहींत त्यानीं हें प्रकरण इंग्लंड, फ्रान्स, रशिया आणि इताली यांच्यावर सोपविलें. कांहीं इंग्रजी शिपाई क्रीट बेटांत उतरले. त्यांच्याशीं तुर्की गव्हनरच्या 'गुप्त सांगिवरून तुर्की सैन्यानें दंगा केला आणि कांहीं शिपाई मारले गेले. यावरून सर्व राष्ट्रांनी सुलतानास आपली फौज काढून घेण्याची नोटीस दिली व त्याप्रमाणें तुर्की सैन्य इ. स. १८९८ च्या नवंबर महिन्यांत बाहेर पडलें. प्रिन्स जार्ज यांस गव्हरनर नेमण्यांत आलें. हा १९०० पर्यंत गव्हरनर होता पुढें हें बेट हेलन साम्राज्यांत सामील करण्यांत आलें.

---

# भाग १५ वा.

## आरमेनियन रयत.

तुर्की साम्राज्यांस मिधतपाशानें सुचविलेल्या सुधारणा अमलांत आल्या असत्या तर त्या साम्राज्यांतील ख्रिस्ती प्रजेनें वेळोवेळीं चळवळी करून वेगळे पडण्याचा प्रयत्न कदाचित केला नसता. सर्व प्रजेस सारखीच स्वतंत्रता विशेषतः प्रार्थीक स्वातंत्र्य देण्यांत आलें असतें तरी

प्रत्येक वेळीं युरोपियन राष्ट्रास तुर्की साम्राज्याच्या अंतर्राज्य कारभा- रांत उघडपणें हात घालता आला नसता. तुर्की साम्राज्य मुसलमानी धर्माचें असल्यामुळें त्या धर्माचा व धर्मीयांचा वर्चस्वा असावा असें मुसलमानी प्रजेस वाटणें जरी साहजिक नैसर्गिक होतें तरी सर्व युरोप- भर स्वतंत्रतेचा जयजयकार चालू असतां एकट्या तुर्कस्थानातच प्रजा गुलमाच्या वेषांत राहणें शक्य नव्हतें तशांत ही प्रजा ख्रिस्ती अस- ल्यामुळें युरोपांतील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांनीं त्यांची पाठीराख करण्यास तयार होणें व तेणेंकरून या ख्रिस्ती प्रजेनें सुलतानी अम्मलास झुगारून देण्याचा प्रयत्न करावा हेंही त्या काळास योग्य असेंच घडलें. तुर्कस्थानांतील ख्रिस्ती प्रजेचा पक्ष इतर राष्ट्रांनी घेऊन तुर्की साम्रा- ज्याच्या अतर्व्यवस्थेंत हात घालणें न्याय्य कीं अन्याय्य हें ठरविणें आह्मीं वाचकांवरच सोपवितों पण दुर्बळ यांच्याशी झगडा चालू झाला असतां प्रबळाचें ह्मणणें शेवटीं खरें असें कबूल करावें लागलें व हाच न्याय तुर्क व इतर ख्रिस्ती राष्ट्रें यास लावणें चुकीचें होणार नाहीं. आरमेनिया प्रांतांत मुसलमानी वस्ती फार अलल्यामुळें त्यांनीं तेथील ख्रिस्ती लोकांस फार छळलें होतें. यावेळीं धार्मिक स्वातंत्र्य असलें तर ख्रिस्ती आरमेनियनांचा इतका छळ झाला नसता. आरमेनिया प्रातांत एकंदर वस्ती २६ लाख असून त्यांत ख्रिस्ती प्रजा १२ लाख आहे हे लोक उद्योगी, धंदताईक आणि शांत स्वभावाचे आहेत पण

घरेच हेकेखोर आहेत व हा हेकाच त्यास वेळोवेळीं नडलेला आहे. हे आरमेनियम व्यापारासाठीं तुर्कस्थान, रशिया, इराण व ईजिप्तमध्यें रहावयास गेलेले आहेत. हे मोठे बुद्धिवान असल्यामुळें खुद्द तुर्की साम्राज्यांत ते प्रधानापर्यंतच्या पदवीला पोंचलेले आहेत. परंतु दुर्दैव कीं अबदुल हमीद या लोकांस आपले शत्रू समजत होता. हे लोक परकीय व परधर्मीय लोकांस मिळून आपल्या राज्यांतून बाहेर पडतील ही त्यास मोठी भीति होती.

इ. स. १८७८ सालीं या लोकांची स्थिती फार भयसूचक झाली. स्यान स्टेफानों येथें जो तह झाला होता त्यांत अशी एक अट होती कीं ' ज्या अर्थी रशिया आरमेनियाहून आपलें सैन्य काढून घेत आहे त्याअर्थी त्या प्रदेशांतील स्थानिक गरजा, सुधारणा वगैरे टर्कीनें करण्यात व कर्द आणि सिरक्याशियन लोकापासून त्यांचें रक्षण करावें बर्लिन येथील तहांत या अटीसंबंधानें बरीच फिरवाफिरव करण्यांत आली होती. त्या प्रांतांतील स्थानिक गरजा व सुधारणा करण्याचें सुरू झाल्यानंतरच रशियन सैन्य बाहेर पडेल असें या तहाच्यावेळीं वाटलें होतें. पण हा प्रांत रशियानें लागलाच सोडला. या लोकांबद्दल रशियांत फारशि सहानुभूति नव्हती बर्लिन तहांत अशी अट होती:— या प्रांतांतील स्थानिक सुधारणा टर्कीनें हस्या हस्यानें द्याव्या व त्या इतर राष्टांस कळवाव्या या सुधारणासंबंधानें राष्ट्रांची नजर राहील, '

पण अबदुल हमीदनें यापैकीं कांहींही केलें नाहीं आणि ख्रिस्ती राष्ट्रांनींही त्यांस विचारलें नाहीं. अर्थात तहातले शब्द तहांत राहिले.

अलेघो येथें केमीलपाशा नांवाचा गव्हरनर होता. झीठन येथें आरमेनियन लोकांवर हल्ला करण्यांत आला पण त्या विरुद्ध या गव्हरनरानें कांहीं केलें नाहीं. इंग्रजी वकिलानें फारच सतावून सोडल्यामुळें या गव्हरनरास सुलतानानें बडतर्फ केलें पण कांहीं दिवसांनीं त्यास दुसरा एक बडा अधिकार देण्यांत आला. आपल्या मर्जीतल्या माणसास निरूपायानें काढून टाकावें लागलें तर त्यांस पुनः दुसरीकडे मोठी नोकरी द्यावयाची ही अबदुल हमीदची रितच पडून गेली होती.

आरमेनियाची स्थिती उत्तरोत्तर फार वाईट होत चालली. यांच्यावर अधिकारी जो जुलूम, जबरदस्ती करीत होते त्यामुळें खुद मुसलमानी प्रजाही फार हळहळत असे. आरमेनिया प्रांतांत रशियाची सरहद्द ठरविण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनच्या चवकशींत दोन खेड्यांची तुलना करण्यांत आली त्यावेळीं तुर्की खेडें अधिकाऱ्यांनीं गांजून सोडलेलें आहे असें दिसून आलें.

मिधतपाशाच्या मागून आलेल्या वजिरानांनीं इंग्रजी सुधारणाचा खर्डा मान्य केला होता पण सुलतान कांहींच करण्यास तयार होईना. ' बर्लिनच्या तहाप्रमाणें टर्कीनें काय केलें तें कळवावें ' असा एक खलिता सर्व राष्ट्रांच्या सह्यांनीं टर्कीकडे पाठविण्यांत आला. यास

उत्तर ह्मणून पुढील खलिता पाठविला:—'निरनिराळ्या अडचणी उपस्थित होत असतांही तहाची अट पुरी करण्याचें सरकारच्या मनांत फार फार आहे, सरकारानें योग्य अधिकारी कुर्दस्थानांत पाठविण्यांत आले आहेत. या प्रांतांतील आरमेनियन लोकांचें रक्षण कशा रितीनें करतां येईल हेंच विशेष काम या अधिकाऱ्यांस सांगण्यांत आलें आहे.' दुसऱ्या एक्या खलित्यांत सुलतान लिहितात कीं, न्यायाच्या कोर्टांत सुधारणा केली आहे, कर वसूल करण्याच्या नव्या पद्धती सुरू केल्या आहेत. पोलिसांत सुधारणा करण्याचें काम चालू आहे आणि राज्य कारभारांत अतिभेद लक्षांत न आणतां गुणांवरून अधिकार देण्यांत येत आहेत, विद्यावृद्धीकडे पूर्णपणें दिलें जात आहे, सार्वजनिक हिताचीं कामें चालू आहेत तेव्हां आपणास कळवावयाचें तें हेंच कीं आरमेनियांत जरा कोठें दंगा अगर मारामारी झाल्यास या गोष्टी सर्व जगांत नेहमीच चालू असतात. त्याबद्दल आरमेनियन लोक त्याचा बाऊ करून दाखवितात आणि हाच बाऊ ते परराष्ट्रांच्या नजरेस आणतात' या खलित्यावरून तुर्की अधिकाऱ्यांतही कांहीं सुपीक डोक्याची माणसें होतीं असें दिसतें.

वर निर्दिष्ट केलेल्या खलित्यासंबंधानें स्पष्टीकरण देण्यासाठीं आरमेनियांतील इंग्रजी वकिलास आव्हान करण्यांत आलें. यानें यांस उत्तर दिलें तें असें. ( १ ) सुधारणा भ्रामक आहेत, ( २ ) कमिशनांनीं

कांहीं केलें नाहीं. ( ३ ) न्यायांच्या कोर्टांत सुधारणा झाल्यामुळें त्रास मात्र वाढला आहे ( ४ ) पोलिस खात्यांत अधिकार वसूल करण्यांत कांहीं सुधारणा झालेल्या नाहींत, वेकरपाशा या बाजूला आलेच नाहींत मग सुधारणा काय करणार ?

खुद्द कॉन्सांटिनोपल येथें सुधारणा झाल्यावाचून शास्त्र सुधारणा होणें शक्य नाहीं असें इंग्रजी थकिलानें स्पष्ट ह्मटलेलें होतें. वरील सुलतानाच्या खलित्यास उत्तर ह्मणून यूरोपस्थ प्रबळ खिस्ती राष्ट्रांनीं एक खलिता सुलतानाकडे पाठविला होता. या खलित्याच्या शेवटीं असें लिहिलें होतें कीं " आरमेनियन लोकांचें जीवित आणि वित्त यांचें रक्षण होण्यासाठीं सुधारणा त्वरित देण्यांत याव्यात, कर्ड लोक वारंवार धाडी घालतात त्यांचा बंदोबस्त लवकर झाला पाहिजे, वसुलाची रीत लवकर अमलांत आली पाहिजे, सशस्त्र पोलिसांची सुधारणा केली पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे गव्हरनर जनरलास जास्त अधिकार देऊन त्यांची नेमणूक अबाधित राहिली पाहिजे. शेवटीं आह्मी प्रबळ राष्ट्रें असें बजावतों कीं तहांत ठरलेल्या सुधारणा स्थानिक हिताच्या झाल्या पाहिजेत आणि त्या आमच्या नजरेखालीं व्हाव्यात " या खलित्यास सुलतानानें उत्तर पाठविलें पण सुधारणा वगैरे कांहींही करण्यांत आलें नाहीं. या सुधारणांचा प्रकरणांत एकट्या इंग्लंडनें खूप जोर मारला होता पण इतर राष्ट्रें मूग गिळून बसलीं होतीं.

विद्यावृद्धि शेकडा ५ सुद्धां झाली नव्हती आरमेनियांतील सोचनीय स्थिती बद्दल इंग्रज सरकारानें प्यारिस, बर्लिन, व्हीएन्ना, पिटर्सबर्ग आणि रोम येथील आपल्या वकिलांस ' या शोचनीय स्थितीबद्दल त्या या सरकास कळवा ' असें कळविलें होतें.

पुढील दहा वर्षांत आरमेनियांतील स्थिती मुळींच बदलली नाहीं व सुलतानानें युरोपच्या तोंडास पानें पुसलीं. रसियानें मदत न केल्यास एकट्या इंग्लंडचे कांहींहि चालावयाचें नाहीं हें इंग्लंडासही कळून चुकलें होतें. आरमेनियन लोकांस स्वराज्य नको होतें किंवा रशियाच्या पंखाखालीं जावें अशीही त्यांची इच्छा नव्हती. आपल्या वरील राज्य कारभार सुराज्य पद्धतीनें चालावा व तेणेंकरून आपली व आपल्या स्त्रियांची अब्रू. मित्र आणि जीवित यांचें रक्षण व्हावें एवढेंच त्यांचें मागणें होतें. या लोकांवर कर्ड जातीचे लोक वारंवार हल्ले करीत. या कर्ड लोकाचा मुसत्वे नांवाचा एक पुढारी होता. या हल्ल्यासंबंधानें चवकशी होण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें. या मुसत्वे पुढाऱ्यास कैद करून चवकशीसाठीं कान्स्टांटिनोपल येथें आणण्यांत आलें हा पुढारी 'मी जें काय करतों तें अबदुल हमीदच्या सांगण्यावरून करतों ' असें स्पष्ट ह्मणत असे. ही चवकशी उघड करण्यांत येऊन मूसत्वे यास " निर्दोषी ठरविण्यांत आलें. या कामीं जो धडधडीत अन्याय. झाला तो सुधारावा ह्मणून त्याची पुन:

चवकशी करण्यांत आली. या वेळीं तो गुन्हेगार ठरला. पण शिक्षा वगैरे कांहीं देण्यांत आली नाहीं. अवदुल हमीदनें कुर्ड लोकांची एक पलटण तयार करून ती तो कान्स्टांटिनोपल शहरांत नेहमी नाचवीत असे.

## कुर्ड आणि आरमेनियन.

कर्ड लोक डोंगराळ अशा सहा प्रांतांत विशेषेंकरून रहात असत. यांची एकंदर लोक संख्या दोन लाखाहून जास्त नाहीं ह्या डोंगराच्या पायथ्याशीं सपाटीवर आरमेनियन शेतकरी राहतात. या प्रांतांतील आरमेनियन लोकांस निःशस्त्र करण्यांत आलें होतें. पुष्कळ आरमेनियन खेडीं कर्ड लोकांच्या संस्थानिकांस खंडणी देत असत. यांच्या तक्रारीकडे कोणीही लक्ष देत नसे. युरोपियन मिशनरी लोकांनी व वकिलांनी कान्स्टाटिनोपलपर्यंत जरी ओरड केली तरी दाद लागण्याची मारमार असे. पुढें पुढें हे कर्ड लोक आरमेनियन लोकांच्या स्त्रिया पळवून नेऊं लागले त्यामुळें ओरडा फारच झाला. पण तेथील गव्हरनर आपला अधिकार रहावा ह्मणून आरमेनियन लोकांच्याच विरुद्ध रिपोर्ट करी. स्त्रिया कां नेण्यांत येतात. असें जर कोणी विचारलें तर त्यास उत्तर असें मिळे कीं या स्त्रिया मुसलमानी धर्म स्वीकारूं इच्छितात मग आह्मी तरी काय करावें ! हे कर्ड जास्तच रानटी

आणि दांडगे असल्यामुळे त्यांच्यापुढें तुर्की सैन्याचीही मात्रा चालत नसे. कधीं कधीं तर बंदोबस्तासाठी पाठविलेलें सैन्य कर्ड लोकांस मिळून आरमेनियन लोकांसच लुटीत. अबदुल हमीद आरमेनिया नावाचा इतका तिटकारा करी त्याचें नांव सरकारी कागदीं पत्रीं घेऊं नये असें त्यानें फर्मानच सोडला होता. तसेंच इग्लंड, फ्रान्स व रशिया यांनीं आरमेनियन लोकांची बाजू उचलल्यामुळें तर तो जास्तच खवळून गेला. या लोकांचा एक धार्मिक गुरु रशियाच्या हद्दींत रहात असे व दुसरा कान्स्टांटिनोपल येथें राहात असे. याणींही पुष्कळ मध्यस्थी करून पाहिली व ती सर्व निर्फळ झाली.

## कत्तली.

इ. स. १८९४ पासून आरमेनिया प्रांतांत कत्तली सुरू झाल्या यांपैकीं पहिली कत्तल सास्सन येथें करण्यांत आली. या प्रांतांतील लोक कर्ड लोकांच्या संस्थानिकांस स्वसंरक्षणार्थ नियमित कर देत असत अलीकडे तुर्की अधिकाऱ्यांनीं यांच्यापासून कर व वसूल करण्याचें सोडून दिलें होतें. पण इ. स. १८९४ च्या नवंबर महिन्यांत ‘ तुमच्यापासून कराची वसुली जाईल ’ असा त्यांस हुकूम करण्यांत आला हा कर वसूल करण्यासाठीं तुर्की फौजही पाठविण्यांत आली. आपणांस कर्ड लोक मदत करतील या आशेवर त्यांनीं कर देण्याचें नाकारलें. तेव्हां कर वसूल करण्याबद्दल फौजेस हुकूम करण्यांत आला.

त्यांनी निःशस्त्र रयतेवर गोळीबार सुरू केला. सुमारें २९ खेडीं जाळण्यांत आलीं व हजारों आरमोनियनांची कत्तल उडविण्यांत आली. यासंबंधानें सुलतानानें अशी हकीकत प्रसिद्ध केली कीं आरमेनियांत कांहीं बंडखोर लोकांनी परदेशांतून हत्यारें आणून दंगा केला तो हटविण्यासाठीं व गरीब प्रजेचें रक्षण करण्यासाठीं ही कत्तल करणें भाग पडलें. या कत्तलीमुळें कर्ड लोक जास्तच चढून गेले. 'आपली सत्ता या लोकांवर इतकेंच नाहीं तर ती सत्ता सुलतानासही कबूल आहे' असें ते म्हणूं लागले. या वेळीं सुलतानानें प्रबळ राष्ट्रासही धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न केला.

आरमोनियन शेतकऱ्यांत शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें जुलमाला मान वाकविण्याची त्यांची प्रकृति कमी होत चालली. पण मुसलमानी न्यायासनापुढें खरा न्याय मिळण्याची भ्रांती पडल्यामुळें कर्ड लोकांनी जबाबदारीनें त्यांच्यापैकीं कांहीं जमिनींचा ताबाही घेतला होता. यामुळें पुष्कळ शेतकरी शेत वाड्या सोडून बाह्य देशीं पळून गेले. हे लोक बहुश. रशियांत जात असत. पण तेथें जाण्याची सरकारानें बंदी केली होती. ही भरती आपल्या देशांत होऊं नये असें रशियासही वाटत होतें. रशियांत पळून गेलेल्या लोकांनी तुर्की राज्यांतील आपल्या जाती बांधवांस न्याय मिळावा म्हणून सभा स्थापन केल्या. फार थोड्या लोकांस रशियानें हा प्रांत जिंकून घ्यावा असेंही वाटत होतें.

या सभांतून राज्य क्रांतीकारक चळवळ सुरू होती. आरमेनियांतील कांहीं लोकांस असेंही वाटे कीं मुद्दामच दंगा करावा ह्मणजे कत्तली होतील. आणि तेणेंकरून युरोपचें लक्ष इकडे सहजच लागेल. पण ही आशा व्यर्थ होय. अशा प्रकारें मदत करणारा ह्मटला तर एकटा रशियाच होता पण त्यास हें विघ्न आपल्या घरांत नको होतें. अबदुल हमीदनें आरमेनियन शाळा बंद केल्या. आरमेनियाच्या हकीकतीची पुस्तकें आपल्या राज्यांत न येऊं देण्याचा हुकूम सोडला; शाळेंतील मास्तरांवर खटलें होऊं लागले. धरपकड चवकशी वाचून अटक जुलूम जबरदस्ती वगैरे प्रकार चालू झाले. आरमेनियांतील इंग्रजी वकिलानें तुर्की दरबारांतील इंग्रजी वकिलास कळविलें कीं ६० आरमेनियन लोकांस पकडण्यांत आलें होतें. या वेळ्यांत एका मुसलमानाचा खून झाला होता याबद्दल इंग्रजी वकिलानें सुलतानाची गांठ घेतली त्यावेळीं 'तुह्मी ह्मणतां तें सगळें खरें पण एक मुसलमान मारला गेला याची वाट काय! आमची इज्जत राहिली पाहिजे कीं नको' या उत्तरावरून एका मुसलमानाबद्दल ६० निरपराधी माणसांस बळी देण्याचा सुलतानाचा हेतू होता हें उघड होतें.

आरमेनिया प्रांतांत चालू असलेले प्रकार युरोपांत कळता उपयोगी नाहीं कारण ते कळले तर प्रबळ राष्ट्रें गडबड करूं लागतील, मुसलमान लोकांनीं आरमेनियनांची कत्तल करावी ह्मणून अबदुल

चवकशी करण्यांत आली. या वेळीं तो गुन्हेगार ठरला. पण शिक्षा वगैरे कांहीं देण्यांत आली नाहीं. अबदुल हमीदनें कर्ड लोकांची एक पलटण तयार करून ती तो कान्स्टांटिनोपल शहरांत नेहमी नाचवीत असे.

## कर्ड आणि आरमेनियन.

कर्ड लोक डोंगराळ अशा सहा प्रांतांत विशेषेंकरून रहात असत. यांची एकंदर लोक संख्या दोन लाखाहून जास्त नाहीं ह्या डोंगराच्या पायथ्याशीं सपाटीवर आरमेनियन शेतकरी राहतात. या प्रांतांतील आरमेनियन लोकांस निःशस्त्र करण्यांत आलें होतें. पुष्कळ आरमेनियन खेडीं कर्ड लोकांच्या संस्थानिकांस खंडणी देत असत. यांच्या तक्रारीकडे कोणीही लक्ष देत नसे. युरोपियन मिशनरी लोकांनी व वकिलांनी कान्स्टाटिनोपलपर्यंत जरी ओरड केली तरी दाद लागण्याची मारमार असे. पुढें पुढें हे कर्ड लोक आरमोनियन लोकांच्या स्त्रिया पळवून नेऊं लागले त्यामुळें ओरडा फारच झाला. पण तेथील गव्हरनर आपला अधिकार रहावा ह्मणून आरमोनियन लोकांच्याच विरुद्ध रिपोर्ट करी. स्त्रिया कां नेण्यांत येतात. असें जर कोणी विचारलें तर त्यास उत्तर असें मिळे कीं या स्त्रिया मुसलमानी धर्म स्वीकारूं इच्छितात मग आह्मी तरी काय करावें ! हे कर्ड जास्तच रानटी

आणि दांडगे असल्यामुळे त्यांच्यापुढें तुर्की सैन्याचीही मात्रा चालत नसे. कधीं कधीं तर बंदोबस्तासाठीं पाठविलेलें सैन्य कर्ड लोकांस मिळून आरमेनियन लोकांसच लुटीत. अबदुल हमीद आरमेनिया नावाचा इतका तिटकारा करी त्याचें नांव सरकारी कागदों पत्रीं येऊं नये असें त्यानें फर्मानच सोडला होता. तसेंच इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांनीं आरमेनियन लोकांची बाजू उचलल्यामुळें तर तो जास्तच खवळून गेला. या लोकांचा एक धार्मिक गुरु रशियाच्या हद्दींत रहात असे व दुसरा कान्स्टांटिनोपल येथें राहात असे. याणींही पुष्कळ मध्यस्थी करून पाहिली व ती सर्व निष्फळ झाली.

## कत्तली.

इ. स. १८९४ पासून आरमेनिया प्रांतांत कत्तली सुरू झाल्या यांपैकीं पहिली कत्तल सास्सन येथें करण्यांत आली. या प्रांतांतील लोक कर्ड लोकांच्या संस्थानिकांस स्वसंरक्षणार्थ नियमित कर देत असत अलीकडे तुर्की अधिकाऱ्यांनीं यांच्यापासून कर व वसूल करण्याचें सोडून दिलें होतें. पण इ. स. १८९४ च्या नवंबर महिन्यांत ' तुमच्यापासून कराची वसुली जाईल ' असा त्यांस हुकूम करण्यांत आला हा कर वसूल करण्यासाठीं तुर्की फौजही पाठविण्यांत आली. आपणांस कर्ड लोक मदत करतील या आशेवर त्यांनीं कर देण्याचें नाकारलें. तेव्हां कर वसूल करण्याबद्दल फौजेस हुकूम करण्यांत आला.

त्यांनी निःशस्त्र रयतेवर गोळीबार सुरू केला. सुमारें २९ खेडीं जाळण्यांत आलीं व हजारों आरमेनियनांची कत्तल उडविण्यांत आली. यासंबंधानें सुलतानानें अशी हकीकत प्रसिद्ध केली कीं आरमेनियांत कांहीं बंडखोर लोकांनी परदेशांतून हत्यारें आणून दंगा केला तो हटविण्यासाठीं व गरीब प्रजेचें रक्षण करण्यासाठीं ही कत्तल करणें भाग पडलें. या कत्तलीमुळें कर्ड लोक जास्तच चढून गेले. 'आपली सत्ता या लोकांवर इतकेंच नाहीं तर ती सत्ता सुलतानासही कबूल आहे' असें ते म्हणूं लागले. या वेळीं सुलतानानें प्रबळ राष्ट्रांसही धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न केला.

आरमेनियन शेतकऱ्यांत शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें जुलमाला मान वाकविण्याची त्यांची प्रकृति कमी होत चालली. पण मुसलमानी न्यायासनापुढें खरा न्याय मिळण्याची भ्रांती पडल्यामुळें कर्ड लोकांनी जबाबदारीनें त्यांच्यापैकीं कांहीं जमिनींचा ताबाही घेतला होता. यामुळें पुष्कळ शेतकरी शेत वाड्या सोडून बाह्य देशीं पळून गेले. हे लोक बहुश. रशियांत जात असत. पण तेथें जाण्याची सरकारानें बंदी केली होती. ही भरती आपल्या देशांत होऊं नये असें रशियासही वाटत होतें. रशियांत पळून गेलेल्या लोकांनी तुर्की राज्यांतील आपल्या जाती बांधवांस न्याय मिळावा म्हणून सभा स्थापन केल्या. फार थोड्या लोकांस रशियानें हा प्रांत जिंकून घ्यावा असेंही वाटत होतें.

या सभांतून राज्य क्रांतीकारक चळवळ सुरू होती. आरमेनियांतील कांहीं लोकांस असेंही वाटे कीं मुद्दामच दंगा करावा ह्मणजे कत्तली होतील; आणि तेणेंकरून युरोपचें लक्ष इकडे सहजच लागेल. पण ही आशा व्यर्थ होय. अशा प्रकारें मदत करणारा ह्मटला तर एकटा रशियाच होता पण त्यास हें विघ्न आपल्या घरांत नको होतें. अबदुल हमीदनें आरमेनियन शाळा बंद केल्या. आरमेनियाच्या हकीकतीची पुस्तकें आपल्या राज्यांत न येऊं देण्याचा हुकूम सोडला; शाळेंतील मास्तरांवर खटलें होऊं लागले. धरपकड चवकशी वाचून अटक जुलूम जबरदस्ती वगैरे प्रकार चालू झाले. आरमेनियांतील इंग्रजी वकिलानें तुर्की दरबारांतील इंग्रजी वकिलास कळविलें कीं ६० आरमेनियन लोकांस पकडण्यांत आलें होतें. या वेढ्यांत एका मुसलमानाचा खून झाला होता याबद्दल इंग्रजी वकिलानें सुलतानाची गांठ घेतली त्यावेळीं 'तुह्मी ह्मणतां तें सगळें खरें पण एक मुसलमान मारला गेला याची वाट काय ! आमची इज्जत राहिली पाहिजे कीं नको' या उत्तरावरून एका मुसलमानाबद्दल ६० निरपराधी माणसांस बळी देण्याचा सुलतानाचा हेतू होता हें उघड होतें.

आरमेनिया प्रांतांत चालू असलेले प्रकार युरोपांत कळता उपयोगी नाहीं कारण ते कळले तर प्रबळ राष्ट्रें गडबड करूं लागतील, मुसलमान लोकांनीं आरमेनियनांची कत्तल करावी ह्मणून अबदुल

हमीद आपले हेर तिकडे पाठवित असे. हे हेर मशिदींत जाऊन असा उपदेश करीत असत कीं ' आरमेनियन लोक तुमच्यावर हल्ला करणार आहेत तेव्हां तत्पूर्वीच तुम्हीं त्यांच्यावर हल्ले करून त्यांचीं घरें दारें लुटा' ' या प्रोत्साहनानें दंगेखोर मुसलमानास प्रोत्साहन मिळे. या दंग्यामुळें रशियांत जाऊन राहिलेल्या आरमेनियनांनीं साम्राज्य उलथून पाडण्यासाठीं एक कमेटी स्थापन केली या कमेटीचें नांव हेर्नेचक असें होतें. या कमेटीचे मेंबर आरमेनियांत छपून छपून येत, या खटपटीनें फायदा तर कांहीं होणार नाहींच पण अबदुल हमीदला कत्तल उडविण्यास हें एक कारण आयतेंच मिळेल असें आरमेनिया प्रांतांत राहणाऱ्या लोकांस वाटत होतें. या कत्तलीच्या बातम्या हळू हळू रशिया व पश्चिम युरोपांत पसरूं लागल्या. तेव्हां या प्रसारानें प्रबळ राष्ट्रें क्षुब्ध होवूं नयेत म्हणून इ. स. १८९९ च्या आक्टोबर महिन्यांत सुधारणांचा एक खर्डा तयार करण्यांत आला. या सुधारणा प्रथम आनाटोलिया प्रांतास द्यावयाच्या होत्या. ज्या दिवशीं या सुधारणा प्रसिद्ध झाल्या त्याच दिवशीं त्रेबिझांड येथें एक कत्तल झाली. ही कत्तल फार मोठी झाली. दुकानें लुटण्यांत आलीं. इ. स. १८९९ तील कत्तल एरझेरूम, बिटलीस, माराश, खारपार आणि झीटंब येथें करण्यांत आली होती. या कत्तली संबंधानें राष्ट्रांनीं नवंबर महिन्यांत तक्रार केली. पण ' सगळ्या आरमेनिया प्रांतांत बंडाळी उत्पन्न झाल्या-

मुळें असें करणें भाग पडलें ' असें सुलतानानें उत्तर दिलें. या व सुमारास त्याची मुसलमानी प्रजाही बरीच बेदिल झाली तेव्हां सुलतानास मोठा प्रश्न येऊन पडला. सय्यदपाशानेंही आरमेनियांत सुधारणा कराव्या असें सुचविलें होतें अर्थात त्यांस प्रधानकीचा राजीनामा द्यावा लागला. हा प्रधान पळून गेला व इंग्रजी वकिलांतीत लपून बसला. यास काढून लावण्यासाठीं सुलतानानें वकिलास कळविलें पण आश्रय मागण्यास आलेल्या इसमास शत्रूच्या स्वाधीन करणें तुमच्या व आमच्या धर्माच्या विरुद्ध आहे ह्मणून मी त्यास काढून देत नाहीं असा जबाब देण्यांत आला. पुढें कांहीं दिवसांनीं सय्यद बाह्य देशीं निघून गेला या कत्तलीसंबंधानें सरकारी रिपोर्ट बाहेर पडला. आरमेनियन लोकांनीं मशीदी जाळल्या, मुसलमानांनीं स्त्रियांवर हल्ले केले तेव्हां या कत्तलीला तेच कारणीभूत आहेत असें या रिपोर्टांत ह्मटलें होतें. कारा हिसार येथें जी कत्तल उडविण्यांत आली तींत प्रत्येक घर शोधण्यांत येई. या घरांत एखादा ग्रीक सांपडल्यास घरांतील सर्व माणसांची कत्तल उडविण्यांत येई. झीटम येथें अशीच कत्तल करण्यांत आली पण व्हिक्टोरिया राणीनें सुलतानास विनंति केल्यावरून ही कत्तल लवकरच थांबली. या कत्तलीस कांहीं ठिकाणचे धार्मिक मुसलमान विरोधही करीत. अब्दुल हमीदचा हेर एका मशिदींत उपदेश करीत होता. त्याचा तो उपदेश संपल्यावर तेथील एक वृद्ध मुसलमान पुढें

आला आणि ह्मणाला कीं ' आमच्या धर्मात कोणाचीही कत्तल करूं नये असें लिहिलें आहे. आरमेनियन लोक बंड करणारे नाहींत तेव्हां त्यांची कत्तल मी होवूं देणार नाहीं. हा हेर अबदुल हमीदचें नांव सांगतो पण तें खोटें असलें पाहिजे. मुसलमानी सुलतान असें कधींही सांगणार नाहीं. वगैरे या एकंदर कत्तलींत ३ ।। आरमेनियन मारले गेले असावेत असा आदमास आहे. पाश्चिमात्य वर्तमान पत्रांचे बातमीदार साम्राज्यांत येऊं नयेत ह्मणून अबदुल हमीद फार बंदोबस्त ठेवी. तरीपण एका पत्राचा बातमीदार इंजिनियर ह्मणून आंत घुसला होता; दुसरा एक दुभाष्या ह्मणून शिरला होता. रशियांत राज्यक्रांति कारक ज्या चळवळी होत आहेत त्या दाबून टाकण्यासाठीं मी या गोष्टी करतों असें अबदुल हमीद प्रसिद्धपणें ह्मणत असे व त्यांत तथ्यांशही थोडासा होता. आरमेनियांतील अमेरिकेच्या मिशनऱ्यांनी कत्तलीची हकीकत अमेरिकेंत कळविली होती. आरमेनियन लोक मुसलमानी धर्म स्वीकारील तर या कत्तली थांबतील असें कित्येक परकीय वकिलांस वाटत होतें पण ती गोष्ट ते लोक कबूल करीनात. एका स्त्रीनें आपल्या नवऱ्यास एक पत्र लिहिलें होतें. यांत ती ह्मणते ' आमच्या घरांत मुसलमान शिरले व त्यांनी आपला सात वर्षांचा छोकरा हातांत घेतला आणि तूं बाटत नसलीस तर तर या मुलास मी छाटून टाकतों असें तो ह्मणूं लागला. मी बाटण्यास

तयार झालें. अशाच प्रकारें पुष्कळ स्त्रिया बाटल्या आहेत. '

ता.२८ डिसेंबरची कत्तल फार भयंकर होती. तुर्की सैन्यानें शहरास वेढा दिला. नळाचें पाणी तोडून टाकण्यांत आलें. बाहेरच्या लोकांस फसवितां यावें ह्मणून आर्मेनियनच्या सहीनें खोट्याच ताराही प्रसिद्ध करण्यांत आल्या. या तारांत ' शांतता आहे असें लिहिलें होतें. एका ख्रिस्ती देवळास वेढा देण्यांत आला. दुपारीं बारा वाजतां आंत असलेल्या एका इसमाने हिरवा रूमाल दाखविला. त्याबरोबर वेढा उठला. हा रुमाल दाखविणें ह्मणजे सर्व माणसें बाटण्यास तयार आहेत. असें शाबीत करणें कांहीं शीक लोकांनीं सुमारें १०० तरुणांस पकडून आणलें व त्यास पाठीवर निजवून त्याच्या माना, कुराणांतील वचनें ह्मणून, कापण्यांत आल्या. या कत्तली बिगुल वाजून सुरू होतात व बंदही होतात. ख्रिस्ती देवळावर हल्ला करण्याची पूर्वापार वहिवाट नव्हती पण यावेळीं तीही बंद पडण्यांत आली. एका देवळांत ३००० माणसें केवळ हल्ला होणार नाहीं ह्मणून लपून बसलीं होतीं पण तेथेंही हल्ला झालाच. या सर्व माणसांस कापून काढण्यांत आलें कित्येक देवळांस आगीही लावण्यांत आल्या होत्या. ता. २८ व २९ दिसेंबर रोजीं ८००० माणसांची कत्तल झाली असली पाहिजे. सुमारें ४००–५०० लोक मुसलमान झाले.

## कान्स्टांटिनोपल येथें कत्तल.

आरमेनिया प्रांतांत आरमेनियनांची कत्तल झाली असें नाहींतर खुद्द राजधानींत सुद्धां ती झालेली आहे इ. स. १८९५ च्या सपटेंबर महिन्यांत आरमेनिया लोकांनी कान्स्टांटिनोल येथें एक मोठा जमाव गोळा केला. सर्व राष्ट्रांनीं या विरुद्ध टीका केली पण आरमेनियनांच्या आड कोणीच आलें नाहींत. तुर्की लोकांनी हा जंगी जमाव पाहून त्यावर हल्ला केला याशिवाय तेथें कुर्दलोकही होते यांच्या हातांत ' सोपाजी' नावाचे भाले होते व कांहीं आडदांड मुसळमानही होते. या सर्वांनीं गलाटा, पीरा वगैरे पेठांतून ठरलेल्या वेळीं दंगा करण्यास सुरूवात केली. राजधानींत आरमेनियन लोकांचा मोटा व्यापार चालतो तेव्हां पुरुष मंडळी इकडे आली असतां या पेठांतून दंगा सुरू झाला. पण या दंग्याहून एक वर्षानें झालेला दंगा फार मोठा होता. हा इ. स. १८९६ च्या आगष्ट महिन्यांत झाला. या दोन्ही दंग्याच्या वेळीं सुजान मुसलमानांनीं आरमेनियनांचे रक्षण करण्याचा बराच प्रयत्न केला. फू आदपाशा नांवाचे एक सरदार मुसलमान असूनही आरमेनियनांचे कैवारी होते. यांणी बास्फरस सामुद्रधुनींच्या आशीयाच्या भागांत त्यांची कत्तल न करूं देण्याचा हुकूम सोडला होता. खुद्द राजधानींतच कत्तल झाल्यामुळें परकीय राष्ट्रांचा वकिलांस कत्तलीत कशी दंगा उडते हें साहाजिकच दिसलें. ' राज-

धानींत सुरू झालेली कत्तल एकदम बंद न होईल तर तुमच्या गादीस धक्का बसेल ' असें एक फ्रेंच भाषेंत लिहिलेलें पत्र या वकिलांनीं अबदुल हमीदकडे पाठविलें. हें पत्र येतांच कत्तल बंद झाली. कांहीं दिवसांनीं या वकिलांनीं सर्वांच्या सहीचा पुढील खलिता पाठविला होता:—राजधानींत झालेला रक्तपात आह्मीं सुलतानाच्या नजरेस आणतों. तुर्की लोकांनीं केलेली ही कत्तल अधिकाऱ्यांची चिथावणीनें झाली असावी असें दिसतें. आरमेनियन राजक्रांतिकारक लोकांनी आटोमन ( महंमदी ) ब्यांकेवर हल्ला केल्याची बातमी उठतांच चोहोंबाजूंनीं मुसलमानांनीं कत्तलीस प्रारंभ केला. या दंग्याची व कत्तलीची बातमी आह्मीं आपापल्या सरकारास देऊं तेव्हां याबद्दल तुर्की सरकारानें चवकशी करावी." या पत्रास अबदुल हमीदनें उत्तर दिलें तें:—मुसलमान लोकांचा दंगा अधिकाऱ्यांच्या चिथावणीनें झालेला नाहीं; मृत्यु पावलेल्या लोकांत बरेच मुसलमानही आहेत. तेव्हां या दंग्यांत जे मुसलमान व आरमेनियन पुढारी असतील त्यांची अवश्य चवकशी केली जाईल या दंग्याचें खापर आपल्या माथ्यावर फुटूं नये ह्मणून अबदुल हमीदनें कतचक सैय्यद यास एकदम बडतर्फ केलें. याच्या जागेवर कियामिल यास नेमण्यांत आलें. आरमेनियांस सुधारणा द्या अशी त्यानें अबदुल हमीदला विनंती केली. या सुधारणा आमलांत आल्या कीं नाहीं हें पाहण्यासाठीं एक इंग्रज कामदार नेमण्यांत यावा

ही दुसरी अट सुलतानास कबूल नव्हती. कियामल यानें तुर्की कमिशन नेमलें पण कियामलचे सर्व प्रयत्न फुकट गेले कियामल यानें दोन तीनदां आपल्या जागेचा राजीनामा दिला. पण हा प्रधान परराष्ट्रीय वकिलाच्या मर्जीतला आहे ह्मणून सुलतानानें तो मंजूर केला नाहीं. पण शेवटीं इ. स. १८९५ सालीं सुलतानानें त्यास बडतर्फ केलें आणि शिक्षा ह्मणून त्यास अलेपो येथें गव्हरनराच्या जागीं पाठविलें.

या कत्तलीसंबंधानें अबदुल हमीदचे पक्षपाती लोक असें कारण शोधून काढतात कीं ज्या अर्थी आरमेनियन लोकांनीं बंड उभारण्याचा प्रयत्न सुरू केला होता त्या अर्थी बंडाचा बीमोड व्हावा ह्मणून सुलतानानें हा उपाय योजला असला पाहिजे पण या ह्मणण्यास फारसा पुरावा नाहीं. आरमेनियन लोक राजनिष्ठ होते व त्यांची संख्या थोडी असल्यामुळें स्वतंत्र ख्रिस्तीराज्य बनविणें त्यास शक्यच नव्हतें व ही गोष्ट ते जाणत होते. अबदुल हमीद सुधारणांच्या विरुद्ध मूळपासूनच असल्यामुळें तो या लोकांचा वैरी बनला होता असें ह्मणण्यास मात्र बराच पुरावा आहे. चाहू लढाईचा कांहींहि परिणाम होवो पण राज्यक्रांतीमुळें या लोकांचे हाल हल्लीं तरी नष्ट झाले आहेत.

# भाग १६ वा.

## म्यासेडोनिया.

एकतंत्री राज्यपद्धतींत जे दोष असतात तेच तुर्कीसाम्राज्यांतही होते. अर्थात म्यासेडोनिया प्रांत त्यास अपवाद कसा असूं शकेल ? लष्करास वेळीं पगार न देणें, मुसलमानांनीं ह्मणजे राज्य कर्ता जातीने ख्रिस्ती प्रजेवर जुलूम जबरदस्ती करणें, जीविताची सुरक्षितता नसणें, स्त्रियांच्या अब्रूस धोका असणें आणि स्थावर जंगम मिळकतीसंबंधीं अशाश्वत असणें या गोष्टी इतर प्रांतांतून ज्या प्रमाणानें होत होत्या त्याचप्रमाणें ह्याही प्रांतांत होत होत्या. या प्रांतांत न्याय योग्य प्रकारें मिळत नव्हता.

या प्रांतांत बल्गेरियन लोक विशेष होते. पण दक्षिणेस ग्रीक लोकांची वस्ती विशेष होती. या प्रांतांत बेबंदशाही होती. या प्रांताच्या जवळ आल्बेनिया आणि बल्गेरिया हे प्रांत साधारणपणें स्वतंत्र झाले होते तेव्हां या प्रांतांसही सुराज्य व्यवस्थेची इच्छा झाली. आल्बेनिया सरकार या प्रांतावर डोळा ठेऊन होता तेव्हां त्याचें घुसणें बंद करण्यासाटीं अब्दुल हमीदनें कांहीं व्यवस्था करणें जरूरीचें होतें.

बल्गेरिया आणि ग्रीस या देशांतील लोकांस म्यासेडोनियांतील

लोकांचेबद्दल सहानुभूति होती पण त्यांच्यामुळें आपल्या प्रांतांत घोटाळा उडाला असें मात्र त्यांस वाटत नव्हतें. या प्रांतांतील वरेच लोक बल्गेरियांत रहावयास गेले होते.

या प्रांतांत सुधारणा देण्यांत याव्यात असें बल्गेरियानें सुलतानास कळविलें. या प्रांतास तुर्की बादशाही खालीं स्वराज्य द्यावें एवढेंच त्यानें सुचविलें होतें. आल्बेनिया प्रांतानें दुसरीच गोष्ट सुचविली होती पण सुलतानानें दोघांचेंही ऐकलें नाहीं. बल्गेरियाच्या फर्डिनंड नावाच्या राजपुत्रास हुसकून देण्याचा एक कट या प्रांतांत झाल्याचें उघडकीस आलें. या प्रांतांत ग्रीक व बल्गेरियन लोक रहात असत यांचे धर्मपंथ वेगवेगळाले होते व त्यांच्यांत याबद्दल मोठी हमरी तुमरी झाली होती. इ. स. १९०२ सालीं या प्रांतांत बंड झालें. या बंडाला बाल्कन संस्थानांचा पूर्ण पाठिंबा होता. बल्गेरियन लोक तर तुर्की खेड्यांवर उघड उघड हल्ला करीत होते सोफिया येथें मोठी सभा स्थापन करण्यांत आली. ग्रीस या बंडाच्या विरुद्ध होता. तेव्हां ग्रीक लोक बल्गेरियनांशीं लढत होते. हे बंडखोर स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या मताचे होते पण तेथील मवाळ सुधारणा मिळाल्या एवढेंच म्हणत होते. पण यांच्या सुधारणा सुलतान देण्यास तयार नव्हता. या प्रांतांतील बंड मोडण्यासाठीं तुर्की सैन्य पाठविण्यांत आलें व बंडाळी मोडण्यांत आली.

इ. स. १९०२–३ सालीं ग्रीक व बलगेरियन लोक या प्रांतांत बंडाळी माजवूं लागले. यावेळीं खुद्द मासेडोनिया प्रांतांत राज्यक्रांति-कारक मंडळ्या स्थापन होऊं लागल्या होत्या. यानीं सुलतानाजवळ साम्राज्यांतर्गत स्वराज्य मागितलें. या प्रांतांत पुढें तर इतकी बंडाळी माजली कीं ती मोडण्यासाठीं आस्त्रिया आणि रशिया या राष्ट्रांस मध्यें पडावें लागलें. या दोन्ही बादशहांची मर्झटेग येथें इ. स. १९०३ सालीं भेट झाली व त्यांत पुढील सुधारणांचा खर्डा सुलतानाकडे पाठविण्याचें ठरलें. ( १ ) सशस्त्र पोलिसचा इन्स्पेक्टर-जनरल यांस योग्य वळण देण्याकरतां आस्त्रिया व रशिया यांणीं मुखत्यार नेमावेत इ. जनरलची नेमणूक टर्कीनें करावी. ( २ ) या पोलिस खात्याची परकीय अधिकाऱ्यांखालीं सुधारणा करण्यांत यावी. ( ३ ) स्थानिक सुधारणासंबंधानें चवकशी करण्यासाठीं महत्वाच्या शहरीं मिश्र कमि-शन नेमलें जावें, यांत खिस्ती व मुसलमान मेंबरांची संख्या निम्मे निम्मे असावी. ( ४ ) न्यायासनांची सुधारणा व्हावी. या सर्व सुधारणा त्वरित अमलांत आणाव्यात.

अशा प्रकारच्या अव्यवहार्य मागण्या दोन राष्ट्रांनीं कराव्या याबद्दल सुलतानानें दुःख प्रदर्शित केलें व याचें उत्तर प्रधानामार्फत पाठविलें जाईल असें त्या पत्रास उत्तर देण्यांत आलें.

वर सांगितलेल्या पत्रास ग्रेटब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि इताली

यांनीही आपली संमत्ति दिली. मोन्यास्टीर येथें रशियन वकिलाचा खून झाल्यामुळें रशिया चिडला होता. हा खून सुलतानाच्या चिथावणीनें झाला असावा असें ह्मणतात. अशा प्रकारें सर्व प्रबळ राष्ट्रांनीं जोर केल्यामुळें सुलतानानें वरील खर्चास इ. स. १९०४ च्या जानेवारी महिन्यांत सम्मती दिली. तरी पण पुढील दोन वर्षांत या सुधारणा देण्यासंबंधीं शक्य तितक्या अडचणी उपस्थित करण्यांत आल्या. इ. स. १९०४ सालीं एक अनुभवी इतालीयन पोलिस खात्याची सुधारणा करण्याकरतां जनरल नेमण्यांत आला. पण त्यास असा सक्त हुकूम होता कीं सुलतानाच्या स्पष्ट हुकुमावरून कोणतीही सुधारणा करण्यांत येऊं नये. मुखत्यार नेमण्याची सूचना सुलतानानें धुडकावून लावली. प्रबळ राष्ट्रें पत्रें पाठविण्यापलीकडे कांहीं करीत नाहींत हें पाहून सुलतान जास्तच धिटाईनें बोलूं लागला. पोलिसांवर तुर्की कामगारांचाच अम्मल असला पाहिजे, व परकीय इन्स्पेक्टरांची संख्या २५ हून जास्त ठेविली जाणार नाहीं असें त्यानें परकीय राष्ट्रांस कळविलें.

आपण यांत पडलों तर मासेडोनियांत अधिकच दंगल उडेल किंवा जर्मनीनें सांगितलें म्हणून ऑस्ट्रियानें यापुढें आपलें अंग काढून घेतलें. युरोपियन राष्ट्रांनीं सुचविलेल्या अगर प्रजेनें सुचविलेल्या कोणत्याच सुधारणा देण्याचें सुलतानानें साफ नाकारलें, या प्रांतास सुधा-

रणा व राज्यकारभार सुरळीत करा असें ब्रिटिश, फ्रेंच, रशीयन आणि इतालियन सरकारांनीं दडपून सांगितलें तरी सुलतान ऐकेना तेव्हां या राष्ट्रांनीं आपलें आरमार टर्कीच्या सन्निध आणलें तेव्हां सुलतान कबूल झाला ही गोष्ट इ. स. १९०५ च्या नवंबरांत झाली. या खटपटींत अलीकडे अर्मेनी मुळींच पडत नव्हता. युरोपियन राष्ट्रें बरीच घाम-कुतीवर आलीं आहेत हें पाहून टर्कीत लोकप्रिय झालेल्या हिल्मी पाशा यांस सुलतानानें या प्रांतावर मुखत्यार म्हणून पाठविलें या नेम चुकीनें चळवळ बरीच मंदावली.

---

## भाग १७ वा.

### ऐक्य आणि प्रागतिक सभा.

म्यासेडोनिया प्रांतांत असंतुष्ट असणारे मुसलमान हळूहळू एकत्र होऊं लागले. तुर्की साम्राज्यांत सुव्यवस्थित राज्यकारभार चालण्यास अबदुल हमीद ह्याच अडकाठी आहे असें त्यांस वाटूं लागलें. यानें सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं ठेवल्यामुळें इतरांस कांहींच सुधारणा करता येत नाहीं हेंही ते जाणून होते तुर्की साम्राज्याच्या बाहेर विशेषत: स्वित्झरलंड आणि पारीस येथें या असंतुष्टांचा एक जमाव जमूं लागला

व तेथें ते राज्यक्रांति कशी करावी याबद्दल विचार करूं लागले. या पैकीं कांहीं जणांस असें वाटलें कीं म्यासेडोनियन लोकांबरोबरच आपण संगनमत करावें म्यासेडोनिया प्रांतांतिल बऱ्याच शहरीं हे असंतुष्ट लोक कंपू करून राहिले होते. इ. स. १९०६ सालीं या लोकांपैकीं बरेचसे लोक सालोनीका येथें एक मध्य कमेटी नेमावी ह्मणून एकत्र गोळा झाले. अशा प्रकारची एक कमेटी इ. स. १९०७ सालीं प्यारीस शहरीं अहमदरीझा यांच्या प्रामुख्याखालीं स्थापन करण्यांत आली होती. इ. स. १८७७ सालीं ज्यासुधारणा देण्यांसाठीं मिधतपाशा यांनी धडपड केली त्या सुधारणा मिळण्यासाठीं ह्मणजे संघटित राज्यपद्धत व्हावी ह्मणून या दोन्ही सभांनीं प्रयत्न करण्याचे ठरविलें. या सभांचे मेंबर प्रथमतः फक्त मुसलमान लोकच होते. पण प्यारीस येथें सभेंत हद्दपार केलेले बुद्धिवान ख्रिस्तीही होते. जिनेव्हा येथेंही एक अशीच कमेटी स्थापन झाली. या सर्व सभांत मुसलमानांची संख्या विशेष होती. या सर्व मेंबरांनीं एक संस्था स्थापन केली व त्या संस्थेस ' ऐक्य आणि प्रागतिक सभा ' असें नांव देण्यांत आलें. ऐक्य याचा अर्थ तुर्की साम्राज्यांतील सर्व धर्मांचें व पंथांचें ऐक्य हा होता. प्यारिस कमेटीचा अध्यक्ष अहमदरीझा हा होता. हा मोठा राजकारणी आणि लोकप्रिय होता. सालोनिका आणि प्यारिस येथील सभा एकत्र झाल्या व त्यांच्या सभा सालोनिका येथें होऊं लागल्या. इ. स. १९०६—०८ सालांत या

सभेचें काम फार जोरानें सुरू झालें. चालू राज्यपद्धतीसंबंधाचा असंतोष वाढूं लागला, व त्यांस आतां व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें.

दोन कमेट्या एकत्र होऊन त्या सभेनें ' ऐक्य आणि प्रगति ' हें नांव धारण केलें होतें ही गोष्ट अबदुल हमीदच्या शेकडों हेरांस समजली नाहीं हें अशक्यच होय. अबदुल हमीदचा मेव्हणा आपल्या दोन मुलांसह कान्स्टांटिनोपल येथून इ. स. १८९९ च्या आक्टोबर महिन्यांत पळाला होता. व हा मेव्हणा या राज्यक्रांतिकारकांबद्दल सहानुभूती दाखवीत होता. या कमेटीचे बरेच मेंबर खुद्द कान्स्टांटिनोपल येथेंही होते. यांपैकीं कांहीं लोकांस जरी पकडण्यांत आलें होतें तरी या सभेचें काम इतक्या गुप्त तऱ्हेनें चालू होतें कीं सुलतान किंवा त्यांच्याशीं इमानीपणानें वागणारे इतर लोक यांस या कमेटीचा प्रसार किती व्यापलेला आहे हें कळावयास पाहिजे होतें त्यावेळीं नकळल्यामुळें कमेटीच्या कामास त्यांस व्यत्यय आणतां आला नाहीं.

या कमेटींतील दोन अत्यंत धैर्यशाली मेंबर झाले ह्मणजे निआझीबेव एनव्हरबे हे होते. एनव्हरबे यांस एनव्हर दमात पाहत असेंही नांव होतें. या दोघांबद्दल विस्तृत रितीनें विवेचन करणें जरूरीचें आहे ऐक्य आणि प्रगतिक सभेचा निआझीबे हा राज्यक्रांतीचा पक्का उपदेश होता. हा म्यासेडोनिया प्रांतांतील रेसना शहराचा रहिवाशी होता. इ. स. १८९७ सालीं तो सबलेप्टेनंट होता. व त्यानें ग्रीक लढाईंत

तरवार मारली होती. व्हालौ येथील लढाईंत त्यानें आपलें युद्धकौशल्य चांगलेंच दाखविलें होतें. ग्रीक कैद्यांबरोबर संरक्षक म्हणून हा कान्स्टंटिनोपल येथें गेला होता. शिपाई लोकांस बक्षिसें देणें आणि फौजदारी दिवाणी खात्यांतील लोकांस बढती देण्यांत कशा क्लृप्त्या योजिल्या जातात, कशी लांडीलबाडी केली जाते हें त्यानें नीट समजावून घेतलें होतें. यानंतर त्यास त्याच्याच जन्मभूमीच्या जवळील डोंगराळ प्रदेशांत फौजेचा अधिकारी नेमण्यांत आलें. बलगेरियन बंडाळी मोडण्याकरतां ही फौज तेथें ठेवण्यांत आली होती. फौजेच्या नांवाखालीं रसद देणाऱ्या खात्यांतील लोक आपली तुंबडी भरीत होते. शिपाई लोकांस तनखा मिळत नव्हता व ते तेथील शेतकऱ्यांच्या साहाय्यानें आपली उपजिविका करीत असत. या ठिकाणी चाललेला हा घोंटाळा नियाझिमबे यास समजला असून तो सुधारणांच्या तर्फेचा आहे हेरांनीं अबदुल हमीद यांस कळविलें होतें. आतां आपणांस कैद करण्यांत येईल हें आगाऊच अजमाहून तो प्यारिस येथें पळून गेला. यानंतर कांहीं दिवसांनीं कमेटीच्या तर्फे काम करण्यासाठीं तो तुर्कस्थानांत परत आला. तो ग्रीस प्रांतांत आला पांढरा कोट ( ग्रीक लोकांचा विशेष प्रकारचा पोशाख ) घालून त्यानें सरहद्द ओलांडली; आणि मोठ्या धैर्यानें सालोनिका येथें येऊन पोंचला. या ठिकाणीं अबदुल हमीदच्या हेरांनां जर यास ओळखलें असतें तर त्यास २४

तासाभ्या आंतच फाशी देण्यांत आलें असतें ! पण यावेळीं तुर्की हेर ग्रीक लोकांस बलगेरियनांच्या विरुद्ध चिथाऊन देत असल्यामुळें हा पोषाख त्यास फार उपयोगी पडला. हा कमेटीला भेटला व त्यास मेंबर करण्यांत आलें कमेटीनें त्यास तुर्की फेरीवाल्याचा पोशाख दिला. आणि स्मर्नाकडे जाण्यासाठीं आगबोटींत बसविलें या ठिकाणीं व आशियामायनर मधील इतर पुष्कळ ठिकाणीं तो शेतकऱ्यांत व शिपाई लोकांत हिंडत होता. या लोकांस असंतुष्टता फार माजली आहे असें त्यांस स्पष्ट दिसत होतें. अर्थात त्यानें अशा लोकांपैकीं बऱ्याच लोकांस कमेटीचे मेंबर बनविलें. त्यानें कित्येक वेळां शिक्षकाचाही धंदा केलेला होता व या पेशानें त्यानें कित्येक मशीदींत तुर्की लोकांपुढें व्याख्यानेंही दिलीं आहेत. कधीं फेरीवाला तर कधीं मुशाफर व्यापारी, कधीं भिक्षा मागणारा दरवेशी तर कधीं दुसराच कोणता तरी वेश घेऊन त्यानें संघटनेचें नवें तत्व जनतेस प्रस्तृत केलें. प्रत्येक महिन्यांत कमेटीचे मेंबर झपाट्यानें वाढूं लागले सालोनीका येथील कांहीं पुढारी मेंबरांनीं विशेष गुप्तपणासाठीं फ्रीमसनचा पक्षपंथही स्वीकारला होता.

म्यासेडोनिया प्रांतांत किंवा राजधानींतही एनव्हर पाशा कोण्याही विशेष परिचयाचा नव्हता. त्याचा पूर्व इतिहास कोणासच माहीत नव्हता. तो शांत स्वभावाचा होता. पण अगदीं प्रारंभापासूनच तो चारित्र्यवान शिपाई असावा असें पुष्कळांस वाटत होतें. यानेंच नेया-

ह्मांच्या साहाय्यानें प्रथम बंडाचें निशाण उभारलें. इ. स. १९०८ च्या जुलै महिन्यांत हे दोघेही रसेना येथील डोंगरांत निघून गेले. या डोंगराळ प्रदेशांतूनच त्यांनीं फौज व लोक यांस एक जाहिरनामा काढला. यांपैकीं प्रत्येकाजवळ थोडेसें सैन्य होतें.

या दोघांनी तिकडे तशी गडबड चालविली होती तर प्यारिस येथील कमेटीनें अबदुल हमीदपाशीं मिधतपाशांच्या सुधारणांची मागणी करण्याचें निश्चित केलें होतें. या मागण्यासंबंधाचा प्रसिद्ध देखावा तुर्कस्थानांत करण्याविंषयीं त्याचें ठाम मत नव्हतें. अशा मागण्या मागतांच अबदुल हमीद खवळून जाईल व पुष्कळांस कैद करील असें त्यांस वाटत होतें व ह्मणून मेंबरांची संख्या वाढविण्याचा त्यांनी सारखा प्रयत्न चालू ठेविला होता. प्रत्येक मेंबरापासून आज्ञा धारकत्व व गुप्त पणा यांची शपथ घेण्यांत येत होती. या कटांतील आपला निकटचा पुढारी कोण हें प्रत्येकास माहीत होतें; पण याहून जास्त माहिती मात्र प्रत्येकास असेच असें नाहीं. बरेचसे लष्करी कामगार आणि दिवाणी खात्यांतील अधिकारी या कमेटीचे मेंबर झाले होते. आलबेनियन लोक सहानुभूति दाखवित पण ते मेंबर झाले नव्हते.

पण वेळ जवळ जवळ येत चालला. रेव्हल येथें इ. स. १९०८ च्या जून महिन्याच्या ९ व्या तारखेस एक भेटीची सभा भरली होती. हे ठिकाणीं रशियन बालटिक प्रांतांत आहे ही भेट ७ वे एडवर्ड व

रशियाचा झार याची होती. म्यासेडोनिया प्रांतांत सुराज्य व्यवस्था करण्याबद्दल सुलतानाच्या पुढे लावण्यासाठीं ही सभा भरली होती. तुर्क-लोकांची जी राज्यक्रांती कारक कमेटी होती तिला परकीयांनीं टर्कीस बुचाडावें हें योग्य वाटत नव्हतें तेव्हां सभेचा इष्ट हेतू सिद्धीस जाण्यापूर्वी कमेटीनें आपलें कार्य उरकून घेण्याचें ठरविलें. हें कार्य ठरलेल्या दिवसापूर्वीच उघडून आणणें एका कारणानें, भाग झालें. तें कारण असें; म्यासेडोनिया प्रांतांत आस्ट्रिया देशांतील बरीच प्रजा व कामगार असत. यांचा एक सण आला. व त्यानिमित्त त्यांनीं एक आठवडा मोठा जलसा चालू ठेविला होता. या जलशांत अनेक व्यभिचारीं कृत्यें घडत असत व शिवाय जुगारही चाले. तेव्हां हा सर्व प्रकार बंद पडण्यासाठीं आलबेनियन लोकांनीं दंगा करण्याचें ठरविलें. ही गोष्ट कमेटीस कळली तेव्हां या दंग्यानें आस्ट्रियाची फौज या देशांत येईल आणि नवेंच विघ्न उपस्थित होईल अशी धास्ती उत्पन्न झाली. कमेटीनें अलबेनियन लोकांस दंगा करण्याची विनंति केली. ही विनंति त्यांनीं एका अटीवर मान्य केली. कमेटीनें इच्छित कार्य त्वरित घडवून आणावें हीच ती अट होती. तेव्हां कमेटीस आपलें कार्य ठरलेल्या दिवसापूर्वी करावें लागलें. कमेटीनें संघटणेची एकदम मागणी केली. तेव्हां सुलतान आणि कमेटी यांच्यांत पत्रव्यवहार सुरू झाला. आलबेनियन सभेला उधळून लावा असा सुलतानानें हुकूम सोडला रेल्वे व तारायंत्रें या

ठिकाणीं कमेटीचे मेंबर असल्यामुळें सुलतानाचा हुकूम त्यास अगाऊच कळला. ही सभा उधळून लावायाचा ज्यास्त हुकूम झाला होता तो गिलिब कमेटीचा मेंबर होता. कमेटी व त्या कमेटीनें सुचविलेल्या सुधारणा काय आहेत हें सुलतानास प्यारीस येथून आगाऊच कळलें होतें. ता. ९ जुलै रोजीं मोन्यास्टीर येथें ८०० लष्कर घेऊन थडकलें, शेमशीपाशा दोन तुकड्या घेऊन उस्कब येथुन निघाला. नियाझीब एन्व्हर यांच्यावर हल्ला करण्यांत आला. पण शिपायांनी आपल्या देशबांधवावर गोळ्या झाडण्याचें साफ नाकारलें. शेमशी हा आपलें सैन्य घेऊन रेसना येथें जात होता पण त्यास वाटेंतच गोळी घालून ठार करण्यांत आला. सेरेस येथील लष्करी अधिकारीही असाच ठार मारला गेला. म्यासेडोनिया प्रांतांतील सर्व ठिकाणच्या फौजेनें राज्यक्रांती कारक सभेबद्दल सहानुभूति दाखविली सुलतानानें फेरीदपाशा यास लष्करी प्रधान बनवून बंडखोरांवर जाण्याबद्दल हुकूम केला पण दुसऱ्याचें काम मी करण्यास तयार नाहीं असें त्यानें साफ उत्तर दिलें. तेव्हां सुलतानानें हेरांच्या सहायानें आणला तें काम करण्याचें पत्करलें. त्यानें ४० हेरांस फौजेचें धोरण तपासून अराजनिष्ठांची नांवें कळविण्याचा हुकूम केला. हा हुकूम कमेटीस तेव्हांच समजला व त्यामुळें फौजेवरील अधिकारी या अपमानामुळें अधिकच निश्चयी झाले, आणि त्यांनी कमेटी तर्फे वागणूक सुरू केली. स्मर्ना येथील फौजेनें सालोनीक येथें जावें असा सुलतानानें

हुकूम सोडला. म्यासेडोनिया येथील फौजेनें लागलीच एका मागून दुसरी तार सुलतानास पाठविली. त्यांत संघटणा अगर पदच्युती यांची मागणी केली होती. संघटणा मिळेपर्यंत शस्त्रें खालीं ठेवण्यांत येणार नाहींत असेंही त्या तारेंत कळविलें होतें. बंडखोराविरुद्ध आपल्या सैन्यांस हल्ला करण्याचा हुकूम करण्यापूर्वी सुलतानास एक लहानशी गोष्ट करून चुकली व या गोष्टीवरून मुसलमानांतील असंतोष फार वाढला आहे असें त्यांस स्पष्ट दिसून आलें. तेव्हां एखाद्या मुसलमानास मुसलमानाशीं युद्ध करण्याचा प्रसंग येई त्यावेळीं त्यास शेख-उल-इस्लाम यांची अनुमती असली पाहिजे अशी तुर्की लोकांत एक चाल आहे. अबदुल हमीदनें सर्वांत श्रेष्ठ अशा धर्म गुरूस ही अनुमती विचारली ' बादशहाच्या अधिकाराविरुद्ध ज्यांनी बंड केलें आहे त्यांच्याशी मुसलमान शिपायांनीं लढणें न्याय आहे कीं नाहीं ' असा प्रश्न त्या धर्म गुरुपुढें ठेवण्यांत आला. त्यांनी एकंदर हकीकत कळवावी असें उत्तर दिलें. अर्थात सुलतानास सर्व इत्थंभूत हकीकत सांगावी लागली. मासेडोनिया प्रांतांत बंड उद्भवलें आहे हें ऐकून धर्म गुरुच्या ठरावाकडे राजधानींतील लोकांचें लक्ष लागून राहिलें होतें. धर्म गुरूनीं सर्व कागद पत्र पाहिलें व हकी-कत ऐकून घेतली. शेवटी त्यांनी असा न्याय दिला कीं ज्या अर्थी बंडखोर शिपाई सुधारणा मागत आहेत व दुःखांचें निवारण व्हावें असें ह्मणत आहेत त्याअर्थीं 'फथवा' मागीतलाच अशा स्थितींत मुसलमा-

नानें मुसलमानावर शस्त्र धरतांकामा नये असाच द्यावा लागेल.

ता. २२ जुलैपूर्वी तीनचार दिवस सालोनिका, फरसोव्हिच आणि उसकव येथून वर सांगितल्याप्रमाणें राजवाड्यांत ( यिलडिझ ) तारा पाठविण्यांत आल्या व या ठिकाणचें लष्कर एकत्र गोळा झालें. या तारांत संघटणेची मागणी केली होतीच पण ती न दिली जाईल तर अबदुल हमीद यांस स्वतः त्याचा परिणाम भोगावा लागेल असेंही त्यांत नमूद केलें होतें.

इतका प्रकार होतांच सुलतान फार घाबरला व त्यानें सर्व प्रधानांस एकत्र बोलावलें हे प्रधान राजवाड्यांत ता. २०-२१ व २२ तीन दिवस विचार करीत होते. यावेळीं परिस्थिती एकदम बदलली होतीच पण मागणी बरोबर जो दम भरण्यांत आला होता त्यामुळें सुलतान खडबडून जागा झाला होता. ज्या प्रधानास इ. स. १८७७ सालीं बडतर्फ करण्यांत आलें त्या प्रधानांच्या सुधारणा आज कबूल केल्या असतां इ. स. १८७७ पासून जी राजनिती अनुसरली ती चुकीची होती असें कबूल करण्यासारखें होतें. पण त्या नाकारल्या तर म्यासे-डियाच्या सैन्यास एकदम तोंड देण्याची तयारी केली पाहिजे अर्थात परिस्थिती मोठी बयाची होती. या सभेंत बहुतेक प्रधान सैन्याच्या तर्फेचे होते. ही संघटना न दिलीतर यादवी सुरू होईल असें प्रत्येकास वाटत होतें. तिसऱ्या दिवशीं या सभेंत असें ठरलें कीं ' आम्हीं

संघटणेच्या बाजूचे आहोत व सुलतानानें संघटणा प्रसिद्ध करावी असें सुलतानास कळवावें. पण सुलतानाचें हृदय विदारण करून टाकणारा हा ठराव त्यास कळवावा कोणी हा प्रश्न येऊन पडला हें काम कोणीही अंगावर घेईना. आपला धनी किती द्वेष उगविणारा आहे हें प्रत्येक जण जाणीत होता. सुलतान सुधारणांच्या विरुद्ध आहे, सुधारणांचा पुरस्कर्ता मिधतपाशा यांस मृत्युवश याणेंच केलें आणि हा ठराव कळविण्यास तो रागानें बेहोश होईल हें प्रत्येकास माहीत होतें.

बराच वादविवाद झाल्यावर हा ठराव दरबारचे ज्योतिषी अबदुल हुदा यांणी कळवावा असें ठरलें. याप्रमाणें हुदा यांणी तो सुलतानास कळविला. प्रधानांचा हा ठराव ऐकून आतां परिस्थितीस बाक दिलाच पाहिजे असें सुलतानानें ठरविलें. ता. २२-२३ जूनच्या रात्रीं त्यानें म्यासेडोनियां येथें तारेनें संघटणा दिल्याचें प्रसिद्ध केलें हा संघटणेचा जाहिरनामा प्रसिद्ध होतांच त्यापुढें सर्व लष्करांनीं आपली सलामी दिली. यानंतर आठतासांनीं ह्मणजे ता. २४ रोजीं ही बातमी राजधानींत प्रसिद्ध झाली. हा जाहिरनामा इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखा आहे यानें अबदुल हमीदचे सर्व बेत ढासळून पाडले जे प्रधान सुधारणांच्या बाजूचे होते त्यास त्यानें एके वेळीं हद्दपार केलें होतें. प्रधानांचे अधिकार संपुष्टांत आणले होते त्यानें हेरांचें जाळें पसरल्यामुळें कोणीही मुसलमान सुधारणाबद्दल ब्र ही काढूं शकत नव्हता. मत स्वातंत्र्य मिळविण्याची धडपड शक्य तितकी त्यानें दाबून टाकिली

होती; आणि संरक्षणाचे शक्य ते मार्ग त्यानें शोधून काढले होते. इतका कडेकोट बंदोबस्त केला होता तरी स्वतंत्रतेचा ध्वज उभारला गेलाच. तिचा गडगडाट एका एकी इतका भयंकर झाला कीं त्यामुळें सुलतान गांगरून गेला. स्वसंरक्षणासाठीं त्यास खालीं टाकलेली थुंकी वर घ्यावी लागली. त्या मिथतच्या सुधारणास त्यानें पायाखालीं तुडविलें होतें त्याच सुधारणांची ढाल करून त्यास आपलें संरक्षण करावें लागलें. इतका अपमान कोणाही सुलतानास किंवा बादशहास भोगावा लागला नसेल.

सुधारणांच्या जाहिरनाम्या बरोबरच पार्लमेंट उघडण्यांत येईल अशीही इषारत देण्यांत आली असल्यामुळें साम्राज्यांतील प्रजेवर विजेप्रमाणें परिणाम घडला. राजधानींतील आनंदास तर पारावारच नव्हता. मुसलमान, खिस्ती आणि ज्यू या सर्वांसच आनंदाचें भरतें आलें. गरीब, व श्रीमंत व्यापारी मजूर, इमाम, धर्म गुरु वगैरे सर्व लोक आनंदानें एकमेकांशीं हस्तांदोलन करूं लागले. एखाद्या जोराच्या स्प्रिंगवर मोठा थोरला दगड ठेवावा त्याप्रमाणें अब्दुल होता. तो दगड उचलतांच स्प्रिंग झटक्यासरशी वर उडाली. जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन गेला. बायकामुलेंही आनंदानें नाचूं लागलीं. ज्यामुसलमानी स्त्रिया नेहमीं रस्त्यानें जातांना बुरखा घेऊन जात त्याच स्त्रिया खिस्ती स्त्रियांनीं वाटेत हस्तांदोलन करूं लागल्या. त्यतेला समाधान वाटत आहे असें सर्व वृत्त पत्रांत आनंदानें रसभरीत भाषेत

प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलें. वर्तमान पत्रावर सेन्सराचा दाब होता तो संघटणेनें नष्ट होईल असें सर्वांस वाटूं लागलें. ज्यादिवशीं सुधारणा प्रसिद्ध झाल्या त्याच दिवशीं वृतपत्रकरांनी सेन्सराचें गांठोडें बांधण्यास सुरवात केली. ' हेरांस पिटाळून लावा ' व शब्दांची ओरड दुमदुमून राहिली होती व ह्याच दिवशीं सायंकाळी त्याणी काळीं तोंडें केलीं.

राजवाड्यांत काय घडलें, म्यासेडोनिया प्रांतांत कशी उथल झाली वगैरेची बितं बातमी जनतेस नसल्यामुळें ती जनता ' संघटनेकी जय ' ' सुलतानकी जय ' अशी घोषणा करूं लागली. यावेळीं अबदुल हमीद रस्त्यानें गेला असता तर त्यांस हित कर्ताच ह्मणून सन्मान करण्यांत आला असता. स्टेटसोफिया येथें सुलतान येणार आहेत ही बातमी पसरतांच स्टंबूल,पेरा आणि कगलाग येथील घरें गुढ्या तोरणांनी सुशोभित झाली. पिलझिट राजवाड्यासमोर सुलतानाचा सन्मान करण्यासाठीं हजारों लोक जमा झाले दुसऱ्या दिवशीं तो जेव्हां त्या नामांकित मंदीरांत गेला तेव्हां लोकांनी त्याच्या नावानें जयघोष केला. याच्या बरोबर कुट चक सैय्यद होता. सुलतान लोक समूहापुढें उभा राहिला व ' यापुढें सर्व प्रजा जनांस समतेनें वागविण्यांत येईल असें त्यानें स्पष्ट बोलून दाखविलें. ता. २६ जुलै रविवारीं मुसलमान, मुल्ला वगैरे लोकसमुदाय मिलाझिद येथें एकत्र गोळा झाले व त्यानीं एका ' सुलतानाचा विजय असो '. असें ओरडा तर दुसऱ्यावेळीं

' हेरांचा सत्यनाश होवो ' असें ओरडत. सुलतान पुनः लोकसमूहापुढें आला. यावेळीं ' सुलतानसाहेबांनीं कुराणाची शपथ घेऊन संघटणा कायम ठेऊं ' असें अभिवचन दिल्याचें जाहीर करण्यांत आलें.

हा लोकसमूह नंतर आरमेनियम धर्मगुरुकडे वळला. भिन्न धर्माच्या पायावर कोणत्याही प्रकारचा दुजा भाव यापुढें दाखविला जाणार नाहीं असेंच सर्वतोमुखी होऊन गेलें होतें. तुर्की धर्मगुरु ख्रिस्ति पाशांशी स्नेहानें वागूं लागले. कान्स्टांटिनोपल मध्यें इतका मोठा आनंद पूर्वी कधीच झाला नव्हता.

लोकसमुदायाच्या देखाव्यांतील दोन विशेष गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. रस्तो रस्ती मुल्ला साहेब आकाशाकडे डोळे व हात करून अल्ला ही संघटणा कायम ठेव अशी प्रार्थना करीत होते. व पाद्री लोकही येशू स्तवन करीत होते. ही पहिली विशेष गोष्ट होय. स्वतंत्र पार्लमेंट देण्याची जननी इंग्रजी वकिलात होय अशी प्रत्येकाची प्रामाणिक समजूत झालेली होती कारण कोणीही या वकिलाती वरून जाऊं लागला तर आनंदानें टाळ्या वाजवीत होता. अबदुल हमीदचें एक तंत्री राज्य विलयास गेलें असें आतां प्रत्येकास वाटूं लागलें होतें; आणि लोकांची ही समजूत बऱ्याच अंशानें खरीही होती; कारण राज्य क्रांतिचा विजय झाला असून एक तंत्री राज्यपद्धतीच्या ऐवजीं संघटणात्मक राज्यपद्धत सुरू झाली होती.

१५८९६

# भाग १८ वा.

## अबदुलची पदच्युति.

अबदुल हमीदचा एकतंत्री राज्यकारभार नव्या कमेटीनें पार नाहींसा केला होता. पण संधी मिळाल्यास अबदुल याचा वचपा काढील असें कमेटींतील बऱ्याच मेंबरास वाटत होतें. कमेटीस अल्पसंख्याक मत अबदुल हमीद यांस पदच्युत करावें इतकेंच नव्हे तर ठार करावें असें होतें. पण बहुमत याविरुद्ध होतें. अबदुल हमीदनें संघटणा दिल्यामुळें जनता त्याचे मागील अपराध व दुष्कृत्यें विसरून गेली होती. ता. २२ जुलै रोजीं त्यानें फरीद पाशा यांस काढून टाकलें. फरीद राज्यक्रांती करणाऱ्या मंडळाचा मेंबर नव्हता पण त्या लोकांविरुद्ध लढण्यास सांगितलें असतां तो लढला नाहीं व हाव मनांत बाळगून त्यानें त्यास यावेळीं काढून टाकलें होतें. यास काढून टाकल्यावर कचक सैय्यद व किया मिलपाशा यांस प्रधान नेमले. हे दोघेही पूर्वकाळीं अबदुलचे कट्टे दुष्मन होते या दोघांचेही खून करण्याचा त्यानें पूर्वी प्रयत्न केला होता. या दोघांसही त्यावेळीं इंग्रजी वकिलातानें वाचविलें होतें चालू राज्यपद्धत बऱ्याच अंशानें इंग्रजी मंत्रानें चालत आहे असें पाहून अबदुलनें केवळ इंग्रजी वकिलातीस खूष करण्याकरितां त्यांस यावेळीं परत बोलावलें.

नुकतीच घडून आलेली राज्यक्रांति केवळ मुसलमानांनीच घडवून आणली होती. त्यांत इतर जातीचे मेंबर फारच थोडे होते. शिवाय ज्या म्यासेडोनिया प्रांतांत या राज्यक्रांतिचें बी पेरलें गेलें त्या प्रांताला अब्दुलहमीदनें इतर प्रांतापेक्षां जास्त सतावून सोडलें होतें असांतलाही प्रकार नव्हता. उलट त्या प्रांतांतील मुसलमान लोकांस सर्व्हियन व बलगेरियन लोकांच्या प्रांतांत लुटालूट करण्याची त्यांनं फूस दिली होती. पण अब्दुलहमीदच्या कारकीर्दीत तुर्कीसाम्राज्याचे तुकडे पडत असून तें आकुंचित होत आहे व त्यास स्पष्ट दिसूं लागल्यामुळेंच त्यांनी तरुण कमेटीस मदत करण्याचें ठरविलें होतें यिलाडिझ राजवाड्यांत मुद्दाम ठेवलेले आलबेनियन सैन्यही त्याच्या उपयोगी पडलें नाहीं. कमेटीचें राज्य सुरू झाल्या नंतर या सैन्यानें दोनदां बंड केलें होतें पण कमेटी जवळही हुषार सैन्य आणि अधिकारी असल्यामुळें या बंड खोराचा मोड झाला. राज्यक्रांति झाल्यापासून पुष्कळ-ड्यांतच कमेटीचें राज्य आहे असें सर्वत्रांस वाटूं लागलें. वर्तमानपत्रें स्वतंत्र रितीनें लिहूं लागलीं. राज्यकारभारासंबंधानें विवेचन करण्यासाठीं जाहीर सभा भरूं लागल्या. नवी राज्यपद्धत इंग्रजी राज्यपद्धतीप्रमाणें असल्यामुळें राजधानींत इंग्रजांचा विशेष बोलबाला झाला.

अब्दुल हमीद कांहीं दिवस गप राहिल्यानंतर त्यानें आपले पूर्वीचे ढंग सुरू केले. अर्थात यामुळें जनता त्याच्या संबंधानें साशंक झाली. ज्या कमेटीनें ही राज्यक्रांति घडवून आणलेल्या कमेटीस दडवून

देण्याचा तो गुप्त बेत करीत असावा असेंही जनतेस वाटूं लागलें. संघटनेबद्दल बोलबाला होऊन गेल्यावर कमेटी व अबदुल हमीद एक-मेकांबद्दल मनांत साशंक होऊं लागले. गेल्या तीस वर्षांत जो एकतंत्री राज्यकारभार चालविला होता त्यावर पाणी सोडण्यात अबदुल हमीद एकदम तयार होईल असें वाटत नव्हतें. इ. स. १९०८ मधील सर्व प्रधान आपल्याशीं निमक हराम बनले असें त्यास वाटूं लागलें आपण कायदेशीर बंडखोर आहोंत असें कमेटीच्या पुढाऱ्यांस वाटत होतें आणि संधी मिळाल्यास आपणास व आपल्या सुधारणांस झट-क्यासरसे गुंडाळून टाकील. पण अबदुल बाह्यतः उत्तम आचरण दाखवीत होता.

कडचक सैयद यांस मुख्य प्रधानकीची वस्त्रें देण्यांत आलीं. पण अबदुल हमीदच्या संशयास्पद वर्तणुकीचा त्यास संशय आल्यामुळें त्यानें लागलाच राजीनामा दिला याच्या जागीं हिल्मी पाशा यांस नेमण्यांत आलें. त्यास राज्यकारभाराची चांगली माहिती होती. हा पूर्वीपासुन अबदुल हमीदच्याच पक्षाचा होता. राज्यक्रांती झाल्यापासून तीन चार महिन्यांनीं पूर्वीच्या राज्यपद्धतीमुळें चरावयास शिकलेले लोक आतां वर डोकीं करावयास लागले. यांपैकीं बरेच टीक निरुप-योगी ह्मणून चाकरींतून कमी केलेले लोक होते. या लोकांस जुन्या हेरांची मदत मिळाली कारण यांचा धंदा तर यावेळीं साफ रसातळास गेला होता. धर्मगुरूच्या वर्गांत राज्यक्रांतीच्या विरुद्ध असे फारच थोडे

लोक होते. या सर्व लोकांच्या मदतीनें ' मुसलमानी परिषद ' नावांची एक संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचा उपदेश कमेटीच्या विरुद्ध वागावयाचें हा होता. विश्वधर्मी लोकांच्या हातीं तुर्की साम्राज्याचा कारभार जाऊं नये ह्मणून आह्मी हा प्रयत्न चालविला आहे असें ही संस्था उघडपणें सांगत होती पण अंतस्थ हेतू राज्यक्रांतीच्या विरुद्ध बंड उभारावयाचें हा होता. या संस्थेंत असंतुष्ट लोक सामील झाले होते. या संस्थेचे संस्थापक अबदुल हमीदचे मुलगे होते व या संस्थेनें बराच त्रास दिला असें पुढील हकीकती वरून दिसून येईल.

लोकनियुक्त मुखत्यारांची पहिली बैठक ता. १७ डिसेंबर १९०८ रोजीं भरली. इ. स. १८७६ सालीं ज्या ठिकाणीं अशीच सभा भरली होती तेथेंच ह्मणजे सेंट सोफिया जवळील ' विद्येचें उगमस्थान ' नावाच्या इमारतींत भरली. पहिल्या दिवशीं लोकसमूहही दांडगा जमला होता. या सभेला प्रत्येक वकील आपली सरकारी पोषाखांत हजर होता. शेख-उल-इस्लाम व धर्मगुरुपैकीं श्रेष्ठ धर्म गुरु या सभेला आले होते. तसेंच खिस्ती देवळाचे पाद्रीही आलेले होते. कमेटीच्या तर्फे अहमद रेझा व एनव्हरबे हे हजर होते. सरकार तर्फे कियामिलपाशा मुख्य प्रधान ह्मणून हजर होता. या सभेंत सुलतान साहेब आपल्या पांच मुलांसह विराजमान झाले होते पण ज्यूसफ असे तिन युवराज हजर नव्हते. सुलतानाचें भाषण त्याच्यासाठीं वाचण्यांत आलें. हें भाषण औपचारिक असतें हें सांगावयास नकोच. या भाषणांत एक

वाक्य असें होतें कीं, विरुद्ध मत असतांही आम्ही नवी संघटणा जाहीर केली आहे. आणि नवी निवड करण्याचा हुकूम दिला आहे. '

या सभेच्या वेळीं अबदुल हमीद्चा चेहेरा दिसावा तसा आनंदी दिसला नाहीं. सुलतानासाठीं जे उच्च स्थान तयार केलें होतें त्यावर एक वृद्ध उतरलेल्या तोंडाचा माणूस बसलेला आहे असेंच दिसलें या सभेंत अत्यंत उमदा चेहरा जर कोणाचा दिसत असेल तर तो अहमद रेझा यांचाच होय. सुलतानांचें भाषण वाचून झाल्यावर संघटणेबद्दल शपथ घेण्यांत आली आहे असे शेख-उल-इस्लाम यांस ध्वनित करण्यांत आलें. अशा प्रकारची शपथ सुलतानानें पुनः भर सभेंत घेतली.

सभेचें काम सुरू झाल्यावर बऱ्याच सूचना पुढें आल्या व त्यावर वादविवादही झाले. याच वेळीं कांहीं दुःखाचेंही अविष्करण करण्यांत आलें. वादविवादांत शिव्यागाळीचाही प्रसंग आला. या वादविवादांत केवळ प्रधानांसच दोष देण्यांत आला नाहीं तर खुद्द सुलताना विरुद्ध भाषणें झालीं. इ. स. १८९७ सालीं ग्रीक लढाईंत जखमी लोकांसाठीं जो फंड भरण्यांत आला त्याचा हिशेब बरोबर दिला गेला नव्हता. हा फंड सुलतानाच्या खाजगी तिजोरीत गड्प झाला असेंही बोलून दाखविण्यांत आलें. हेड जाझराचे तयार केल्यामुळें पुष्कळ मुसलमान लोकांस खूष केल्याचें श्रेय अबदुल हमीद आपणाकडे घेत होता. ही रेल्वे तयार करण्यासाठीं फक्त मुसलमान लोकांकडूनच वर्गणी घेतली होती

पण या रेल्वेस लागणारा सर्व प्रकारचा खर्च वजा जातां बाकी राहिले ७,००,००० पौंडाचा कोठेंच पत्ता नव्हता. या बाकी राहिलेल्या फंडाबद्दल महान् तत्ववेत्ता रीझानेफिक याणें भर सभेंत संशय प्रदर्शित केला. अशा प्रकारच्या विवेचनानें अबदुल हमीद बराच रंजिस झाला होता पण सुलतानास लागणारा खाजगी खर्च जवळ जवळ ९ लाख पौंड होता तो ६ लाख पौंड करावा अशी जेव्हां सूचना आली तेव्हां सुलतान फार फार नाखूष झाले. इतकी मानहानी झाली तरी या दिवसापासून १५ दिवसांनींच ह्मणजे ता ३१ दिसेंबर रोजीं यानें सर्व मुखत्यारांस आपल्या राजवाड्यांत खान्याचें आमंत्रण दिलें. या खान्या-च्यावेळीं त्यानें स्वतः कियात हाने येथील आणलेल्या पाण्यानें भरलेला पेला अहमद रेझा यांजपुढें केला. जमलेल्या लोकांचे आभार मानले, वर्तमान पत्रांत संघटणेची वाहवा केल्याबद्दल जाहीद याची स्तुती केली आणि जमलेल्या सर्व मुखत्यारांस आनंदित केलें. यावेळीं सुलतान खुल्या दिलानें वागत आहे असें पुष्कळ मुखत्यारांस वाटलें. सुलतान साहेब घोगरा गळा काढून जेव्हां संघटणेची स्तुती करूं लागले तेव्हां तर त्याच्या अंतःकरण सफाईची सर्वांस खात्री पटली. खुद्द अहमदरेझा याणे स्पष्ट बोलून देखील दाखविलें कीं सुलतान साहेब संघटनात्मक राज्यकारभार करण्याची इच्छा करतात. जमलेल्या पुष्कळ पाहुण्यांनी सुलतानाच्या हाताचें चुंबन घेतलें व बरेच लोक 'बादशाहाचा व संघटणेचा विजय असो' असा जयघोषही करूं लागले.

अशा रितीनें जिकडे तिकडे जयघोष झाला तरी लवकरच साम्राज्यांत आणि खुद्द पार्लमेंटांत भांडण तंटे सुरू झाले. कमेटीच्या तर्फेची वर्तमानपत्रें सुलतानाच्या एकंदर वागणुकी वरून त्याच्या बद्दल संशय प्रदर्शित करूं लागली. तरी पण त्याच्या पदच्युतीपर्यंत गोष्ट आलेली नव्हती. कमेटीच्या अमलाखालीं सर्व जातींचे व धर्मांचे लोक आनंदानें रहात होते व व्यापारही वृद्धि पावत होता. परंतु मौज ही कीं सुलतान व कमेटी एकमेका विषयीं संतुष्ट नव्हती.

कियामिल वजीर असतांना ब्रिटिश-बाल्कन कमेटीनें तुर्की कमेटीचें अभिनंदन केलें होतें. हें अभिनंदन करण्यासाठीं आलेल्या मुखत्यारांचें कमेटीनें उत्तम प्रकारें स्वागत केलें.

कियामिल पाशा इ. स. १९०९ च्या फेब्रुवारीपर्यंत वजीर होता पुढें तो कमेटीच्या विश्वासांतून उतरला आणि तो केवळ इंग्रजी वकिलातीस प्रीय होता म्हणूनच त्या जागेवर त्यास ठेवण्यांत आलें होतें. याचें मत विशेष चमत्कारिक होतें. याचें वय याबेळीं ८० च्या घरांत होतें. अबदुल हमीदच्या पूर्वीचे सुलतान प्रधानामार्फत जो राज्यकारभार करीत तोच तुर्की साम्राज्यास हितावह असून पार्लमेंटी कारभारास तुर्की लोक लायक नाहींत असें त्याचें ठाम मत होतें. कमेटीनें यास कामावरून दूर करण्याचें कारण इतकेंच कीं त्यानें कमेटीच्या हुकुमावाचून लढाऊ खात्याचे प्रधान रीझा पाशा आणि आरमारी प्रधान यांस काढून टाकून त्याच्या जागीं नाझीम पाशी

नेमणूक केली. पार्लमेंटांत त्याच्या विरुद्ध १९८ मतें व ८ बाजूचीं मतें पडल्यामुळें त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला. लढाऊ खात्याचा प्रधान रीझा पाशा असतांना लष्करांत असावी तशी शिस्त नव्हती. शिपाई लोक राजकीय गोष्टीची उलाढाल करीत, कमेटीचा अम्मल लोकांच्या हितासाठींच आहे कीं नाहीं याबद्दल मूर्खपणाचा वाद घालीत आणि लष्करांतील शिपायास अधिकाऱ्या इतका असीव असे ह्मणत. ही बेशिस्त नाझीम याणें साफ बदलून टाकली व यामुळेंच तो परकीय वकिलांस आवडता झाला होता. त्यानें आपल्या शिपायांस असें सांगितलें कीं तुमचें काम लढण्याचें आहे, राजकीय उलाढाली करण्याचें नाहीं आणि तुमचें पहिलें आणि श्रेष्ठ कर्तव्य अधिकाऱ्याशीं आज्ञाधारकपणानें वागणें या नाझिमला जर्मनपेक्षां फ्रेंच शिस्त जास्त आवडत होती.

नाझीम याची नेमणूक झाल्यानंतर तो सर्व तुर्की सैन्याची सुधारणा करील असें लोकांस व कमेटीसही वाटलें यास सात वर्षेपर्यंत अबदुल हमीदनें राजकीय कैदी ह्मणून ठेविलें होतें. यांपैकीं ५ वर्षें तर एका लहानशा खोलींतच त्यास डांबून ठेविलें होतें. इ. स. १९०८ च्या जून महिन्यांत तो कैदेंतून पळाला आणि नानाप्रकारचे वेष धारण करून २५ व्या दिवशीं बाटूम येथें पोहोंचला कान्स्टांटिनोपल येथें राज्यक्रांति झाली आहे हें याच ठिकाणीं त्यानें ऐकलें. तो युक्ति प्रयुक्ति करून राजधानींत आला व तेथें कमेटी व लष्कर यांनीं त्याचें

उत्तम स्वागत केलें. कियामिलपाशानें याची नेमणूक केली म्हणून कमेटीनें ती रद्द केली होती.

प्रजेचीं विशेष प्रकारची दुःखें निवारण करण्यासाठीं कायद्याचीं बिलें तयार करण्यासाठीं कियामिल यानें एक कमेटी नेमली होती. प्रजेला बादशाही अम्मलच माहीत असल्यामुळें बिलांच्या गोष्टी केवळ ढोंगें वाटूं लागलीं. हेराची पद्धत बंद करण्यांत आली होती व रयतेला क्रूरतेनें वागविणेंही बंद झालें होतें खरें पण राजधानींत व्हावी तशी शांतता झाली नव्हती. स्वातंत्र्य मिळालें म्हणजे हवें तें करण्यास परवाना मिळाला अशीच समजूत लोकांची झाली होती. न्यायासनांची सुधारणा व्हावी तशी झाली नव्हती. रयतेला क्रूरपणानें वागविल्याबद्दल नेडाजिव नावाच्या एका अधिकाऱ्याची चवकशी चालू होती. यानें केलेले अपराध लोक लवकरच विसरून जातील व त्यांस निरपराधी ठरविण्यांत येईल या आशेवर सुलतानाच्या सांगीवरून ही चवकशी वेळोवेळीं लांबणीवर टाकण्यांत येत होती.

पैशाच्या बाबतींतही अडचणी उपस्थित झाल्या होत्या. प्रत्येक खात्यास पैशाची जरूर होती. राज्यक्रांतीनें आपणांस कांहीं फायदा झाला नाहीं असें शिपायांस वाटूं लागलें. हिलमी पाशाचें प्रधान मंडळ हुकूम सोडी पण त्याची अम्मल बजावणी करण्यास लागणारें धैर्य या मंडळांत नव्हतें. जाहीर सभा व वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य यावरही गदा येण्याचा

संभव दिसूं लागला कियामिलच्या कारकीर्दीतही या गोष्टींचा बंदोबस्त व्हावा तसा झाला नाहीं.

कमेटीनें नेमलेल्या लहानशा मंडळाचा उद्धटपणा आणि आकुंचित पणा यामुळें कमेटीवरील लोकांचा विश्वास डळमळूं लागला. अबदुल हमीदच्या जुलमी राज्यपद्धतीच्या ऐवजीं बेजबाबदार पद्धति स्वीकारावी कीं उडधून द्यावी याबद्दल जनता साशंक झाली. आपला अम्मल अप्रिय होत चालला आहे हें कमेटीसही कळून चुकलें. या कमेटीनें राज्य-क्रांति मोठ्या शिताफीनें घडवून आणली याबद्दल जनता त्यांचें कौतुक तेथेंच थांबे.

कियामिलच्या राज्यकारभाराबद्दल अविश्वास उत्पन्न झाल्यानंतर दिवसानीं आरमारी खात्याच्या अधिकाऱ्यांनी ' आमच्या खात्याचा प्रधान आह्मी निवडूं' अशी धमकी दिली यामुळें जनता गडबडली. कियामीलला ज्या रितीनें राजिनामा देण्यास भाग पाडलें त्या पद्धतीमुळें कमेटीबद्दलचा विश्वास कमी कमी होत चालला. हा प्रधान गेल्या तीस वर्षांत रयतेला बराच आवडता झाला होता व राजवाड्यांतून सुटणाच्या जुलमी हुकमास हा बराच आळा घालीत होता कशी जनतेची प्रामाणिक समजूत होती. तरी पण इतक्या वृद्ध माणसाच्या ऐवजीं एखादा तरुण वजीर नेमणें अगदींच वाइट नाहीं असेंही लोकांस वाटत होतें.

कियामिल यानें राजीनामा दिल्यानंतर पार्लमेंट आणि कमेटी यांच्यांत तंटे सुरू झाले. या दोघांचे दोन पक्ष झाले. कमेटीने अचरार्स किंवा

उदार मतवादी असें नांव घेतलें व पार्लमेंट राष्ट्रीयपक्ष बनला. दोघांसही संघटनात्मक राज्यपद्धत पाहिजे होती. दोघेही अधिकारांची विभागणी असावी असें ह्मणत होते. दोघेही प्रागतिक होते पण एकास ज्यास्त जलद जावें असें वाटत होतें ठिकठिकाण्या गव्हरनरास स्थानिक प्रकरणीं पूर्ण मुखत्यारी असावी असें राष्ट्रीयांस वाटत होतें व कमेटीस तेथें लोक नियुक्त कौन्सिलें असावींत असें वाटत होतें. राष्ट्रीयपक्षास आपल्या विरुद्ध असें दुसऱ्या पक्षाचेंच कोणचेंच ह्मणणें खपेनासे झालें आणि आपल्या मता वाचून कांहीं गोष्टी घडल्यास त्यांस ते अडथळा आणीत असत. समता व स्वातंत्र्य हे शब्द ते मुसलमाना पुरतेच लावण्यास तयार होते. किंवा पर्यायानें त्यास तुर्की साम्राज्य मुसमानी बनवावयाचें होतें. आरबीन आलबेनियन लोकांनी तुर्की भाषा शिकलीच पाहिजे व हीच भाषा सरकारी भाषा होय असें ते ह्मणूं लागले. रसत्याची नावेंही त्यांनी बदलून तुर्की केली. आरब लोक कुराणाच्या भाषेस विशेष मान देत असत त्यामुळें या पद्धतीनें ते नाखूष झाले. ते तुर्कीभाषेला हलक्या दर्जाची भाषा समजत असत.

कियामिलच्या राजीनाम्या नंतर जमालुद्दीन नावाचे एक गृहस्थ शेख-उल-इस्लाम होतें त्यांनी राजीनामा दिला. या श्रेष्ठ धर्म गुरुचें वजन जनतेवर फार होतें हा राजीनामा परत घेण्याबद्दल कमेटीनें हर प्रयत्न केले व तो परत घेण्यांत आला नाहीं मात्र जमालुद्दीन यांणी झिया-एद दीन यांची आपल्यामागें नेमणूक केली जमालुद्दीनच्या राजीनाम्यानें

विद्वान मुसलमान लोकांतही कमेटीबद्दल अश्रद्धा उत्पन्न झाली.

परंतु ता. १३ एप्रिल १८०९ रोजीं एक फार महत्वाची आणि भयावह गोष्ट घडून आली. या गोष्टीनें युरोपांत व परराष्ट्रीय वकिलांतीत मोठा गोंधळ उडाला. मुसलमानी सभेचे पत्रकार कमेटी विरुद्ध जोराची टीका करूं लागले. वृत्तपत्राच्या कायद्यांत फेर फार करण्यांत न येण्या-बद्दल एक जंगी जाहीरसभा भरविण्यांत आली. तुर्की आगबोटीची कंपनी कमेटीचे हुकूम मानीनाशी झाली. मिळून तरुण तुर्की आपला अम्मल गमावूं लागला होता. मुसलमानी सभेच्या तर्फेचा एक पत्रकार एकादम मारला गेला यामुळें विशेष खळबळ उडाली.

ता. १३ एप्रिल रोजीं राजधानींत बंडासारखा प्रकार एकाएकीं दिसूं लागला. येथील लष्करी लोक बंडका घेऊन बाहेर पडले व त्यांनी शेंकडों बायबार काढले. हे लोक व मारमारी लोक यांणी बंड केलें होतें असें लवकरच दिसून आलें ' संघटना उडवा, कमेटी मोडा ' असा एकच ओरडा सुरू झाला. यानंतर पिस्तूल देण्याचें नाकारल्यावरून नाझीमपाशाचा खून करण्यांत आला. ही बातमी प्रसिद्ध झाली. ही सर्व बंडाळी अबदुल हमीदनें उपस्थित केली असें मागाहून पुराव्यानें सिद्ध झालें. दुसऱ्या दिवशीं नव्या वजिरानें एक कमेटी स्थापन केली. यांत तरुण तुर्क मुळींच घेण्यांत आले नव्हते. सेरासकेरात मांवाच्या पेठेंत बराच मोठा दंगा झाला. या पेठेंत महमद मुखत्यार लष्करी अधिकारी होता. त्यानें सुलतानाच्या हुकुमाशिवाय बंडखोरास

बराकींत येऊं दिलें नाहीं पण बंडखोरांनी सुलतानाचा हुकूम आणतांच तो तेथून पळून गेला.

कान्स्टांटिनोपल येथें झालेला हा दंगा बराचवेळपर्यंत बाहेर समजला नव्हता. कारण तारा तोडून टाकण्यांत आल्या होत्या. विशेषतः ही बातमी सालोनिका येथें जाऊं नये अशी खबरदारी घेण्यांत आली होती. या शहरांतील व म्यासेडोनिया प्रांतांतील सर्व फौजा शेवकेश पाशाच्या अधिकाराखालीं होती. अबदुल हमीदचा पक्ष घेऊन राजधानींत दंगा होत आहे ही बातमी या प्रांतांत पोचतांच या अधिकाऱ्यानें सर्व सैन्यासह कमेटीच्या तर्फे राजधानीकडे कूच केला. त्यानें तीन बाजूनें राजधानीं वेढली. यानें हा हा म्हणतां शहर गाठलें व मिलडिझ राजवाड्यास गराडा दिला. या राजवाड्यांतून स्वारी करणारे कोठें आहेत याचा तपास करण्यासाठीं हेर पाठविण्यांत आले होते पण त्यास फौजेनें मध्येंच कैद केलें. अशा रितीनें अबदुल हमीदचा हा प्रयत्न निर्फळ झाला. जिकडे तिकडे स्थीर स्थावर झाल्यावर कमेटीतील बहुमतानें सुलतानास पदच्युत करण्याचें ठरलें.

राजधानींतील या दंग्यास सुलतानाचें अंग नसावें असें त्यास वाटत होतें तर कियामिल प्रधानाचेंही असें मत होतें. पण दंगा करणारांचा झाडा घेतां त्यांच्यापाशीं मुबलक पैसा सापडला. हा पैसा अबदुल कडून मिळाला असा त्यांनी जबानीही

दिला. आपल्या अल्बेनियन सैन्यानें राजवाड्याचें रक्षण करावें म्हणून सुलतानानें हुकूमही दिला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राजवाडा हातीं येतांच एक लष्करी कमेटी नेमण्यांत आली व तिनें राजवाड्यांतील जीवांचें रक्षण करण्याचें काम सुरू केलें. या राजवाड्यांत फार मोठी वस्ती होती हें मागील भागांत सांगितलेंच आहे. या राजवाड्यांत ३७० राण्या होत्या व त्यांचीं चाकर माणसें १६० होती. शिवाय ३५० वाडी गार्ड, २५० स्वयंपाकी, ३५० घोड शाळेतील मोतदार व या शिवाय १५०० लष्कर होतें.

शनवारच्या रात्रीं या राजवाड्यांत जिकडे तिकडे काळोख करण्यांत आला होता या राजवाड्यांतील मोठें अधिकारी कैद करण्यांत आले. स्त्रियांस चेरागन येथें राजवाड्यांत ठेवण्यांत आलें. पेरा पेठेंत बाकीच्या नोकर लोकांस ठेवण्यांत आलें.

अबदुल हमीदच्या मागाहून कोणास गादीवर बसवावें याबद्दल व शेख-उल-इस्लाम यांस विचारण्यांत आलें. त्यानें पदच्युतीची परवानगी दिली व रेशद इफेंदी यास गादीवर बसवावें असा फेतवा सांगितला. रेशद हा अबदुलचा धाकटा भाऊ यास एका ठिकाणीं कैद करून ठेवण्यांत आलें होतें. यानें हा फेतवा ऐकून आश्चर्य प्रदर्शित केलें.

पदच्युत केल्याचा फेतवा एका कमिशन मार्फत अबदुल हमीद याजकडे पाठविण्यांत आला. या कमिशनमध्यें जनरल इसद पाशा

मुख्य होता, हा राजवाड्यांत मोठ्या धैर्यानें गेला. सुलतानचे सेक्रेटरी पुढें आले. त्यांस असें सांगण्यांत आलें कीं आह्मांस खुद सुलतान साहेबा-शींच बोलावयाचें तरी रस्ता द्या. सुलतान साहेब फार खुश्यांत आहेत आणि ते कदाचित पिस्तुलही उडवितील असें सांगून सेक्रेटरीनें त्यांस आंत जाऊं दिलें आंत जातांना त्यांच्या सभोंवतीं ३० खोजांचा गराडा पडला. त्यांनी सुलतान साहेबांच्या दिवाणखान्यांत नेऊन बसविलें. या दिवाणखान्यांत आरसे अशा खुबीनें लावले होते कीं मागून येणारा माणूसही कोण आहे हें सुलतानास समजे. हे दिवाणखान्यांत जाऊन बसल्याबरोबर आपल्या लहान मुलासह अबदुल हमीद आले. डेप्यूटेशनचे लोक दिवाणखान्याच्या मध्यभागी उभे राहिले आणि त्यांनी मोठ्या आदबीनें मुजरा केला. खोजे आणि सेक्रेटरी ज्या रस्त्यानें डेप्यूटेशन आंत आलें त्या दरवाज्याजवळ उभे होते. पडद्याच्या आडून अबदुल मुलासह पुढें आले आणि आपणांस काय पाहिजे ह्मणून त्यांनी विचा-रलें. पवित्र न्यायासनाच्या फेलव्याच्या हुकुमानें आह्मी येथें आलों आहोंत हा फेतवा शेख-उल-इस्लाम यांणी मंजूर केला आहे. यांत अबदुल हमीद यांस कायदेशीर पणानें पदच्युत करावें असें सांगितलें आहे आणि रेशाद यास सुलतान केल्याचें जाहीर करण्यांत यावें. सुलतान व त्यांचें कुटुंब यांच्या जीवाची हमी न्याशनल कन्व्हेन्शननें आपल्या शिरावर घेतली आहे. ‘ मी अपराधी नाहीं ’ असें सुलतान ह्मणाले, ‘हें

माझें नशीब इतकें ह्मणून त्यानें जिवंत ठेवण्याबद्दल विनवणी केली. मूराद व रेशद यांचे जीव मी वाचविले आहेत ही गोष्टही तुह्मी लक्षांत घेतली पाहिजे असेंही सुलतान रागारागानें ह्मणाला. "मी सुरक्षित आहेत असें तुह्मीं अभिवचन देऊं शकाल काय !' या सुलतानाच्या प्रश्नास इसाद यांणी पूर्वी ठरल्याप्रमाणें उत्तर दिलें कीं आटोमन लोक फार उदार आहेत. व या प्रश्नाचा निकाल तेच कर- तील '. माझ्या जिवाची तुह्मी हमी घेऊं शकाल काय या प्रश्नास त्यांनी उत्तर दिलें ' तुमच्या जीविता विषयीं आह्मांस कांहींच सांगण्यांत आलें नाहीं पण आमच्या मतानें तुमचा जीव सुरक्षित आहे असेंच आह्मांस वाटतें. ' हें ऐकून सुलतानानें दुसरा प्रश्न असा केला कीं ' माझा प्राण सुरक्षित राहील अशी तुह्मीं शपथ घेऊं शकाल काय ? ' यावर ईसद ह्मणाला ' आमची सभा अन्याय कधींही करणार नाहीं असें माझें मत आहे ' आह्मांस चेरागन येथील राजवाडा रहायास मिळेल काय ? या प्रश्नास ' आपली इच्छा न्याशनल कन्हेंद्व्रज सभेला कळविण्यांत येईल व त्याचा ठराव आपणांस कळविला जाईल. तरी पण तो राजवाडा तुह्मांस राहण्यास मिळेल असें मला वाटतें ' असें इसाद यानें उत्तर दिलें. सुलतान पुढें उद्गारतात ' मी ग्रीसशी लढाई करून ती जिंकली आहे अशींच राष्ट्राच्या हिताचीं पुष्कळ कामें केलीं आहेत तेव्हां पदच्युत होण्यास मी लायक नाहीं. नंतर सुलतानानें

निराशेचा एक हुंदका टाकला आणि ' हे अल्ला दुसऱ्याला दोषीठरवि- णारांस शिक्षा कर' असें ह्मणाला. यावर डेप्युटेशननेंही ' तथास्तु ' असें उत्तर दिलें. पदच्युतीनंतर दोन तीन दिवस अबदुल हमीद अती- शय दुःखद स्थितींत होता त्याचा चेहेरा फिक्कट पडला होता. ता. २७ एप्रिल रोजीं ही पदच्युती होऊन रेशद इफेंडी सुलतान झाला.

ता. १३ च्या बंडांत ज्यांनी भाग घेतला होता त्यांस योग्य ती शिक्षा करण्यात आली. पदच्युतीच्या सायंकाळीं दोन सशस्त्र मोटारी आणि तीन आफिसरांसह दोन घोडेस्वार पळटणी यिलाडस येथील राजवाड्यासमोर आल्या हसनीपाशा हा या सर्वांवर मुख्य अधिकारी होता हसनी पाशा जेवदबे सेक्रेटरीस भेटला व त्यास आपली वर्दी सुलतानास दे असें सांगितलें. सेक्रेटरीनें तें करण्याचें नाकारलें ' सुल- तान नेम मारण्यांत फार पटाईत आहेत व त्यांचा नेम कधींच चुकत नाहीं ' असेंही तो ह्मणाला. यावर हसनीनें उत्तर दिलें ' मी तुला येथेंच ठार करीन समजलास, जा आणि मी सांगतों तें कर, अबदुल हमीद यांस कळवा कीं तुमच्या जीवा संबंधाच्या प्रश्ना बद्दल मीं कांहीं बोलावयास आलों आहे ' पंधरा मिनिटें झाल्यावर जेवदबेनें त्यास सुल- तानापुढें उभें केलें. यावेळी सुलतान आपल्या खिशांत हात घालून उभा होता बहुशः त्याच्या हातांत पिस्तुलें असावींत. ' हें सैन्य मला ठार मारण्यासाठींच आलें आहे अशी त्याची समजूत झाल्याचें दिसत

होतें. हसनीनें अत्यंत आदरानें सुलतानास मुजरा केला आणि ' तुह्मांस इजा करण्याची राष्ट्राची इच्छा नाहीं, आपणांस भिण्याचें कांहीं कारण नाहीं आणि शपथेवर सांगतों कीं तुमचें जीवित सुरक्षित आहे. तरी पण दोन सुलतानांनी एकाच जागीं राहूं नये असा ठराव करण्यांत आला आहे ' असें ह्मणाला.

अबदुल हमीदनें उत्तर दिलें ' मी समजलों, तुह्मांस कांय पाहिजे ' यावर हसनीनें सांगितलें ' मी आपणांस सालोनिका येथें नेण्यांस आलों आहे ' यावर अबदुलनें उत्तर दिलें " मी आजारी आहे तेव्हां चेसगन राजवाड्यांत राहण्याची माझी इच्छा आहे आणि तसें कबूल नसेल मला यूरोपांत जाण्याची परवानगी असावी. ' सालोनिका येथें जाण्याबद्दल हसनीनें सुलतानाची फार मिनतवारी केली. शेवटीं सुलतान घेरी येऊन पडला. त्याच्या राण्यांनी त्यास पाणी दिलें त्याही रडतच होत्या. शेवटीं त्या बायकांच्या विशेष विनंती वरून हसनी कबूल झाला.

तीन सुलताना, चार नाटकशाळा आणि कांहीं हुजरे मिळून एकंदर २७ इसमांस सुलतानानें बरोबर घ्यावें अशी परवानगी देण्यांत आली. त्यास बरोबर फारच थोडें सामान घेऊन जाण्याची परवानगी होती पण त्यानें बराच पेट्या भरल्या होत्या. या पेट्या मागाहून आगगाडीनें त्यास पोंचविण्यांत आल्या. आंगोरा जातीचें एक मांजर होतें

तें आपल्याबरोबर असावें असें त्यानें कळविल्या वरून तेही दुसऱ्या दिवशीं रवाना करण्यांत आले. मध्यरात्रीं मोटारी रेल्वे स्टेशनाकडे जाण्या करतां निघाल्या. सालोनीका येथें जाणारी गाडी पहाटेस २।। वाजतां निघून ता. २९ रात्रीं ६ वाजतां पोंचली. या ठिकाणीं व्हिला अलाटिनी-नावाच्या जून्या मालकीच्या बंगल्यांत त्यास पोंचविण्यांत आलें.

यानंतर अबदुल हमीद अत्यंत उदासीन पणानें कालक्रमणा करीत होता. या बंगल्यांतून पळून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला असतां तर निर्फळ झाला नसता. या बंगल्यांत आल्यापासून तो कधींच बाहेर पडला नाहीं. त्याच्या परिवारापैकीं अकरा स्त्रिया स्वतंत्र होऊं इच्छित होत्या व त्यांस त्याप्रमाणें रजा देण्यांत आली. दोन वर्षांनंतर अबदुल हमीद यांस राजधानी जवळ राहूं दिल्यास हरकत नाहीं असें कमेटीस वाटल्या वरून बास्फरस जवळील एका राजवाड्यांत त्यास ठेवण्यांत आलें. कांहीं दिवसांनी येथून आणखी आतल्या प्रदेशांत नेऊन ठेवण्यांत आलें होतें असें ह्मणतात.

**अबदुल हमीदची दौलत:**—अबदुल हमीद पैशाचा फार भुकेला होता. चेंबरनें नेमलेल्या कामिशननें केलेल्या रिपोर्टांत ह्मटलें आहे कीं ' ता. ९ मे १९०९ रोजीं दोन सेफ उघडण्यांत आल्या. यांत सोनें आणि रुपें मिळून ९०,००० पौंडाचें सापडलें. या शिवाय

रोकड व चलनी नोटा सुमारें ४,८०.००० पौंडाच्या मिळाल्या. १८ लाख पौंडाचे कर्ज रोखे मिळाले. अबदुल हमीदचा खाजगी मिळकत फार मोठी होती. एकट्या खाणींचें उत्पन्न सालीना ३।। लाखाचें होतें. हें सर्व उत्पन्न सरकार जमा करण्यांत आलें. परकीय ब्यांकांतून त्याची ठेव किती होती हें जरी समजण्यांस मार्ग नाहीं तर ऑटोमन ब्यांकेंत त्याचे ५० पौंड होतें. परदेशीं ब्यांकेंत १० लाखाहून जास्त ठेव नव्हती असें त्याचें ह्मणणें होतें. हेरांच्या रिपोर्टांनीं भरलेल्या ३०० पेट्या होत्या.

अबदुल हमीद ता. १० फेब्रुवारी १९१८ रोजीं मरण पावला

REFBK-0017816

प्रिंटर व पब्लिशर्स–धों० बी० पाठक " पाठक कंपनी प्रेस " मुग० भाटलेन जयराम कानजीची चाल, नं. ३० मुंबई.

पुस्तकें. पाहिजेत किंवा नकोत याचा खुलासा तावडतोब ८ दिवसांत केला पाहिजे. आठ दिवसांत उत्तर न आल्यास पुस्तकें पाहिजेत असें समजून १ रुपयाचे व्ही. पी. नें पाठवूं पोष्ट व्ही. पी. खर्च माफ ही सवलत फक्त ३ पुस्तकांचे लाट नवीन किंवा मागील घेणारापुरतीच स्वतःचा गौरव अथवा भूषण करून कोणास दूषणही द्यावयाचें नाहीं. अगाऊ वर्गणी किंवा प्रवेश फी भरून फसण्याची मुळींच धास्ती नाहीं किंवा मागील व नवीन प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें सर्व घेतलींच पाहिजे अशी अट नाहीं. जीं पसंत असतील तीं घेणें फक्त आपलें नांव नोंदून या मालेचे आश्रयदाते होण्यांस सविनय विनंति आहे..

६ **भारतभूषण ग्रंथमाला**—वर्षांतून प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें म्हणजे अंदाजानें पुस्तकांचे ११ लाट घेणारे कायमचे आश्रदात्यांस दरवर्षी सुंदर क्यालेंडर, डायरी व १ रुपया किंमतीचें संग्राह्य पुस्तक अशीं बक्षिस मिळतील. नवीन होणाऱ्या आश्रयदात्यांनीं मागील प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचें लिस्ट मागविलें असतां फुकट पाठवूं.

७ **भारतभूषण ग्रंथमाला**—आश्रयदात्यांनीं पत्रव्यवहार करतांना प्रत्येक वेळीं आपला रजिष्टर नंबर घातल्याशिवाय पत्रव्यवहार करूं नये तरी प्रत्येक वेळी आपला रजिष्टर नंबर कळविण्याची मेहरबानी करावी.

८ **भारतभूषण ग्रंथमाला**—मोठमोठ्या शहरीं एजंट्स पाहिजेत व्यापारी बुकसेलर्स यांना भरपूर कमिशन मिळेल.

**मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.**

**सेक्रेटरी—भारतभूषण ग्रंथमाला.**

**ठाकुरद्वाररोड मुगभाटलेन गिरगांव मुंबई. नं. ४.**